# परशुरामीय

हें सारस्वताचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड ॥
तरी आतां अवधानामृतें वाड ॥ सिंपोनि कीजे ॥

वर्ष ४१ ] फेब्रुवारी १९५७ [ अंक २

## *—* संपादकीय समालोचन *—*

**संमेलनें-** गेलीं तीन चार वर्षें आपल्या महाविद्यालयांत सर्व विद्यालयाचें एक असें संमेलन होत नाहीं. विद्यार्थ्यांची संख्या दोन हजारांवर गेली असल्यामुळें एवढ्या विद्यार्थ्यांचें एक संमेलन भरविणें अवजड आणि जिकीरीचें होतें. शिवाय तें स्नेहसंमेलन मुळींच होत नाहीं. या विचारानें भिन्न गटांचीं संमेलनें भरवावीं असें ठरविण्यांत आलें. त्याप्रमाणें या वर्षी एफ्. वाय्. आर्टस् व इंटर आर्टस् यांतील सर्व विद्यार्थ्यांचें एक, एफ्. वाय्. सायन्स व इंटर सायन्स यांचें एक व बी. ए. आणि· बी. एस्सीच्या विद्यार्थ्यांचें एक अशीं तीन संमेलनें डिसेंबर १९५६ च्या तिसऱ्या आठवड्यांत भरलीं होतीं. नाटक, विविध रंजन, खेळ, प्रदर्शन, जेवण व पाहुण्यांचें भाषण असा प्रत्येक संमेलनाचा स्वतंत्र कार्यक्रम होता. ‘ भ्रमाचा भोपळा ’, ‘ सत्तेचे गुलाम ’, व ‘ एकच प्याला ’ अशीं तीन नाटकें या तीन शाखांनीं केलीं. पुण्याचे कलेक्टर मा. डॉ. शेख, पुणें विद्यापीठांतील गणितशाखेचे प्रमुख प्रा. हुजुरबाजार व विद्यापीठांतील आर्टस् शाखेचे डीन ले. कर्नल प्रि. करमरकर यांनीं अध्यक्षीय भाषणांतून शास्त्र, कला, गणिताचें महत्त्व, ध्येयनिष्ठा, शिस्त इ. आपापल्या, आवडत्या विषयावर बोलून विद्यार्थ्यांना बहुमोल उपदेश केला.

एफ्. वाय्. इंटर आर्टस् शाखेच्या संमेलनाच्या कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. श्री. वा. काळे हे होते. आणि इतर दोन्ही कार्यकारिणींच्या अध्यक्षांचें काम डॉ. घाटे यांनीं पाहिलें.


अभ्यासाखेरीज विद्यार्थ्यांच्या अंगीं जे इतर गुण असतात त्यांच्या विकासास संधि मिळावी

कॉलेजच्या विद्यार्थ्यांना मोठ्या सामाजिक जीवनाची जाणीव प्राप्त व्हावी, त्यांच्यांतील स्नेहभावना वृद्धिंगत व्हावी, आणि उच्चप्रकारचें मनोरंजन होऊन त्याबरोबरच विद्यार्थ्यांची सौंदर्यदृष्टि व रसिकता जागृत व्हावी, असा या संमेळनांचा हेतु असतो. संमेलनांत नाटकामध्यें विद्यार्थ्यांच्या अभिनयगुणांना कसा वाव मिळतो व संधि मिळतांच त्यांचे सुप्त गुण कसे प्रगट होतात हें श्री. टाकळकरांच्या लेखावरून दिसून येईलच. प्रदर्शनांतहि अनेक विद्यार्थ्यांच्या चित्रकला, छायालेखन, रांगोळी इ. कलांच्या आविष्काराला अवसर मिळून कलेचे कांहीं उत्कृष्ट नमुने पहावयास मिळाले. सर्व व्यवस्थेची जबाबदारी विद्यार्थ्यांनींच अंगावर घेतल्यामुळें अनेकांची कार्यक्षमता तेथें दिसून आली. अशा रीतीनें कॉलेजचीं संमेळनें ठीक पार पडलीं व त्यांतील हेतु बऱ्हंशी साध्य झाला. कांहीं अपवादात्मक प्रकार घडले. त्याला जबाबदार असणारे विद्यार्थी थोडेच असतात. पण पुष्कळ वेळां त्यानें सर्व समारंभाचा विरस होतो. विद्यार्थ्यांनीं या गोष्टींचा विचार करणें अवश्य आहे.

**म. म. दत्तो वामन पोतदार**--आपल्या शि. प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष व महाराष्ट्रांतील एक थोर इतिहासपंडित म. म. दत्तो वामन पोतदार फ्लॉरेन्स ( इटली ) येथें १५ ते २९ सप्टेंबर १९५६ या वेळीं भरलेल्या जागतिक दफ्तरपरिषदेस मुंबईसरकारचे प्रतिनिधि म्हणून गेले होते. 'दफ्तर, कागदपत्रें जपून ठेवण्याचें तिकडील लोकांस वळणच आहे. तेथें एक हजार वर्षांपूर्वीचीं कागदपत्रें नीट जपून ठेवलेलीं आढळतात. कागदपत्रांविषयीं त्या लोकांना फारच आस्था असते.' या शब्दांत त्यांनीं परिषदेचा अनुभव सांगितला. फ्लॉरेन्सहून ते पॅरिसला गेले. तेथें कांहीं मराठी हस्तलिखितें पाहून तेथून ते लंडनला गेले. तेथें असतांना एकदां ते पार्लमेंटच्या बैठकीस उपस्थित होते. रोमला असतांना त्यांना पोपनें भेट देऊन त्यांचा अपूर्व सन्मान केला. हीं सर्व कामें आटपून येतांना इस्तंबूल, बगदाद या शहरांना भेटी देऊन श्री. पोतदार मुंबईस परत आले.

**डॉ. लीलाबाई मुल्हेरकर**--श्रीमती लीलाबाईंना १९५४ सालीं परदेशीं जाण्यासाठीं सरकारी शिष्यवृत्ति मिळाली. ती घेऊन त्या सालीं सप्टेंबर महिन्यांत त्या एडिंबरो येथें गेल्या. तेथें त्यांनीं प्रा. सी. एच्. वाडिंग्टन एफ्. आर्. एस्. यांच्या हाताखालीं एक्सपेरिमेंटल एंब्रियॉलजी-मधील 'प्रोसेसेस ऑफ डिटरमिनेशन इन् चिक एंब्रियो' या विषयाचा दोन वर्षे अभ्यास केला. त्यांचा प्रबंध मान्य होऊन त्यांना पीएच्. डी. ही पदवी मिळाली. गेल्या डिसेंबरांत त्या परत येऊन कामावर रुजू झाल्या आहेत. डॉ. मुल्हेरकरांच्या या अपूर्व यशाबद्दल आम्ही त्यांचें हार्दिक अभिनंदन करतों.


**प्राध्यापकांची कामगिरी**—डिसेंबर १९५६ मध्यें अन्नमलाई विद्यापीठातर्फे अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषद् भरली होती. त्या परिषदेंत 'नीति व सामाजिक तत्त्वज्ञान' या शाखेच्या अध्यक्षपदीं आपले उपप्राचार्य श्री गो. हुल्याळकर यांची निवड झाली होती. 'विज्ञान व नीति' या विषयावर तेथें त्यांनीं भाषण केलें. 'विज्ञान ही अमोघ शक्ति आहे. पण तिच्यावर नीतिबंधनें नसतील तर ती जगाच्या नाशाला कारण होईल तेव्हां यूनोच्या त्या प्रयत्नांना सर्वांनीं साहाय्य करणें अवश्य आहे. नाहींतर जगांत मानव सुखानें नांदूं शकणार नाहीं.' असा त्यांच्या भाषणाचा भावार्थ होता. प्रा. हुल्याळकर यांनीं प्रा श्री. वा. काळे व मुंबईचे एक प्राध्यापक झिआंदानी यांच्या सहकार्यानें 'औटलाइन्स ऑफ सोशल सॉयकॉलजी' हा ग्रंथ लिहिला आहे. बी. ए. च्या अभ्यासक्रमास अनुलक्षून ग्रंथाची रचना केलेली आहे. पुणें, मुंबई, गुजराथ व कर्नाटक या विद्यापीठांच्या या विषयाच्या अभ्यासक्रमाचा या ग्रंथांत समावेश झालेला आहे. पांडित्याप्रमाणें लष्करी



श्री. ताटके- TRANQUILITY दिल्ली युवक महोत्सव-छायाचित्र. १ लें पारितोषिक.




प्र. बा. सावंत. दिल्ली युवक महोत्सवांत ठेवलेलं छायाचित्र.




**श्री. गो. ताटके**
सी. बी. एस्सी. छायाचित्र क्र. १.




**आशा घाणेकर** सी. बी. ए.
भरतकाम क्र. १.



**गि. व. गुजराथी**
हिंदी वक्तृत्व क्र. २.



**भा. भा. करंबेळकर** सी. बी. ए.
कर्णधार–आंतरविद्यापीठ हुतुतू.



**श्री. बा. कोकणे** एफ्. वाय्. ए.
आंतरविद्यापीठ–कुस्ती–१ ला क्रमांक



**दीनानाथ टाकळकर**
यशस्वी नाट्यदिग्दर्शक.



**सिंधु सोमण**–सी. बी. ए.
गोळाफेक–आंतर–
महाविद्यालयीन विक्रम



**सिंधु रानडे** इंटर आर्ट्स् बी.
८० मी. हर्डल्स्
आंतरमहाविद्यालयीन विक्रम.



**शाम येवले.**
श्री परशुरामीय.

क्षेत्रांतहि प्रा. हुल्याळकर यांना या वर्षीं मोठा बहुमान मिळाला आहे. १ सप्टेंबर १९५६ पासून एन्. सी. सी. मध्यें त्यांना कॅप्टनचा हुद्दा देण्यांत आला आहे.

प्रा. सतेगिरि हे धारवाड येथें भरलेल्या अखिल भारतीय इंग्रजी प्राध्यापकांच्या परिषदेस उपस्थित राहिले होते. 'दि प्लेस ऑफ इंग्लिश इन् दि थ्री इयरस् डिग्री कोर्स' या विषयावर तेथें त्यांनीं निबंध वाचला. प्रा. मंगरूळकर हे ठाणें जिल्ह्यांतील कोसबाड या गांवीं भरलेल्या बालशिक्षण परिषदेस उपस्थित होते. प्रा. शिरसीकर हे आंध्रमधील वॉल्टर या शहरीं भरलेल्या राज्यशास्त्र परिषदेस गेले होते. प्रा. श्री. वा. काळे हे कलकत्त्यास सायन्स काँग्रेसला उपस्थित होते. 'मानसशास्त्र' या विषयावरील चर्चेत त्यांनीं भाग घेतला. गेल्या नोव्हेंबर महिन्यांत आपल्या महाविद्यालयांत सामाजिक शास्त्रांचें 'सेमिनार' भरविण्यांत आलें होतें. जातिव्यवस्था, लोकशाही इ. विषयांवर पांच दिवस तेथें चर्चा झाली. आपल्या कॉलेजतर्फे उपप्राचार्य हुल्याळकर, प्रा. काळे, प्रा. गोखले, प्रा. शिरसीकर, श्री. कानिटकर व श्री. आपटे हे सेमिनारला उपस्थित होते. प्रा. शिरसीकर हे सेमिनारचे कार्यवाह होते. पुणे विद्यापीठांतील हा उपक्रम अगदीं अभिनव स्वरूपाचा होता. नाताळच्या आधीं पुण्याला 'अमेरिकन एज्युकेशनल सेमिनार-' भरलें होतें. कॉलेजतर्फे प्रा. काळे व प्रा. गोखले त्याला उपस्थित होते.

पुणें विद्यापीठाच्या इंग्रजीच्या अभ्यासमंडळावर प्रा. मालेगांवकर हे बिनविरोध निवडून आले. प्रा. रा. ना. गद्रे हे संस्कृतच्या अभ्यासमंडळावर असेच बिनविरोध निवडून आले.

प्रा. एस्. आर. देशपांडे यांनाहि एन्. सी. सी. मध्यें मोठा बहुमान मिळाला आहे. २ ऑक्टोबर १९५६ पासून त्यांना कॅप्टन हा हुद्दा देण्यांत आला आहे. महाबळेश्वर येथें या वर्षीं झालेल्या एन्. सी. सी. च्या सैनिक शिबिरांत प्रा. डी. व्ही. कुलकर्णी यांची अॅडज्युटंट व क्वार्टर मास्टर म्हणून नेमणूक झाली होती.

**आमचे विद्यार्थी**- दिल्ली युवक महोत्सवांत या वर्षीं श्री. श्री. गो. ताटके सी. बी. एस्सी यांच्या 'ट्रँक्विलिटी' या छायाचित्रास पहिलें पारितोषिक मिळालें. कु. आशा घाणेकर सी. बी. ए. यांना भरतकामांतील पहिलें पारितोषिक मिळालें आणि श्री. गि. व. गुजराथी ज्यु. बी. ए. यांना हिंदी वक्तृत्वांत दुसरें पारितोषिक मिळालें. श्री. प्र. बा. सावंत यांच्या 'इनोसंट' या चित्राला उत्तम प्रशस्ति मिळाली. भारताच्या राजधानींत एवढा बहुमान मिळवून कॉलेजच्या कीर्तीत या विद्यार्थ्यांनीं अशी भर घातल्याबद्दल आम्ही त्यांना धन्यवाद देतों. रोटरीक्लबानें यंदा भरविलेल्या नाट्यस्पर्धेत आपल्या कॉलेजच्या संघानें 'मराठीचियें नगरीं' या एकांकिकेचा प्रयोग करून दुसरें (उपविजयी) पारितोषिक मिळविलें. याच स्पर्धेत श्री. मनोहर आठल्ये. सी. बी. ए. यांनीं सर्वोत्कृष्ट अभिनयाचें पहिलें पारितोषिक मिळविलें. श्री. मोहन मुंगी व श्री. जयंत बागल यांचाहि अभिनय चांगला झाला.

श्री. दीनानाथ टाकळकर (राष्ट्रभाषा रत्न-वर्धा, राष्ट्रभाषा पंडित-पुणें) सी. बी. ए. यांनीं कलामंडळाचें नाटक 'दूरचे दिवे', संमेलनांतील नाटकें- 'भ्रमाचा भोपळा'– व 'एकच प्याला' व कांहीं एकांकिका यांचें दिग्दर्शन अत्यंत यशस्वीपणें केलें. गेलीं दहाबारा वर्षें ते नाट्य, चित्रपट या व्यवसायांत असून वीसपंचवीस चित्रपटांत व दहाबारा नाटकांत त्यांनीं कामें केलीं आहेत. 'नाट्य' या विषयावर प्रबंध लिहून पीएच्. डी. व्हावें या ईर्षेनें त्यांनीं कॉलेजच्या अभ्यासाकडे

लक्ष वळविलें आहे. त्यांचा एक लेख याच अंकांत दिला आहे त्यावरून नाटयकलेची उपासना त्यांनीं किती तन्मयतेनें केली आहे तें ध्यानांत येईल.

या वर्षी हैदराबाद ( दक्षिण ) येथें आंतरविद्यापीठ हुतुतूचे सामने झाले. पुणें विद्यापीठाच्या संघाचे कर्णधार म्हणून आपल्या कॉलेजच्या संघाचे कर्णधार श्री. भा. भा. करंबेळकर सी. बी. ए. यांची निवड झाली होती. श्री. श्री. बा. कोकणे एफ्. वाय्. आर्टस् ए. यांनीं यंदाच्या आंतरविद्यापीठ सामन्यांत कुस्तींत पहिलें मानाचें पान मिळवून आपल्या कॉलेजची ही परंपरा कायम राखिली आहे. पुणें येथें खोखोच्या आंतरविद्यापीठ स्पर्धा झाल्या. त्यांत आपल्या कॉलेजचे श्री. गोडबोले यांचा खेळ उत्तम झाला. आंतरमहाविद्यालयीन सामन्यांत कु. सिंधु सोमण यांनीं गोळाफेंकींत व कु. सिंधु रानडे यांनीं हर्डल्समध्यें नवा विक्रम प्रस्थापित केला. या सर्व क्रीडापटूंचें आम्ही हार्दिक अभिनंदन करतों.

आपल्या 'सी' कंपनीनें या वर्षी महाबळेश्वरच्या सेनाशिबिरांत बॉक्सिंगमध्यें प्राविण्य-पद मिळविलें. सार्जंट पवार यांना बॉक्सिंग मधील वैयक्तिक प्राविण्यपद मिळालें. कॅडेट दराडे यांना कुस्तीमध्यें पहिला क्रम मिळाला व 'कुस्तीची गदा' मिळाली. आपल्या आरमरड् स्क्वाड्रनमधील ट्रूपनें या वर्षीहि 'बेस्ट ट्रुप इन् डिसिप्लिन' ही पदवी व तिचें पारितोषिक मिळविलें. हें यश आपल्याला लागोपाठ चवथ्यानें मिळत आहे. अंडर ऑफिसर एम्. एस्. वैद्य व सीनीयर अंडर ऑफिसर पुरोहित हे 'सी.' सर्टिफिकेट परीक्षेंत अनुक्रमें पहिले व दुसरे आले. 'सी' कंपनींतील कॅडेट ओक व आरमरड् स्क्वॉड्रन मधील कॅडेट् ए. व्ही फाटक यांना खडकवासल्याच्या नॅशनल डिफेन्स ॲकॅडमींत प्रवेश मिळाला आहे. कदम कदम बढाए जा.

एफ्. वाय्. आर्टस् ए च्या विद्यार्थ्यांनीं वर्गसंघटनेची आपल्या प्राचार्यांची कल्पना मूर्त स्वरूपांत आणण्यांत विशेष यश मिळविलें आहे. 'पुण्यांतील सामाजिक जीवन' हा विषय विद्यार्थ्यांना व 'आधुनिक स्त्री' हा विषय विद्यार्थिनींना वर्गशिक्षक प्रा. केरूर यांनीं दिला होता. शनिवार ता. १९।१।५७ रोजीं या वर्गाच्या संघटनेचा समारोप-समारंभ प्राचार्यांच्या अध्यक्षते-खालीं झाला. त्या वेळीं सर्वश्री कुलकर्णी, टुमणे, धोंगडे, घोलप या विद्यार्थ्यांनीं पुण्याचें संस्थामय जीवन, शैक्षणिक जीवन, राजकीय जीवन, आणि आर्थिक जीवन या विषयांवर निबंध वाचले. आणि कु. प्रभुणे, कु. घांगुर्डे, सौ. सोवनी व कु. साने यांनीं स्त्री व समाजकार्य, स्त्री व शिक्षण, स्त्री व आर्थिक समस्या आणि स्त्री व राजकारण या विषयांवर निबंध वाचले. माहिती, मांडणी, भाषा या सर्वच दृष्टींनीं हे निबंध फार वरच्या दर्जाचे होते. त्यामागें अभ्यास, आकलन, जबाबदारीची जाणीव व सदभिरुचि हे गुण प्रामुख्यानें दिसत होते. समारंभाचे वेळीं विद्यार्थ्यांच्या अंगचे शिस्त, शालीनता, व्यवस्थितपणा इ. गुण स्पष्ट दिसून येत होते. विद्यार्थ्यांचें हें कार्य पाहून प्राचार्य भिडे अगदीं संतुष्ट झाले. प्रा दि. ब. केरूर यांच्या निरलस श्रमामुळेंच हें घडून आलें आहे असें त्यांनीं सांगितलें. आणि 'मी या ठिकाणीं वर्गशिक्षक असतों तरी मलाहि हें साधलें नसतें' अशा शब्दांत त्यांनीं प्रा. केरूरांचा गौरव केला. प्रा. केरूर व त्यांचे विद्यार्थी यांना या यशाबद्दल आम्ही धन्यवाद देतों.

इंटर आर्टस् ए-तर्फे १३ डिसेंबर १९५६ रोजीं डॉ. न्यूमन यांचें 'अमेरिकन साहित्याची पार्श्वभूमि' या विषयावर व्याख्यान झालें.

**माजी विद्यार्थ्यांचें सुयश**--आपल्या कॉलेजचे एक माजी विद्यार्थी श्री. भाऊ रघुनाथ साबळे बी. ए. यांना ऑस्ट्रेलियाच्या 'इंटरनॅशनल वूल सेक्रेटरीएट' तर्फे झालेल्या अखिल भारतीय

खुल्या निबंधस्पर्धेत प्रथमक्रमांकाचें ६०० रु. चें पारितोषिक मिळालें. या निबंधस्पर्धेसाठीं "व्हॅल्यूज् अँड व्हॅल्यू ऑफ वूल टु इंडियन एकॉनमी" असा विषय होता. स्पर्धेत बक्षिस मिळविणारे श्री. साबडे हे एकटेच महाराष्ट्रीय आहेत.

आपले दुसरे एक माजी विद्यार्थी श्री. एम्. बी. देशमुख यांना फिजिक्स या विषयांत या वर्षी पुणें विद्यापीठानें पीएच्. डी. ही पदवी दिली. 'जोशी इफेक्ट' हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. त्यांचा सर्व अभ्यास व संशोधन आपल्या कॉलेजच्या फिजिक्स शाखेंतच झाला आहे.

आपले एक माजी विद्यार्थी श्री. मोहन पुंगलिया हे बार-अॅट-लॉ व लंडन विद्यापीठाची बी. एस्सी इकॉनॉमिक्स या पदव्यांच्या अभ्यासासाठीं ३ ऑक्टोबर १९५६ रोजीं इंग्लंडला रवाना झाले. ते तेथें तीन वर्षे रहाणार आहेत. त्याचप्रमाणें श्री श्रीधर भालचंद्र श्रोत्री बी. ए. (ऑनर्स) हे जर्मनीमधील हायडेलबर्ग येथील विद्यापीठामध्यें जर्मन भाषेचें उच्च शिक्षण घेण्यासाठीं ९ ऑक्टोबर १९५६ रोजीं जर्मनीस गेले. 'फॉरिन लँग्वेजेस स्कॉलरशिप स्कीम' या केंद्रीय शिक्षणखात्याच्या शाखेंतून त्यांना शिष्यवृत्ति मिळाली आहे. १९५५ सालीं ते जर्मन विषयांत विशेष गुण मिळवून आपल्या कॉलेजांतून बी. ए. झाले. त्यांचा जर्मनींत एक वर्ष मुक्काम राहील.

---

आम्हांला कळविण्यास अत्यंत दुःख होतें कीं आपल्या. शिक्षण प्रसारक मंडळीच्या आजीव सभासदमंडळाचे दोन आजीव सभासद आणि नियामक मंडळाचे एक सभासद गेल्या दोनतीन महिन्यांत कालवश झाले. शि. प्र. मंडळीची यामुळें फार मोठी हानि झाली आहे.

**कै. गोविंद पंढरीनाथ शिरोरे**-श्री. शिरोरे हे प्रथम १९०९ सालीं आपल्या संस्थेंत आले. व १० सालीं आजीव सभासद झाले. १९१९ सालीं सोलापूरला आपल्या संस्थेचें हरिभाई देवकरण हायस्कूल स्थापन झालें तें त्यांच्याच प्रयत्नामुळें. आणि तेच त्याचे पहिले मुख्याध्यापक होते. त्या पदावर ते १९३२ सालापर्यंत होते. त्या सालीं ते निवृत्त झाले. सोलापूरचे वाटी अनाथ विद्यार्थी गृह, सेवासदन, सरस्वती मंदिर इ. संस्थांमध्यें ते ट्रस्टी म्हणून किंवा सल्लागार म्हणून काम पहात होते. त्यांना १०-१-५७ रोजीं देवाज्ञा झाली. मृत्युसमयीं त्यांचें वय ७४ वर्षांचें होतें. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखांत आम्ही सहभागी आहों.

**कै. प्रा. प्रल्हाद गोविंद पाध्ये**- प्रा. पाध्ये हे १९१७ च्या मे मध्यें आपल्या शि. प्र. मंडळीचे आजीव सभासद झाले. तेरा वर्षे त्यांनीं स. प. महाविद्यालयांत इतिहास व अर्थशास्त्र या विषयांचे प्राध्यापक म्हणून काम केलें. संस्थेला देणग्या मिळविण्याच्या कामीं त्यांनीं मोठेंच यश मिळविलें होतें. १९३० सालीं राजीनामा देऊन ते सेवामुक्त झाले. १६-११-१९५६ रोजीं ते मृत्यु पावले. ईश्वर मृतात्म्यास चिरशांति देवो !

**कै. के. वि. केळकर**- श्री. केळकर हे पुण्यांतील एक ख्यातनाम वकील होते. १९३२ ते ४१ व १९४४ ते ४७ या काळांत ते आपल्या शि. प्र मंडळीच्या नियामकमंडळाचे सभासद होते. ते आपल्या शि. प्र. मंडळीचे कायद्याचे सल्लागारहि होते. ते लोकमान्यांच्या राजकारणाचे कट्टे अनुयायी असून पुण्याच्या सार्वजनिक जीवनांत व विशेषतः पूर्वभागांतील व्यापारी पेठांत त्यांनीं आपल्या निरलस कार्यामुळें एक विशिष्ट स्थान संपादन केलें होतें. ९ जाने. १९५७ रोजीं वयाच्या ६८ व्या वर्षी ते निधन पावले. ईश्वर मृतात्म्यास चिरशांति देवो !

---

# स. प. महाविद्यालय--जिमखाना.

## ( अहवाल– दुसरी सहामाही )

या सहामाहींत आन्तरमहाविद्यालयीन सामन्यांत विद्यार्थीविद्यार्थिनींनीं फार उत्साहानें भाग घेतला.

आपले क्रिकेटचे कप्तान श्री. चांदोरकर ह्यांची 'रणजी ट्रॉफी' सामन्यासाठीं महाराष्ट्रातर्फे निवड झाली. श्री. चांदोरकर व श्री. करमरकर ह्यांनी आंतरविद्यापीठ सामनेहि गाजविले.

हुतुतू संघानें मुंबईची भोईर ट्रॉफी स्पर्धा जिंकून मागच्या वर्षीची प्रथा कायम ठेवली. संघाचे चार खेळाडू सर्वश्री करंबेळकर, देगलूरकर, राऊत व फाटक त्यांची विद्यापीठ संघाकरितां व श्री. करंबेळकर व श्री. देगलूरकर ह्यांची मुंबईराज्य संघाकरितां निवड झाली. करंबेळकर हे पुणें-विद्यापीठ संघाचे कप्तानहि होते. श्री. श्री. बा. कोकणे यांनीं आंतरविद्यापीठ कुस्तीच्या सामन्यांत पहिला क्रमांक मिळवून सर्वोच्च यश मिळविलें.

रस्सीखेच संघ हा पुणें आंतरमहाविद्यालयीन सामन्यांत अजिंक्य ठरला. मैदानी खेळांमध्यें श्री. मोने व श्री शेवाळे हे अनुक्रमें भालाफेंक व ५००० मी. पळणें ह्यांत विजयी ठरले. श्री. मोने हे आंतरविद्यापीठ सामन्यांतहि भालाफेकींत तिसरे आले. श्री घुले व श्री देशपांडे हे अनुक्रमें वनसंचार व ४०० मी. टप्पाशर्यत यांत उपविजयी ठरले तसेंच श्री. शेवाळे व श्री. फाटक ह्यांनीं अनुक्रमें वनसंचार व १०० मी. पळण्याच्या शर्यतींत तिसरा क्रमांक मिळविला.

विद्यार्थिनींचें यश गतवर्षीइतकें जोरदार नसलें तरी कौतुकास्पद आहे. मैदानी खेळांत सिंधु रानडे या ८० मी. हर्डल्सला विजयी ठरल्या. त्यांनीं नवा आंतरमहाविद्यालयीन विक्रम प्रस्थापित केला. कु. सिंधु सोमण यांनीं गोळाफेकींत १ ला व थाळीफेकींत ३ रा क्रमांक मिळविला. गोळाफेकींत त्यांनी आंतरविद्यापीठ विक्रम मोडला. तसेंच कु. उषा सहस्रबुद्धे भालाफेकींत, व कु. वैजयंती पटवर्धन टप्पा शर्यतींत ३ ऱ्या आल्या.

'श्री परशुरामीय' हा बहुमान या वर्षी श्री. शाम येवले यांनीं मिळविला आहे. आपले माजी विद्यार्थी श्री. बापू नाडकर्णी यांची गतवर्षीप्रमाणेंच यंदाहि रणजी ट्रॉफी क्रिकेटसामन्यांसाठीं महाराष्ट्राचे कर्णधार म्हणून निवड झाली आहे. आपले दुसरे माजी विद्यार्थी श्री. जनपंडित हे 'हॉकी कोचिंग' च्या शिक्षणासाठीं लवकरच लखनौला जात आहेत. ( श्री. जनपंडित हे सध्यां कॉलेजमध्यें डेमॉन्स्ट्रेटर म्हणून काम करीत आहेत. ) या यशाबद्दल आम्ही दोघांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

प्रा. भिडे, सर्व गुरुजन, क्रीडाशिक्षक व जिमखाना कार्यकारिणीचे सभासद यांनीं आम्हांला वेळोवेळीं जें साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहें.

अ. वि. राजवाडे,
जनरल सेक्रेटरी.

# शारीरिक शिक्षण विभाग

यंदा ७ जूनपासून गटप्रमुखांचे शिक्षणाचा वर्ग सुरू झाला. वर्गाला आलेल्या ७० विद्यार्थी-विद्यार्थिनींपैकीं ३५ विद्यार्थिविद्यार्थिनींची गटप्रमुख म्हणून निवड झाली. चांचणीमध्यें श्री. तळवलकर व कु. कला गपचुप हे अनुक्रमें विद्यार्थी व विद्यार्थिनींमध्यें पहिले आले.

निवड झालेल्या १९ विद्यार्थ्यांच्या व १६ विद्यार्थिनींच्या सहकार्यानें २ जुलै १९५६ पासून शारीरिक शिक्षणाचें काम नियमित चालूं झालें. यंदाचे वर्षीं विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचे गट त्यांचे वर्गाप्रमाणें न पाडतां त्यांना सोयिस्कर वेळेप्रमाणें पाडण्यांत आले होते.

विभागप्रमुख म्हणून खालील नेमणुका झाल्या.

प्रभातविभाग विद्यार्थी--( १ ) श्री. भावे ( २ ) श्री. जोशी ( ३ ) श्री. पांडे. विद्यार्थिनी ( ४ ) कु. शांता भुस्कुटे. सायंविभाग विद्यार्थी--( १ ) श्री. दांडेकर. विद्यार्थिनी-( २ ) कु. पिंगळे सुमन.

यंदा २३ जुलै १९५६ रोजीं लो. टिळकजन्मशताब्दिनिमित्त समारंभ साजरा होऊन निरनिराळीं प्रात्यक्षिकें झालीं. त्याचप्रमाणें १५ ऑगस्ट १९५६ चा स्वातंत्र्यदिनाचा समारंभहि साजरा झाला. अध्यक्षस्थानीं प्राचार्य भिडे हे होते.

गटागटांच्या चढाओढींत प्रभातविभागांत श्री. काणे व सायंविभागांत श्री. नेनें हे अग्रभागीं आहेत.

यंदाचे वर्षीं आपले जिमखाना ऑर्गनायझर व शा. शि. वि. प्रमुख श्री. भा. रा. जोशी हे पुढील शिक्षणाकरितां सप्टेंबर १९५६ मध्यें कांदिवलीस गेले. त्यांचें काम अनुक्रमें श्री. ज. ग. नलावडे व श्री. वरंदीकर Sr. B Sc. हे पहात आहेत.

यंदाचे वर्षीं १२ विद्यार्थी व ३० विद्यार्थिनी यांनीं Army School of Phy. Training चे शिक्षकांचे हाताखालीं कांहीं दिवस शिक्षण घेतलें.

सौ. शकुन्तला कटककर.

---

# कलामंडळ

दिल्ली युवकमहोत्सवासाठीं पुणें विद्यापीठातर्फे आपल्या महाविद्यालयांतून श्री. गो नी. दांडेकरकृत ' धनगरराजा ' हे लोकनृत्य पाठविण्यांत आलें. हेंच लोकनृत्य एन्. सी. सी. दिनाला झालेल्या विविधगुणदर्शनाच्या कार्यक्रमांत आपल्या महाविद्यालयातर्फे सादर करण्यांत आलें. लोकनृत्याची सर्व जबाबदारी कु. तारामती केळकर यांनीं घेतली होती व ती त्यांनीं यशस्वीरीत्या पार पाडली. लोकनृत्याचें दिग्दर्शन श्री. मुळगुंद यांनीं केलें होतें. त्याबद्दल दोघांचे आम्ही आभारी आहोंत.

प्रा. भुपटकरांनीं अनुवादित केलेली ' शूरा मीं वंदिलें ' ही एकांकिका अत्यंत यशस्वी झाली. युवकमहोत्सवांत आपल्या महाविद्यालयांतील कु. आशा घाणेकर सी. बी. ए. ( भरतकाम ) श्री. ताटके सी. बी. एससी. ( छाया-चित्र ) व श्री. गुजराथी ( हिंदी वक्तृत्व ) यांना अनुक्रमें पहिलें,

पहिलें व दुसरे पारितोषक मिळालें. श्री. सावंत यांना प्रशस्तिपत्रक मिळालें. पुणें विद्यापीठाच्या यशांत त्यांनीं खात्रीनें भर घातली आहे.

या सहामाहींत 'दूरचे दिवे' हें नाटक मंडळानें सादर केलें. तें अतिशय यशस्वी झालें त्याचें श्रेय दिग्दर्शक श्री. दीनानाथ टाकळकर व विद्यार्थी कलाकार यांना आहे.

या वर्षीची कार्यकारिणी-अध्यक्ष-प्राचार्य भिडे, उपाध्यक्ष-उपप्राचार्य हुल्गाळकर, उपप्राचार्य भावे व प्रा. मालेगांवकर, कार्याध्यक्ष-प्रा. राजे, खजिनदार-प्रा. भुपटकर. कार्यकारी समितीचे सभासद श्री. मनोहर आठल्ये, श्री. दीनानाथ टाकळकर, कु. निर्मला वाटवे, श्री. कापडी व श्री. मधुकर नाडकर्णी.

या सहामाहींत एक चित्रपट व एक नृत्याचा किंवा गायनाचा कार्यक्रम सादर करावयाचा व प्रदर्शन घडवून आणावयाचें असा समितीचा मानस आहे.

या वर्षी कलामंडळाचें पाऊल प्रगतिपथावर आहे व त्याचें सर्व श्रेय प्राध्यापकवर्गास, हितचिंतकांस व विद्यार्थीवर्गास आहे. आम्ही त्या सर्वांचे आभारी आहोंत.

**प्रभाकर गारटकर**
**कु. उषा पागे**
चिटणीस

---

# मराठी वाङ्मयमंडळ

## अहवाल—दुसरी सहामाही

या सहामाहींत श्री. ग. ल. ठोकळ यांचें 'मराठी लघुकथा' या विषयावर व्याख्यान झालें. हरिभाऊंच्या पासून आजपर्यंत लघुकथेचा विकास कसा झाला हें सांगून शेवटीं व्याख्यात्यांनीं स्वतःची एक लघुकथा घेऊन तंत्रविषयक चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या साहित्यावर चर्चा करण्या-साठीं तीन बैठकी झाल्या. श्री. शरद् घाटे, श्री. अनिरुद्ध पुनर्वसु, श्री. दीनानाथ टाकळकर, श्री. दत्तकुमार, श्री. श्रीकृष्ण पूरकर, श्री. विलास जोशी इ. विद्यार्थ्यांच्या साहित्यावर चर्चा झाली.

मंडळाची सहल ९ डिसेंबर १९५६ रोजीं कोथरूड येथील श्री. भालेराव यांच्या बागेंत गेली होती. त्यावेळीं सुप्रसिद्ध कवयित्री सौ. पद्माबाई गोळे या पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनीं स्वतःच्या कांहीं कविता त्या वेळीं वाचून दाखविल्या. आम्ही यासाठीं त्यांचे आभारी आहोंत.

मंडळानें या वर्षी एक नवीन उपक्रम केला आहे. मंडळाच्या विद्यमान व माजी सभासदांच्या कवितांचा एक संग्रह तयार करून 'स्वाती' या नांवानें तो प्रसिद्ध केला आहे. त्याचें प्रकाशन सुप्रसिद्ध कवि मंगेश पाडगांवकर यांच्या हस्तें २६ जानेवारी रोजीं झालें. संग्रहाचें संपादन श्री. अरविंद कुलकर्णी व श्री. अनिरुद्ध पुनर्वसु या मंडळाच्या सभासदांनींच केलेलें आहे. अशा प्रकारचें हें प्रकाशन महाराष्ट्रांत प्रथमच होत आहे. या प्रकाशनाच्या वेळेला 'स्वप्नगंगा' या हस्तलिखित संग्रहाचेंहि प्रकाशन झालें.

आमचे गुरुजन व विद्यार्थी बंधुभगिनी यांनीं आम्हांला वेळोवेळीं जें साहाय्य केलें त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहों.

**शशिकांत जोशी**
**लीला मातापूरकर-चिटणीस.**

# N. C. C.

## 'C' Company, 2nd Bombay Bn.
## ANNUAL REPORT-1956-57

The muster Parade of the company was held on 26th June, 1956. As 58 trained cadets rejoined the company, only 103 students could be newly recruited.

At the commencement of this academic year two of the officers of our company Lt. R. N. Chapekar and 2/Lt. S. V. Kale were transferred to the newly formed 'B' company of the Fergusson college and B. M. college of commerce. Lt. Chapekar was appointed as the company commander of the 'B' coy.

After a central cadre organised by the Bn. for prospective cadet N. C. Os. which concluded with a test by the C. O. the selection and appointment of the N. C. Os. was made.

In May, 1956, No. 1 circle held its Fourth combined cadre and social service camp at Radhanagari for a period of 14 days. Lt. Kulkarni and 22 cadets from our coy attended this camp. Lt. Hulyalkar attended a four week central refresher course at Dehra Dun.

In August, 1956, a Guard of Honour was Presented to our Prime Minister Pandit Jawaharlal Nehru. Lt. Gaidhani and 28 Cadets from our company participated in it.

The recruits had their miniature range firing on 28th september, 1956. The attendance and performance of our cadets was satisfactory. On 3rd October, 1956 our New Circle Commander Lt/Col. D. S. Siddu visited the unit and inspected the training of cadets of our Company with which he was highly pleased.

During the October vacation, a combined N. C. O.'s 'Cadre was held at Belgaum. Ten cadets from our Company attended it. C. S. M. Kotnis was sent by the Bn. to Delhi to attend the youth Festival held in October, 1956.

The N. C. C. Day Ceremonial Parade was held on our College Grounds on 2nd December. Lt. Kulkarni and 90 cadets from our company participated in it. U/O Panse D. V. acted as Parade Marshal.

It gives us very great pleasure to record that our O. C., Lt. Hulyalkar was promoted to Captaincy as from 1st September, 1956. We heartily congratulate him and wish him a brilliant success in future.

The Annual Classification Range Practice was held on 13th December.

The Annual Training Camp was held this year at Mahableshwar from 24th December, 1956 to 6th January, 1957. All officers and 146 cadets of our company attended the camp. Lt. D. V. Kulkarni was

appointed as the Adjutant and Quarter Master of the Bn. U/O Panse of our Company acted as Asstt. Adm. Officer. Capt. Hulyalkar and Lt. Gaidhani were appointed on the Board of Examiners for the 'C' and 'B' Certific te Examinations respectively.

Our Compa y did extremely well in Boxing and Wrestling Competitions he l in the Camp. Our Company was declared as the Boxing company f the year.

In 'B' Certi cate Examination, 36 cadets out of 37 that appeared from our Compa y, have passed and in the 'C' Certificate Examination two out of three have been successful. Cadet Oak S. G. of our coy. passed his . S. W. Examination and is at present undergoing training at N. D A. Khadakwasla. L/cpl Pusalkar A. V. and L/cpl. Gune appeared f the Military College Examination held in Nov. 1956.

Two of our dets U/O Panse and U/O Karambelkar have applied for the N. C. C. pecial Course at the Military College, Dehra Dun. Cadet Patwardh n A. M. of our Coy. has appeared for the J. S. W. Examination he ; in December, last. We wish all these cadets brilliant success.

C. S. M. Kotnis M. V.

# Armoured Squadron

## ANNUAL REPORT-1956-57

Muster para e was held on 26th June and 36 recruits were admitted to com lete the increased strength of 60 cadets. Sr. U/O Purohit and 3 ca ets attended the social service camp at Radhanagari, during th last summer vacation.

Hearty cong atulations to Lieut S. R. Deshpande for his promotion to the high rank of a Captain from 2nd Oct. 1956; and also for getting th opportunity of commanding the squadran for a month and half uring Nov. and Dec. 1956.

Cadre was l ld at Khadakwasla in October vacation and was attended by 20 dets from our troop. The camp was a great success because of the h standard of training and visits to NDA and Central Water d Power Research Station. Capt. S. R. Deshpande, Sr. U/O Purohit nd U/O Vaidya M. S. worked as Admin officer, welfare officer and Q. M. respectively. Lt. col. D. S. Siddu, the new circle commander and Prin. B. V. Bhide with Profs. Gokhale, Ghate and Kulkarni visited the camp and were pleased with camp administration and training.

Capt. S. R. Deshpande and Sr. U/O Purohit represented the unit in the Ceremonial parade, held on 2nd Dec. 1956 at Bombay.



जिमखानाकार्यकारिणीचे सभासद
प्राध्यापक—निरनिराळया खेळांकरितां मदतनीस व क्रीडाशिक्षक


*—*



आंतरमहाविद्यालयीन सामन्यांतील
निरनिराळया वैयक्तिक स्पर्धांतील विजयी खेळाडू



आंतरमहाविद्यालयीन सामने १९५६-५७
विजयी संघ-रस्सीखेंच



कलामंडळ-कार्यकारिणी
१९५६-५७

Annual camp was held at 'Armoured Nagar' during X'mas. The camp was a remarkable one because of the various demonstrations arranged by the Armoured Corps training Centre-including, 'Different Types of Armoured Fighting vehicles and Tank firing. 'B' and 'C' certificate Examinations were held during the camp. U/O Vaidya M. S. and Sr. U/O Purohit stood first and second respectively in the whole unit in 'C' Cert. Examination. Total 3 cadets in 'C' and 13 cadets in 'B' Cert. Examinations passed; all securing 'B' grading. L/cpl Rao V. N. stood first in the troop.

Prin. and Mrs. Bhide visited the annual camp and encouraged the cadets. In the annual inter troop competitions our cadets are proud to retain the title and trophy for the 'Best troop in Discipline' for the 4th year in succession. We bagged the championship in Volley Ball also.

Cadet Phatak A. V. deserves special mention for his selection to the NDA Khadakwasla for Joint Services Wing course.

Ninth annual Troop Day was celebrated in the last week of January with the usual pomp and prize distribution.

Thanks to prin. Bhide, and Capt. S. P. Gupta, our O. C. for help and guidance through out the year and all cadets for their hearty co-operation.

Ashok Purohit, Sr. U/O
M. S. Vaidya U/O.

---

# संकीर्ण

## जिमखाना वार्षिक दिन

स. प. महाविद्यालयाचा ज़िमखाना वार्षिक दिन दिनांक ६।२।५७ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां साजरा करण्यांत आला. अध्यक्षस्थानीं माजी प्राचार्य ह. भ. प. सोनोपंत दांडेकर हे होते. सुरुवातीस प्राचार्य भिडे यांनीं स्वागतपर भाषण करून अध्यक्षांची ओळख करून दिली. त्यानंतर सरचिटणीस श्री. राजवाडे यांनीं वर्षभराच्या कार्याचा अहवाल सादर केला. नंतर प्राचार्य दांडेकर यांनीं यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिकें दिलीं. नंतर पडदानिधीसाठी विद्यार्थ्यांनीं जमा केलेले ११०१ रुपये अध्यक्षांचे हस्तें प्राचार्य भिडे यांना अर्पण करण्यांत आले. अध्यक्षीय भाषणांत प्राचार्य दांडेकर यांनीं विद्यार्थ्यांना स्वतःची सर्वांगीण वाढ करण्याचा उपदेश केला. शेवटीं प्रा. देशपांडे यांनीं आभार मानल्यानन्तर वंदेमातरम् गीत होऊन समारंभ समाप्त झाला.

## प्रथम वर्ष ( साहित्य ) ब-वर्ग व्यवस्था-मंडळ.

लो. टिळक जन्मशताब्दीच्या सुमुहूर्तावर आमच्या वर्गव्यवस्था-मंडळाच्या कार्यास प्रारंभ झाला. वर्षांतून एकूण सहा वादविवाद सभा घेण्यांत आल्या व त्या वेळीं भाषावार प्रांतरचना,

डॉ. आंबेडकरांचें धर्मांतर, आजचा विद्यार्थी व आजच्या विद्यार्थिनी या विषयांवर प्राध्यापकांच्या अध्यक्षतेखालीं चर्चा झाल्या. वर्गातर्फे 'प्रतिभा' नांवाचें एक हस्तलिखितहि काढण्यांत आलें. त्याचें उद्घाटन माननीय राजकवि यशवंत पेण्ढरकर यांनीं केलें. त्याच वेळीं त्यांच्या हस्तें वक्तृत्व, निबंध व हस्ताक्षरस्पर्धेत नैपुण्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिकें देण्यांत आलीं. त्या-निमित्तानें राजकवि यशवंत म्हणाले, "कोणतीहि कला किंवा ज्ञान असो, एकदां तें आपण पत्करलें कीं त्याची चाड आपण ठेवलीच पाहिजे."

मंडळाची खेडाळ्यास सहलहि गेली होती. प्रा. गायधनी यांच्या मार्गदर्शनानें व माझे वर्ग-मित्र श्री. शिवाजीराव नलावडे यांच्या साहाय्यानें सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडले.

**--जी. एन्. सरपोतदार.**

## प्रथम वर्ष ( साहित्य ) क-वर्ग व्यवस्था-मंडळ.

गु. प्रा. श्री. रा. फडके यांच्या मार्गदर्शनाखालीं आमचें मंडळ विविध कार्यक्रमांत यशस्वी-पणें भाग घेऊं शकलें हें सांगण्यास मला फार आनंद होत आहे. आमच्या वर्गातील **कु. सुलभा लोणकर यांना अखिल-भारतीय-नभोवाणी संगीत-स्पर्धेत दुसरें पारितोषिक मिळालें.** तसेंच कुमार पुरवंत हे आंतरमहाविद्यालयीन मुष्टियुद्धाच्या सामन्यांत उपविजेते ठरले. त्यांचीं प्रदर्शनांतील चित्रेंहि प्रशंसनीय होतीं. दिल्लीच्या युवकमहोत्सवांतील लोकनृत्यस्पर्धेसाठीं गेलेल्या पुणें विद्यापीठाच्या संघांत आमच्या वर्गातील चार विद्यार्थिनींची निवड करण्यांत आली होती.

या वर्षीच्या महाविद्यालयीन स्नेह-सम्मेलनांत प्रा. नारायणराव कुलकर्णी यांनीं लिहिलेली 'पंचकन्या' ही नाटिका आमच्या वर्गानें बसविली. तिचा प्रयोग प्रेक्षणीय झाला. वर्गातर्फे भोर-भाटघरला सहलहि काढण्यांत आली. २७ जाने. ५७ ला वर्गदिन साजरा करण्यांत आला. त्या वेळीं निर-निराळ्या खेळांचे सामने झाले व प्रा. फडके यांचें उद्बोधक भाषण झालें. सव वर्ष उत्साहानें व आनंदानें पार पडलें.

**--कु. उषा रानडे.**

## पडदानिधि

गेल्या डिसेंबरमध्यें महाविद्यालयाची विभागीय संमेलनें झालीं. त्यावेळीं दुर्दैवानें कलामंडळाचा मखमली पडदा जळाला. या दुर्घटनेची व्यथा विद्यार्थ्यांच्या अंतःकरणांत खोलवर गेली. त्यांची कर्तव्यबुद्धि आणि महाविद्यालयाबद्दलची निष्ठा जागृत झाली व त्यांनी स्वतःच्या अंतःप्रेरणेनें 'पडदानिधि' उभारला.

निधीला आरंभ दि. २२-१-५७ ला झाला. आणि अवघ्या ८-१० दिवसांत विद्यार्थ्यांनीं अपूर्व त्यागबुद्धि दाखवून दि. ६-२-५७ रोजीं 'जिमखाना वर्षदिनाच्या' दिवशीं, प्राचार्यांना रु ११०१ चा पहिला हप्ता सादर केला. आणि विशेष म्हणजे या रकमेंत, महाविद्यालयांतील शिपाई मंडळींनींही आपली लाक्षणिक देणगी दिली.

कृतज्ञता, त्यागबुद्धि व कर्तव्यबुद्धि या धनाच्या आधारावर आज स्वप्नवत् ठरलेला पडदा त्याच्या रक्षेंतून पुनः उभा करण्याचा विद्यार्थ्यांनीं संकल्प केला आहे.

**प्रा. दि. व. केरूर-निधिधारक**




आंतरमहाविद्यालयीन सामने-विजयी संघ-हुतूतू-१९५६-५७




आंतरमहाविद्यालयीन सामने-विजयी संघ क्रिकेट-१९५६-५७



आंतरमहाविद्यालयीन सामने-विजयी संघ-थ्रो-बॉल-१९५६-५७



आंतरमहाविद्यालयीन सामने
१९५६-५७
विजयी संघ-कुस्ती



पी. टी. इन्स्ट्रक्टर्स
१९५६-५७

# साहित्य-विभाग

## रशियांतील नवा बदल

लेखक :- सुरेश हलदुले -ज्यू. बी. ए.

१९१७ सालच्या ऑक्टोबरमध्यें १८ तारखेला व्होल्गा नदीच्या कांठीं आभाळ कडाडलें, धरणी दुभंगली, नि त्यांतून एक धगधगती लाल ज्योत वर उफाळली. त्यानंतर कित्येक वर्षे जग भयचकित नजरेनें, कांहींशा विस्मयानें तिच्याकडे पहात होतें. १९५६ सालच्या फेब्रुअरी महिन्यांत २४-२५ तारखेला व्होल्गाचें आसमंत पुन्हां एकदां दणाणलें. पुन्हां तिथें एक प्रचंड स्फोट झाला, नि जग पुन्हां विस्मित होऊन त्याकडे पाहूं लागलें !

रशियांत कम्युनिस्ट क्रांति झाल्यापासून तिथें देवदेवतांचा वनवास सुरू झाला. देवांना ' दानव ' ठरवून त्यांना नष्ट करण्याचा कसोशीचा प्रयत्न रशियांत झाला. एवढें झालें तरी एका देवाची प्राणप्रतिष्ठा मात्र मोठ्या अितमामानें रशियांत करण्यांत आली होती. ' स्टॅलिन ' हें त्या देवाचें नांव. खुद्द मार्क्सनें धर्माला अफू ठरविण्याचा आततायीपणा केला तरी मार्क्सवादी रशियांत मात्र एका धर्माला राजाश्रय मिळाला होता. स्टॅलिनची पूजा करणें हा तो धर्म होय !

परंतु गेल्या फेब्रुअरीच्या २४-२५ तारखेला भरलेल्या रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या २० व्या अधिवेशनांत एक अघटित दृश्य जगाला पहायला मिळालें. ज्या देवाची आजपर्यंत भक्तिभावानें पूजा करण्यांत आली त्याला त्याच्या विनम्र भक्तांनींच देव्हाऱ्यांतून उचलून बाहेर फेंकून दिलें--एवढेंच नव्हे तर " हा आमचा देव नव्हे, हा आमचा धर्म नव्हे " असा पुकारा केला. ( It is impermissible and foreign to the spirit of Marxism-Leninism to elevate one person and transform him into a superman possessing supernatural characteristics akin to those of a god. " -- क्रुश्चेव्हच्या २० व्या कॉंग्रेसमधील भाषणामधून ) पक्षाच्या २० व्या अधिवेशनांत पक्षाचा सरचिटणीस क्रुश्चेव्ह यानें स्टॅलिनवर व त्याच्या व्यक्तिपूजावादावर ( personality cult ) चढविलेला चौफेर हल्ला ही कम्युनिस्ट अितिहासांतील एक अभूतपूर्व घटना होती. व्होल्गाच्या कांठीं पुन्हां झालेला स्फोट तो हाच. त्याचें साद-पडसाद कम्युनिस्ट नि कम्युनिस्टेतर जगांत क्रांतिकारक ठरले. त्यानें कम्युनिस्ट जगांत माजविलेली खळबळ तर अद्यापिहि शांत झालेली नाहीं व ती लवकर होईल असेंहि दिसत नाहीं !

२० व्या कॉंग्रेसमधील आपल्या भाषणांत क्रुश्चेव्हनें स्टॅलिनवर कम्युनिझमचे विरोधक करीत असत त्याहिपेक्षां गंभीर आरोप केले. तो पाशवी होता, अत्यंत अहंमन्य होता, अनेक निरपराध पक्षकार्यकर्त्यांचे त्यानें प्राण घेतले, हजारों निरपराध नागरिकांची हत्या केली, नि हजारोंना देशोधडीला लावलें. स्टॅलिन हा अत्यंत अप्रामाणिक आणि अत्यंत संशयी माणूस होता असें क्रुश्चेव्ह कडवटपणें म्हणतो. स्टॅलिननें दुसऱ्या महायुद्धांत देशाचें अपरिमित नुकसान केवळ आपल्या दुराग्रहानें केलें. हजारों शूर सैनिक मारले गेले. मा. टिटोसारखा कम्युनिस्ट रशियाशीं दुरावला—एक ना दोन, अनेक गोष्टी क्रुश्चेव्हनें उघडपणें प्रथमच २० व्या. कॉंग्रेसला आलेल्या सहकाऱ्यांपुढें मांडल्या.

क्रुश्चेव्हचें भाषण ही कम्युनिस्टांच्या अितिहासांतील एक ' न भूतो ' घटना आहे यांत कांहींच शंका नाहीं. पण ह्या घटनेचा अर्थ काय ? म्हणजे असें कीं स्टॅलिनला शिव्या देण्याचें प्रयोजन काय ? स्टॅलिनला शिव्यांची लाखोली वाहिल्यानंतर कम्युनिस्ट बदलले, त्यांनीं ' स्टॅलिन-वाद ' म्हणून जो म्हणतात त्याला खरोखरीच मूटमाती दिली असें समजावयाचें काय ? ह्या नव्या बदलामागें खरेपणा किती नि राजनीति किती ? या सर्व नि यांसारख्या अितर अनेक प्रश्नांचीं उत्तरें मिळविण्यासाठीं आपल्याला स्टॅलिनच्या मृत्यूपासूनच्या गेल्या ४–५ वर्षांतील अितिहासाचा शोध घ्यावा लागेल.

१९५३ सालीं स्टॅलिनचा मृत्यु झाला. आतां रिकाम्या झालेल्या स्टॅलिनच्या गादीवर बसण्यासाठीं त्याच्या अनुयायांत चुरस उत्पन्न होऊन रशियांत अंतर्गत कटकटी सुरू होऊन तो दुर्बल होईल अशी कित्येकांना आशा वाटत होती. पण त्यांची पूर्ण निराशा झाली. कारण आजपर्यन्त एकटा स्टॅलिन ज्या गादीवर बसत असे त्या गादीवर मॅलेन्कॉव्ह, मोलोटोव्ह व बेरिया ही त्रिमूर्ति बसली—अगदीं समजूतदार शहाण्या मुलांसारखी ! पण त्यांच्यांत चुरस सुरू होणार ही अपेक्षा मात्र अगदींच चूक ठरली नाहीं. कारण एकाच्या गादीवर तिघांना जागा पुरणें शक्य नव्हतें. त्यांची आपापसांत रेटारेटी सुरू झाली. मॅलेन्कॉव्ह, मोलोटोव्हनें संगनमत करून बेरियाला खालीं ढकलून दिलें ! आतां उरलेल्यांत कोण कुणाला ढकलतो हें ठरायचें राहिलें......आणि अचानक चमत्कार झाला ! १९५५ सालच्या फेब्रुअरी महिन्यांत मॅलेन्कॉव्ह गादीवरून खालीं कोसळला, पण त्याला ढकलणारा मोलोटोव्ह नसून बुल्गॅनिन होता ! मोलोटोव्ह जरी मॅलेन्कॉव्हसारखा त्यावेळीं पडला नाहीं तरी त्यानें आपली जागा मात्र खालीं करून क्रुश्चेव्हला दिली. कारण क्रुश्चेव्ह त्याच-वेळीं पक्षाचा सरचिटणीस झाला होता आणि अशा रीतीनें शेवटीं बुल्गॅनिन-क्रुश्चेव्ह ही जोडी स्टॅलिनच्या गादीवर विराजमान झाली. ह्यावेळेपासूनच रशियांतील नव्या बदलाची खऱ्या अर्थानें सुरुवात झाली.

तेव्हांपासूनच रशियाचीं परराष्ट्रीय धोरणांतील पावलें वेगळीं पडूं लागलीं. भारतानें कित्येक वर्षांच्या एकाकी प्रयत्नांतून निर्माण केलेल्या तटस्थ आशियाई–आफ्रिकन राष्ट्रांची त्यानें मनधरणी करावयास सुरवात केली. चीनचे पंतप्रधान भारतांत येऊन त्यांनीं तिबेट प्रश्न सामोपचारानें सोडविला. त्याच वेळीं भारताच्या व चीनच्या पंतप्रधानांनीं सुप्रसिद्ध शांततापूर्ण सह-जीवनाचीं पांच तत्त्वें–'पंचशिलें'–उदघोषित केलीं. आणि रशियानें ताबडतोब तीं उचलून धरलीं. आजपर्यंत आक्रमक ठरलेल्या रशियानें अमेरिकेसकट सर्वांच्या शांततापूर्ण सहजीवनाची शक्यता मान्य केली. जगांतील सर्व राष्ट्रांशीं सांस्कृतिक, व्यापारी नि राजकीय संबंध प्रस्थापित करण्याचा

आमचा प्रयत्न आहे, असें त्यानें जगाला सांगितलें. इतरांनींहि तसेंच करावें असा उपदेश केला आणि याहि पुढें जाऊन 'रशियाचा मार्ग हाच साम्यवादाकडे जाण्याचा एकमेव मार्ग' हा आपला प्राणप्रिय सिद्धांत सोडून देऊन समाजवादाकडे जाण्याचे इतरहि मार्ग-उदा. युगोस्लाव्हियाचा-असूं शकतात, अशी कबुली दिली. त्या मार्गानें जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या युगोस्लाव्हियाशीं वागतांना आपण चूक केली असें प्रांजलपणें कबूल केलें; ती चूक सुधारण्यासाठीं मास्कोचें बडे लाट सारी लाजलज्जा गुंडाळून, नाक मुठींत धरून आपणहून बेलग्रेडला गेले. ज्या टिटोवर क्रुद्ध होऊन 'मॉस्कोच्या राजानें' "I shall shake my little finger and there will be no more Tito" असे उद्‌गार काढले होते त्या टिटोचा मास्कोला नेऊन बरोबरीच्या नात्यानें सन्मान करण्यांत आला; भारत, ब्रह्मदेश, अफगाणिस्तान, इंग्लंड या देशांना रशियन नेत्यांनीं भेटी दिल्या, त्या देशांच्या नेत्यांना रशियांत नेलें, अनेकांना रशियाभेटीचीं आमंत्रणें दिलीं, अनेक पत्रकारहि रशियांत जाऊं लागले; एवढेंच नव्हे तर जागतिक कम्युनिस्ट संघटना—जी देशोदेशींच्या कम्युनिस्ट पक्षांना पंचमस्तंभीय कारवाया करण्याचें मार्गदर्शन करत असे ती-बरखास्त केली. ऑस्ट्रियांतून आपल्या फौजा काढून घेऊन रशियानें त्याला स्वातंत्र्य दिलें नि विशेष म्हणजे १८ लाखांची सैन्यकपात जाहीर केली !—हें सर्व नव्या धोरणाबरहुकूम घडत होतें ! हा 'रशियांतील नवा बदल होता' !

ह्या नव्या बदलाचा अर्थ काय होता ? त्याचा अर्थ सोपा होता. आजपर्यन्तच्या स्टॅलिनच्या धसमुसळेपणामुळें कम्युनिझमच्या आक्रमक स्वरूपाची धास्ती घेऊन व दुसऱ्यांना दाखवून प्रतिस्पर्धी अमेरिका रशियाभोंवतीं लष्करी करारांचा वेढा टाकण्याच्या प्रयत्नाला लागली होती. अनेक वर्षें घोळांत पडलेला 'नाटो' करार, फ्रान्सचें जर्मनीच्या पुनर्लष्करीकरणाला बिचकून उधळणारें वारु आवरून, अमेरिकेनें उभा केला. रशियाच्या छातीवर रोखलेलें तें पहिलें भरलेलें पिस्तुल होतें ! त्यानंतर आपल्या मित्रराष्ट्रांत 'अँझूस', 'सीटो', 'मेडो', 'बगदाद' इ. करार घडवून आणून त्यांना सुसज्ज करण्यास व अशा रीतीनें रशियाच्या गळ्याभोंवतींचा फांस आवळण्यास अमेरिकेनें सुरुवात केली. रशिया कोंडींत सांपडल्याचा देखावा कांहीं काळ जगाला दिसला. पण रशियानें कोंडी फोडली ! त्यानें अचानक पवित्रा बदलला ! "आम्हीच नाटोंत येतों" असें म्हणायला त्यानें सुरुवात केली ! रशियाच नाटोंत आला तर करार करायचा कशासाठीं ? कुणाच्या आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठीं ?--अर्थात् ही रशियन भेदनीति काम करूं शकली नाहीं तरी या साऱ्या करारांचा प्राण कशांत आहे ही गोष्ट तिनें पूर्ण ओळखली. २९ मे ५६ च्या अंकांत 'टाईम्स' चा खास बातमीदार लिहितो. "Stalin had forged the unity of the people of Europe by waging the cold-war mostly on the political plane. The folly of thier policy was now clearly understood by the Kremlin. *Take away the threat that brought these countries of Europe together and they will at once fall apart.—this motley group of nations who have not known unity in peace at any time in history* "—रशियाच्या शांततापूर्ण सहजीवनाच्या भाषेचा अर्थ असा चांगल्या तऱ्हेनें लागेल ! अमेरिकेनें उभ्या केलेल्या भक्कम लष्करी तटबंदीला फोडण्यास तसलेंच करार असमर्थ ठरतात हें रशियाला वॉर्सा करारानें कळून आलें आणि मग तो एकदम सहजीवनावर आला ! 'तुम्ही आम्ही एकत्र राहूं' असें म्हणायला लागला. हा रशियांतील नवा बदल होता.

ह्या नव्या बदलाचा सुपरिणाम लगेच रशियाला दिसूं लागला. रशियाच्या नव्या धोरणामुळे

रशियन आक्रमणाची भीति थोडीशी विरल्यासारखी दिसूं लागतांच नाटोसारख्या खर्चिक लष्करी संघटनांच्या उपयुक्ततेविषयीं सभासद राष्ट्रांना शंका वाटूं लागली. " For NATO is an instrument of war; it was effective so long as the threat from the other side of the iron curtain was obvious and imminent. If that threat goes or if Moscow can make it appear substantially gone NATO which has no use for peace and which costs $ 312000 Billion a year ( 1954 ) to its members, loses its justification. " असें 'टाईम्स' चा बातमीदार १९५४ सालीं पॅरीसला नाटो राष्ट्रांची परिषद भरली होती त्यावेळीं लिहितो; एवढेंच नाहीं तर 'Suspicion about the very survival of NATO as a living organism until 1959 when the Treaty is due for revision is expressed in the Western Capitals. " असें त्यानें लिहिलें होतें. यावरून रशियानें आंखलेलें नवें धोरण किती अचूक होतें व त्यांतील नवा बदल त्याला किती फायदेशीर होता हें लक्षांत येईल.

आजपर्यंत सैन्यकपातीच्या बाबतींत 'रशिया वाटेल त्या अटी घालतो. शस्त्रकपातीस तयार होत नाहीं.' असा पाश्चात्यांनीं बोभाटा चालविला होता. १८ लाखांची सैन्यकपात करून रशियानें त्यांचीं तोंडें बंद पाडलीं ! जगाची सहानुभूति रशियाकडे वळली, नि दांभिकपणा पाश्चात्यांच्या पदरीं आला ! ह्यांतील बहुतेक सैन्य ऑस्ट्रियांतून माघारी आलेलें म्हणजे काम संपलेलेंच होतें. त्याचा उपयोग इतर उत्पादनाकडे करण्याची सवड रशियाला मिळालीच, पण त्याशिवाय पाश्चात्यांना हिणवायलाहि जागा झाली. हा रशियांतील नवा बदल होता !

केव्हां, कुणाचा नि कसा उपयोग करून घ्यायचा हें कळणें याचाच अर्थ मुत्सद्देगिरी असणें हा होय. या बाबतींतहि रशियन नेत्यांनीं आपली चलाखी व्यक्त केली. तटस्थ राष्ट्रगटांचें महत्त्व व वाढतें सामर्थ्य, आशिया-आफ्रिकेंतीलच नव्हे तर युरोपांतील देशांना वाटूं लागलेलें तटस्थतेचें आकर्षण, ह्याचा वेळींच अदमास घेऊन रशियानें भारताची आणि त्यानें सांगितलेल्या पंचशीलांची एकसारखी स्तुति आरंभिली. १५ एप्रिल ५६ च्या 'टाईम्स' मध्यें श्री. डॉन पेसॉस 'The Peace-area is widening' ह्या लेखांत म्हणतात--" By a shrewd and a timely turn of policy the Soviet Union has recognised the importance of the vast uncommitted world...since the Communist Bloc has been wooing the neutralist countries accepting neutrality as a healthy political condition and offering economic and technical aid to such countries to build up their economies. "

आतांपर्यन्तच्या विवेचनावरून हें लक्षांत येईल कीं रशियांतील नवा बदल खराखुरा, जागतिक शांतता चिरकाल नांदावी या हेतूनें घडून आलेला नसून ती एक राजनीति होती. पंडितजींसारख्यांच्या हें लक्षांत आलें नसेल असें समजणें केवळ मूर्खपणाचें आहे. मग असें असतांनाहि पंडितजी या बदलाचें स्वागतच करीत होतें याचें कारण काय ? याचें कारण असें कीं, त्यामुळें जागतिक तणातणी कमी होण्यास मदत होत होती. कॉमिन्फार्मची बरखास्ती, १८ लाखाची सैन्यकपात, शांततापूर्ण सहजीवनाची रशियानें दिलेली कबुली, यामुळें मध्यंतरीं जगांतील तंग वातावरण खूपच निवळलें होतें हें कुणालाच नाकबूल करतां येणार नाहीं; आणि म्हणून रशियांतील नवा बदल राजनैतिक असला तरी स्वागतार्हच होता.

आतां या संदर्भांत क्रुश्चेव्हच्या भाषणाचा विचार केल्यानंतर 'स्टॅलिनला शिव्या देण्याचें प्रयोजन काय,' या आपल्या प्रश्नाचें उत्तर मिळेल. वर सांगितलेल्याप्रमाणें परराष्ट्रीय राजकारणा बाबतच्या घोडचुका स्टॅलिननें केल्या. स्टॅलिनच्या आडमुठ्या व धसमुसळ्या धोरणामुळें शत्रूचा गोट सुसंघटित व सुसज्ज झाला. स्टॅलिननें बाह्य जगाचा संबंध संपूर्ण तोडल्यामुळें रशियाभोंवतीं गूढ वलय निर्माण झालें. ह्या पोलादी पडद्याआड कांहीं भयंकर चाललें आहे अशी धास्ती घेऊन अमेरिका आदि राष्ट्रें दारुगोळा-शस्त्रास्त्रांनीं सज्ज बनलीं, थंडया लढाईत 'माझ्या बाजूचा नाहींस तर मग तूं शत्रूकडचा' या सनातन राजनीतीचा अवलंब केल्यामुळें भारतप्रणीत तटस्थ राष्ट्रांच्या सुप्त सामर्थ्याचें योग्य मूल्यमापन झालें नाहीं, त्यामुळें तीं नवोदित राष्ट्रेंहि रशियापासून दूर राहिलीं, आणि युगोस्लाव्हियासारखें 'आपलेंच' राष्ट्र दुरावण्यास त्याचाच दुराग्रह कारणीभूत झाला. परराष्ट्रीय धोरणाबाबतच्या त्या हिमालयाएवढया चुका स्टॅलिननें केल्याच पण त्याशिवाय श्री. मिनू मसानी म्हणतात त्याप्रमाणें "-स्टॅलिनवर क्रुश्चेव्हनें केलेल्या आरोपांमागें सोव्हिएट आर्थिक परिस्थितीचेंहि दडपण आहे. सोव्हिएट सामुदायिक शेतीचे प्रयोग अयशस्वी झाले, ग्राहकोपयोगी वस्तूंचा पुरवठा अपेक्षेप्रमाणें झाला नाहीं... कांहीं विशिष्ट क्षेत्रांत राज्यकर्त्यांना पराजय पत्करावा लागला.... त्यामुळें रशियन राजवटीसंबंधीं देशांत धुमसणारा असंतोष व परदेशांत निर्माण झालेली भीति-यांचा दोष कुणाच्या तरी गळ्यांत अडकवायचा होता. त्या कामीं त्याला मृत स्टॅलिनचा चांगला उपयोग झाला." आणि म्हणून २० व्या काँग्रेसमध्ये क्रुश्चेव्हनें स्टॅलिनचा नि स्टॅलिनवादाचा धिक्कार केला.

रशियानें सहजीवन मान्य केलें याचा अर्थ त्यानें जागतिक कम्युनिस्ट क्रांतीचें ध्येय सोडलें असा मुळींच नाहीं. 'Co-existence for them is a realistic rule of conduct and in no way implies the abandonment of the world-wide Communist Revolution '—Fred Luehsiyer ) त्याचप्रमाणें स्टॅलिनवादाचा धिक्कार, म्हणजे स्टॅलिनवादाचा त्याग असेंहि खरें नाहीं. हंगेरींतील स्वातंत्र्यवादी जनतेच्या हत्याकांडानें Destalinisation चें पितळ चांगल्या तऱ्हेनें उघडें पाडलें. स्वातंत्र्यवादी हंगेरियन कामगारांना फॅसिष्ट नि क्रांतिकारक ठरवून क्रुश्चेव्हनें त्यांच्यावर रणगाडे घातले. हजारों निरपराध बायकांमुलें हद्दपार केलीं. हंगेरींतील नरमेध पाहून ११ नोव्हें. ५६ च्या 'टाइम्स' मध्यें 'Stray Musings' या सदरांत 'Caliban' नें लिहून टाकलें—Hungary has shown that De-stalinisation so flamboyantly announced at the 20th congress has been quietly and thoroughly buried. Stalinism with all its accoutrements of terrorism and repression has returned and will remain so long as bayonets and bombs are available to support it. " आणि परवां क्रुश्चेव्हनें " when it comes to fighting imperialism we are all Stalinists " असें सांगून वरील उद्गारांचीच सत्यता सिद्ध केलीं नाहीं काय ?

अशा रीतीनें बुल्गॅनिन-क्रुश्चेव्ह अधिकारावर आल्यापासून सुरू झालेल्या व २० व्या काँग्रेसनें ठसठशीतपणें जगापुढें आणलेल्या रशियांतील तथाकथित नव्या बदलाचें एक पर्व हंगेरीच्या हत्याकांडानें समाप्त झालें आहे. दुसरें सुरू होत आहे. त्याचें स्वरूप अद्याप दिसायचें आहे. संपलेल्या पर्वाचा जो अल्पसा अभ्यास करण्याचा इथें प्रयत्न केला आहे त्यावरून चिरकालीन जागतिक शांततेच्या दृष्टीनें तें फारसें उत्तेजक नि आशादायक नव्हतें असें नाईलाजानें म्हणावें लागतें.

---

# वाढदिवसाची भेट

लेखक : **सु. रा. आंबेकर**–इन्टर सायन्स, ए.

घड्याळानें एकच ठोका दिला नि लिझा एकदम दचकून जागी झाली. थरथरत्या हातानें तिनें बटन दाबून दिवा लावला. दिव्याच्या त्या लख्ख प्रकाशांत तिला जरा हायसें वाटलें.

काय तें स्वप्न ! जितकें अजब तितकेंच भयंकर. तो प्रासादतुल्य बंगला, दाराशींच ऐटींत नि ताठ उभे असलेले ते संगिनी घेतलेले दोन पहारेकरी, पोर्चमध्यें दोन कारस् एक निळी अन् दुसरी तिला आवडणारी चॉकलेटि, सारेंच राजशाही पण विलक्षण होतें. ती एखाद्या अल्लड बालिकेप्रमाणें दुडदुड पायऱ्या चढत वर गेली. त्या भव्य दिवाणखान्यांत एका कोचावर पेरी बसला होता. होय पेरीच तो ! पुरें वर्षसुद्धां झालें नव्हतें त्या दोघांच्या विवाहाला. आणि अगदीं बालपणापासून एकत्र खेळलीं होतीं तीं दोघेजण. मग कितीहि रुबाबदार पोषाख केला तरी त्याला ओळखल्याशिवाय ती थोडीच राहते ?

अलगद हातांनीं तिनें त्याचे डोळे झांकले. तितक्याच अलगदपणें त्यानें ते बाजूला केले नि झटकन् वळून तो हंसत म्हणाला, " माणसाला पुष्कळवेळां डोळ्यापेक्षां स्पर्शानेंच अधिक समजतें. बघ लिझा. डोळे झांकलेस म्हणून थोडीच दिसायची राहणार आहेस ! " " बर, बर ! माहीत आहे मोठा स्पर्शतज्ज्ञ आहेस तें. जरा खालीं बागेंत चलशील कां ? कांहीं वेळ फुकट जाणार नाहीं म्हटलं हॅम्बुर्गच्या गव्हर्नरचा. " आणि असें म्हणत ती त्याला ओढूं लागली. " अग, पण चालता येतं मला चांगलं. या तुझ्या हाताच्या पांगुळगाड्याची जरूर नाहीं. " असें एकीकडे म्हणत व दुसरीकडे तिचे हात अधिकच दाबून धरत तो खालीं आला.

खरोखर ती बाग म्हणजे छोटेंसें नंदनवनच होतें. त्यांत फळझाडांपेक्षां फुलझाडांचाच भरणा अधिक होता. कारण लिझाला फुलांची लहानपणापासूनच आवड. त्यामुळें त्या बागेंत फुलांचें संमेलनच भरलें आहे कीं काय असें वाटत होतें. लिझानें लहानपणापासून मनांत रेखाटलेली बागच साकार झाली होती. मध्यभागीं शोभणारें तें कारंजें– त्यांतील तुषार अहमहमिकेनें वर उडत होते आणि त्या दोघांच्या वैभवाचे तुषारहि तसेच वर उडूं लागले होते.

होय. तसेच वर उडूं लागले होते. पेरी आतां हॅम्बुर्गचा गव्हर्नर झाला होता. हॅम्बुर्गचा गव्हर्नर ! क्षणभर खरेंसुद्धां वाटेना तिला. गव्हर्नर म्हणजे काय, हॅम्बुर्ग म्हणजे काय, नि काय म्हणजे काय ? अगदीं भांबावून गेल्यासारखी दिसत होती ती. इतकें वैभव तिनें आजपर्यंत पाहिलेंहि नव्हतें. ते कारंजाचे तुषार ! किती मनोहर दिसत होते वर जातांना ! आणि मग ते झरकन् खालीं येत. होय ! झरकन् खालीं येत. झरकन्––!

कारंजाचे तुषार, वैभवाचे तुषार, खालीं आणि वर ! काय गंमत आहे. तिला मात्र हें कांहींच समजत नव्हतें. संभ्रमित मनःस्थितींत तिनें एका नाजूक फुलाला हात घातला. पण हें काय ? हे काटे कसले बोचले ? एक–दोन–तीन–चार ! आणि सर्वच झाडांवर फुलांच्या जागीं काटे दिसूं लागले.

तत्काळ तो बंगला जीर्ण दिसूं लागला. तें कारंजें थांबलें आणि संगिनी घेतलेले दोन पहारेकरी धांवत आले. एकानें आपली संगीन पेरीवर रोखली आणि दुसऱ्यानें चटकन् त्याच्या हातांत बेडया चढवल्या, बेडयांचा खळकन् आवाज झाला.

आणि त्या आवाजासरशीं ती दचकून जागी झाली. अजूनहि तें स्वप्न संपलेलें नाहीं असें तिला वाटत होतें. तो बेडयांचा आवाज अजूनहि तिच्या कानांत घुमत होता. तिनें नकळत कानावर हात ठेवले.

आतां नाना तर्कवितर्क तिच्या मनांत थैमान घालूं लागले. तो बंगला, तो बगीचा, ते पहारेकरी नि त्या बेडया. खरंच, काय बरं संबंध असावा एकमेकांचा ? कां पेरीच्या जिवाला कांहीं बरं वाईट... ? हा विचार मनांत येतांच ती पुन्हां एकदां दचकली. पेरी ! तिचें सर्वस्व असलेला पेरी !

आणि मग जर त्याच्या ज़िवाला कांहीं बरें वाईट झालें असेल तर ? तर तो आपल्या लग्नाच्या वाढदिवसाल कसा येणार ? लग्नाचा पहिला वाढदिवस ! कसलीतरी अननुभूत सूक्ष्म आनंदाची संवेदना तिच्या शरीरांतून चमकून गेली.

लग्नाचा पहिला वाढदिवस ! छे : ! एव्हाना वास्तविक यायलाच पाहिजे होतं त्यानें. आतां येईल तो अगदीं आदल्या दिवशीं नि मग नेहमींचेंच रजेचें कारण पुढें करील. तें कांहीं नाहीं. उद्यांच त्याला पत्र लिहिलें पाहिजे, पण त्यापेक्षां तारच करावी.

पण दुसऱ्या दिवशींच्या पेपरमध्यें तिनें जें वाचलें त्यामुळें तिचे सगळेच बेत विरून गेले. साध्या सैनिकालाच काय पण मोठमोठ्या अधिकाऱ्यांनाहि सरकार एक दिवसाची सुद्धां रजा देत नव्हतें. उलट रजेवर गेलेल्यांनाच परत बोलावलें जात होतें.

" म्हणजे हा कांहीं आतां येत नाहीं " किंचित् निराशेनेंच ती स्वतःशीं पुटपुटली. तिच्या सगळ्या योजनांवर, आंखलेल्या आकर्षक कार्यक्रमांवर पाणी पडलें. आणि त्याच दिवशीं दुपारीं त्याचें स्पष्ट पत्रच आलें.

" रजा न मिळाल्यानें मला येतां येत नाहीं. तूंच इकडे निघून ये. म्हणजे अनायासें हॅम्बुर्ग पहायला सांपडेल. " शेवटीं त्यानें ता. क. लिहिला होता, " आतां ही रजेची कटकट कायमची संपेल बघ लिझा. मग पुन्हां तुझी कधींच निराशा करणार नाहीं. या वाढदिवसाला काय मागशील ती भेट देणार आहें मी तुला. "

तिला आदल्या रात्रीचें स्वप्न आठवलें. त्या ता. क. नें कांहींच उलगडा होईना तिला. स्वप्नावर विश्वास नसूनहि तिला वाटूं लागलें कीं पेरी खरोखरच हॅम्बुर्गचा गव्हर्नर झाला आहे. आपण त्याच्याबरोबर त्या नंदनवनसमान बगीचांत फिरत आहोंत. तीं फुलें आपण तोडलीं. पण पुढें कल्पनाच करवेना तिला. केव्हां एकदां आपण पेरीला जाऊन भेटतों असें तिला होऊन गेलें.

ती गाडींत बसून तें पत्र पुन्हां पुन्हां वाचत होती, त्या ता. क. विषयीं विचार करीत होती. त्यावेळीं पेरी आपल्या खोलींत चरफडत, वरिष्ठ अधिकाऱ्याला शिव्या मोजत होता.

" नाहीं. मुळींच रजा मिळणार नाहीं. " लग्नाच्या पहिल्या वाढदिवसाला एक दिवसाची-सुद्धां रजा नाहीं ! 'लग्नाच्या पहिल्या वाढदिवसाची लज्जत सारा जन्म आडदांड लष्करांत घालवलेल्या या तिरसिंगरावाला काय कळणार ? ' तो स्वतःशींच पुटपुटला.

खरें म्हणजे लष्करांत गेल्यापासूनच तो चिडखोर बनला होता. कुणीकडून या रगाडयांत येण्याची दुर्बुद्धि आपणाला सुचली असें त्याला वाटूं लागलें. या आयुष्यांत सहानुभूतीचा, मायेचा एकहि स्फुलिंग त्याला आढळेना. दिवसभर थंडीची, बर्फाची, अन्नपाण्याची पर्वा न करतां, जिवाची शाश्वति सोडून धांवपळ करावी, वाटेल तेथें लपावें, दोन दोन दिवस झोंपहि घेऊं नये नि इतके कष्ट सोसून साधी एक दिवसाची रजादेखील मिळूं नये. पगारांतील शिल्लक बँकेंत होती ती सरकारनें तात्पुरती वापरण्यास घेतली होती. हे सर्व कष्ट सोसण्यापेक्षां खेडयांत लिझाबरोबर गरिबीनेंच राहिलेलें बरें असें त्याला आतां वाटूं लागलें. युद्ध संपण्याची तो आतुरतेनें वाट पाहूं लागला.

युद्ध संपूं लागल्याचीं चिन्हें दिसत होतीं. पण जर्मनीचा सर्वत्र पराभव होऊं लागला होता. अशा रीतीनें युद्ध संपलें तरी त्या आनंदांत कांहींच अर्थ नव्हता. पराभूत राष्ट्राचा सैनिक म्हणून त्याला कैद व्हावें लागणार होतें; कदाचित् ठारहि व्हावें लागलें असतें. कैद झालेल्या सैनिकांना किती क्रूरतेनें वागवीत हें त्यानें ऐकलें होतें. सैन्यांत अधिकारी झाल्यापासून कितीतरी दोस्त राष्ट्रांच्या कैद्यांना त्यानें फांशीची शिक्षा फर्मावली होती. आणि ती शिक्षा आतां कदाचित् त्याला स्वतःला अनुभवावी लागणार होती. आपण फांशीं गेलों तर लिझाचें काय होईल? त्याला कल्पनासुद्धां करवेना. किती विश्वासानें आपल्या छातीवर मस्तक रुळवते ती! अन् त्या विश्वासाचा घात करून तिला एकाकी टाकून जायचें! तिच्या साऱ्या सुखस्वप्नांवर पाणी ओतायचें! उमलूं लागलेलें तिचें यौवनपुष्प चुरगळूं द्यायचें!

आतां जर्मनीचा पराभव होणार हें उघड दिसत होतें. पराभवानंतरचीं सारीं भयानक चित्रें त्याच्या डोळ्यांपुढें नाचत होतीं. दोस्तांनीं आतां बर्लिन पाडण्याचा चंग बांधला होता. आज ना उद्यां तें पडणार होतें. अशा स्थितींत हॅम्बुर्ग दोस्तांच्या ताब्यांत गेलें तर त्यांना बर्लिन जिंकणें सोपें जाणार होतें. त्यासाठीं वाटेल तीं कारस्थानें दोस्त सैन्यें करूं पाहत होतीं.

त्या कारस्थानांना तो बळी पडला होता. त्याला स्वतःला समजत होतें कीं आपण देशद्रोह करीत आहोंत. हॅम्बुर्गच्या रक्षणाची जबाबदारी त्यावेळीं त्याला पेलायची होती. जिवाचा धडा करूनहि तें करतां येणें अशक्य होतें. पण पराभव पावून, कैद होऊन लिझाला कायमचें मुकण्यास तो तयार नव्हता. जगण्याची, सुखानें जगण्याची, केवळ लिझासाठीं जगण्याची अनिवार इच्छा त्याला होती.

"स्टेशनवर न्यायलासुद्धां आला नाहींस ना?" पेरीच्या बंगल्यासमोर टॅक्सींतून उतरत असतांना तिनें विचारलें.

"वेळ असतां तर स्टेशनवरच काय पण एकदम घरींच आलों असतों तुला न्यायला." त्यानें हंसत हंसत उत्तर दिलें.

"फार महाग दिसतोय् तुला वेळ" दिवाणखान्यांत प्रवेश करीत तिनें म्हटलें. "फार म्हणजे किती सांगूं तुला? तुझं पत्रसुद्धां वाचायला वेळ मिळत नाहीं." पेरी पुनः हंसत हंसत उद्गारला. "हें बघ, मी आतां डयूटीवर जातों आहे. म्हणजे असं कीं जाणं भागच आहे. जेवण तयार आहे. हीं इकडे मासिकें पडलीं आहेत. संध्याकाळपर्यंत वेळ काढ हं." आणि असें म्हणून तिच्या उत्तराची वाटहि न पाहतां तो निघून गेला.

खुर्चीवर बसून तिनें सभोंवार नजर फिरविली. दिवाणखान्यांतील भिंतीवर दोन-तीन नकाशे व लढाऊ विमानांचीं कांहीं मोठीं चित्रें टांगलीं होतीं. टेबलावर चार पांच मासिकें व एक वर्तमानपत्र होतें. मासिकें जर्मन होतीं पण वृत्तपत्र मात्र इंग्लिश होतें. भिंतीला लागून एक लहानसें ड्रेसिंग टेबल होतें. कंगव्यासाठीं सहज तिनें टेबलाचें ड्रॉवर उघडलें तों आंत दोन रिव्हॉल्व्हरस् दिसलीं. "घरसुद्धां अगदीं रणांगण बनवून टाकलं आहे यानें." ती स्वतःशींच उद्‌गारली.

संध्याकाळीं चारच्या सुमारास पेरी घरीं आला. दोघांनीं चहा घेतल्यावर त्यानें तिला फिरायला नेलें. तीं दोघेजण बीचवर फिरावयास गेलीं. आतां तो किती खुशींत दिसत होता. तिची सारखी चेष्टा करीत होता. तिचे केस मुद्दाम विस्कटून टाकीत होता. तीं दोघेंजण एका बाकावर बसलीं. तिच्या केसांतून आपलीं बोटें फिरवीत तो तिला सांगत होता, "लिझा, आतां लवकरच मी या कटकटींतून सुटेन बघ. मग आपण इथेंच राहूं. इथेंच वाढदिवस साजरा करूं. बोल! काय भेट देऊं तुला वाढदिवसाला? मोठा बंगला, टूरिंग कार, मनोहर बाग, काय वाटेल तें माग." आणि हें सर्व ऐकून तिला फार आनंद होत होता. आपल्याला पडलेलें स्वप्न साकार होत आहे असें तिला वाटलें. पण तिनें तें त्याला सांगितलें नाहीं. त्याला अधिकच बिलगून तिनें फक्त विचारलें, "कुठून आणणार तूं एवढं सगळं?" "वेडी कुठली! कुठूनहि आणीन. माझ्या लिझेसाठीं काय वाटेल तें करीन." तिची हनुवटी वर उचलीत तो म्हणाला.

"माझ्या लिझेसाठीं काय वाटेल तें करीन." किती मधुर शब्द! जीवनांतील सारें माधुर्य, सारें सौंदर्य, सारा अधिकार त्या शब्दांत– ज्यासाठीं प्रत्येक स्त्री आसुसलेली असते– त्या शब्दांत साठून राहिला होता.

× × ×

कां कुणास ठाऊक पण मध्यरात्रीं एकच्या ठोक्याला ती जागी झाली. तिला मागच्याप्रमाणें कांहीं आश्चर्यकारक स्वप्न पडलें नव्हतें. परंतु निद्रा ही लक्ष्मीप्रमाणेंच चंचल असावी. कांहींहि कारण नसतांना ती जागी झाली. सर्वत्र नीरव शांतता पसरली होती. पण ही शांतता कृत्रिम आहे, वादळापूर्वींची आहे–असा भास तिच्या मनाला राहून राहून होत होता.

कसलीतरी कुजबूज ऐकल्यासारखें तिला वाटलें. क्षणभर ती दचकली. पण दुसऱ्याच क्षणीं तिनें स्वतःला सावरलें. त्या आवाजाच्या दिशेनें ती एक एक पाऊल श्वास रोखून टाकूं लागली. ती पेरीच्या खोलीपर्यंत आली व तेथेंच थांबली. होय. कारण आतां ती कुजबूज अगदीं स्पष्टपणें ऐकूं येत होती. पेरीची खोली! या शब्दांना तिच्या दृष्टीनें कांहींच अर्थ नव्हता. आजपर्यंत रात्रीं तिच्यापासून दूर स्वतंत्र खोलींत तो कधींच झोपला नव्हता. आणि आज लिझा इतक्या दिवसांनीं भेटली असतांना व तिनें अत्यंत आग्रह केला असतांनाहि तो दुसऱ्या खोलींत झोपला होता.

भीतभीत तिनें दाराच्या फटींतून पाहिलें. मध्यभागीं टेबलावर एक मेणबत्ती जळत होती. टेबलाभोंवतीं पेरी व दोन अनोळखी माणसें बसलीं होतीं. त्यांपैकीं एक ब्रिटिश व दुसरा फ्रेंच आहे हें तिनें तेव्हांच ओळखलें. ते दोघेहि अत्यंत खालच्या आवाजांत परंतु जर्मन भाषेंत बोलत होते. त्यांचें संभाषण ऐकण्याचा मोह तिला आवरेना. आपल्या साऱ्या शक्ति जणूं कानांत एकवटून ती ऐकूं लागली.

एखाद्या गोष्टीचें ज्ञान झाल्यावर तें झालें नसतें तर बरें झालें असतें असें वाटूं लागतें.

लिझाला आतां एकदम तसेंच वाटूं लागलें. हें भाषण आपण चोरून ऐकण्याची काय जरूरी होती ? किंवा हा निव्वळ भास असला तर ?

पण आतां तो भास मुळींच नव्हता. तें एक कटु सत्य होतें. आणि सत्य हें बहुधा कटुच नसतें कां ? तिचा पेरी फितूर होत आहे–नव्हे झाला आहे–हें ती प्रत्यक्ष पहात होती, ऐकत होती. आणि महत्प्रयासानें मनाला समजावीत होती. या फितुरीबद्दल बक्षीस म्हणून तो हॅम्बुर्गचा गव्हर्नर होणार होता, लिझाला मोठा बंगला, टुरिंग कार, मनोहर बगीचा, सारें कांहीं देणार होता; रजेची कटकट कायमची संपवणार होता आणि लिझाला वाढदिवसाला राष्ट्रद्रोहाच्या भीषण पायावर आधारलेली लक्ष्मीची इमारत भेट देणार होता. दुसऱ्या दिवशीं सकाळीं १० च्या आंत महत्त्वाचीं कागदपत्रें सांकेतिक खाणाखुणांसह दोस्तांच्या ताब्यांत देऊन हॅम्बुर्गचा म्हणजेच पर्यायानें बर्लिनपाठोपाठ जर्मनीचा घास दोस्तांच्या तोंडांत भरवणार होता आणि त्या तोंडांतून उडालेल्या संपत्तीच्या शितांवर समाधान मानणार होता. एखाद्या कचकड्याच्या बाहुलीप्रमाणें लिझाला समजून तिलाहि त्या खरकट्या शितांत लडबडायला लावणार होता. पूर्वीच्या स्वप्नांतील तो बंगला, ते सैनिक, तो बगीचा, त्या बेड्या, सर्वांचा एका क्षणांत तिला उलगडा झाला. ' Future events are mirrored in dreams ' या पूर्वी कोठेंतरी वाचलेल्या उक्तीचा तिला आतां प्रत्यय येत होता.

आणि आतांपर्यंतचा स्वप्नाचा भाग जर खरा ठरत होता तर त्या स्वप्नाचा शेवटहि कां खरा ठरूं नये ? किंबहुना तो खरा करणें आपलेंच कर्तव्य आहे असें तिला वाटूं लागलें.

आपल्या हातांनीं पेरीच्या हातांत ......! तिच्या छातींत कळ आल्याप्रमाणें वेदना झाल्या. तिला पुढें कल्पनाच करवेना. माशाला पाण्यांतून वाळूंत टाकतांना, बालकाला मातेपासून दूर ओढतांना, वेलीचा आधारभूत वृक्ष तोडतांना, त्यांना काय वाटत असेल ? तिच्या नुकत्याच फुलूं लागलेल्या जीवनवेलीचा एकुलता एक आधारवृक्ष पेरी ! त्याला आपल्याच हातानें खच्ची करायचें ?

हो. तिच्या अन्तःकरणांतून कुठूनतरी निश्चयात्मक आवाज आला. "तुझ्यासारख्या असंख्य वेलींच्या रक्षणासाठीं तुला हें करणें भाग आहे." तो आवाज जणूं तिला सांगत होता.

टाक खालीं ठेवल्याचा आवाज झाला. पेरीनें कागदावर सही केली होती. जड अन्तःकरणानें ती अंथरुणावर येऊन पडली. तीं दोन माणसें हलकेंच निघून गेल्याचें तिनें ओळखलें. तिच्या अन्तःकरणांत भावना नि कर्तव्य यांचें द्वंद्व चालूं होतें. तिचा पेरी तिला हवा होता; परंतु तो राष्ट्रद्रोहानें कलंकित झालेला नको होता. त्यापेक्षां अत्यंत गरिबींत, आपल्या खेड्यांत राहणें तिला खचित परवडलें असतें.

घड्याळानें दोनचे टोले दिले. तिला वाटलें त्याला जागें करून शुद्धीवर आणावें. परंतु तो सही करून चुकला होता. आणि शिवाय तो जितका प्रेमळ तितकाच करारी होता. आपलें वचन आतां त्यानें मुळींच मोडलें नसतें.

ती निश्चयानें उठली. त्याच्या बिछान्याजवळ गेली. किती शांतपणें झोंपला होता तो! जणूं भावी सुखसंपत्तीचीं सुखस्वप्नेंच त्याच्या चेहऱ्यावर विलसत होतीं. पण तीं क्षणिक आहेत हें तो बिचारा विसरला होता. तिनें हलकेंच त्याच्या केंसांवरून हात फिरवला. त्याचें चुंबन घेण्याचा मोह तिला अनावर झाला होता. पण मोठ्या कष्टानें तिनें तो आवरला. आतां सारेच मोह तिला

आवरणें भाग होतें. दिवाणखान्यांत जाऊन तिनें टेलिफोनला हात घातला. टेलिफोनचा गार स्पर्श होतांच आपलें शरीरहि जणूं गार पडत आहे असें तिला वाटलें. कशीबशी दोनच वाक्यें ती बोलली. एखादा लहान मुलगा प्रथमच बोलायला शिकतांना जसा बोलतो तसा तिचा आवाज होता. थरथरत्या हातानें तिनें टेलिफोन खालीं ठेवला. सारें जग आपल्यावर कोसळून पडल्याचा तिला भास झाला. धांवत धांवत ती पेरीच्या बिछान्यावर गेली. तिनें त्याला घट्ट मिठी मारली. 'पेरी, पेरी' अशा हांका मारीत ती त्याचीं चुंबनावर चुंबनें घेऊं लागली.

"काय झालें लिझा ?" एकदम जागे होऊन त्यानें विचारलें. पण तिला उत्तर देतां येत नव्हतें. त्याच्या छातीवर डोकें ठेवून ती रडत होती. तिला काय झालें होतें हें तिलाच आतां माहीत नव्हतें. तिला सर्व कांहीं झालें होतें. जें होणार तें आतां टळणार नव्हतें. जें व्हायचें तें होऊन चुकलें होतें.

"पेरी, आपला वाढदिवस-वाढदिवस" ती हुंदके देत म्हणत होती. 'काय भेट देऊं तुला मी ? तुला माझी भेट आवडणार नाहीं पेरी. आवडणार नाहीं."

"वेडी कुठली ! तुझी कोणतीहि भेट मला आवडेल. बघूं काय देणार आहेस मला ?" तिचे हात घट्ट धरीत त्यानें विचारलें ? 'पेरी' एवढा एकच उद्‍गार तिनें काढला. बेड्यांचा खळकन् आवाज झाला. समोर मिलिटरी पोलिस उभे होते.

---

# श्रमदानाची आवश्यकता

लेखक-**शरद घाटे**. ज्यू. बी. ए.

महाविद्यालयाची पदवी देतांना विद्यार्थ्यांवर श्रमदान करण्याची अट असावी अथवा नसावी, अशी चर्चा मधूनमधून कानांवर येते. कांहीं वर्षांपूर्वी मुंबई सरकार यासंबंधीं एक कायदा करण्याचा विचार करीत होतें. तो कायदा असा कीं, मॅट्रिकचें प्रशस्तिपत्र देण्यापूर्वी प्रत्येक विद्यार्थ्यानें एक वर्षभर खेड्यांत श्रमदान करावें. जो विद्यार्थी अशा तऱ्हेनें एक वर्ष श्रमदान करील त्यासच मॅट्रिकचें प्रशस्तिपत्र द्यावें. सुदैवानें असो वा दुर्दैवानें असो, ही योजना पुढें आलीच नाहीं. मात्र मला आज एक नवीनच विचार सुचतो. तो असा कीं, कसलेंहि प्रमाणपत्र द्यावयाचें असलें तरी त्यापूर्वी परीक्षकांनीं उमेदवारानें केलेल्या श्रमदानाचा संपूर्ण तपशील पाहून मगच त्यास प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घ्यावा. हा विचार करतांना मी 'श्रमदानाचा' थोडासा व्यापक अर्थ मनांत धरला आहे, आणि तोच मी या लेखांत स्पष्ट करणार आहें.

आजकाल प्रचंड संख्येनें विद्यार्थी विश्वविद्यालयाच्या पदव्या घेऊन बाहेर पडत आहेत व नंतर प्रत्यक्ष जीवनक्षेत्रांत उतरत आहेत. खरोखरीच ते या क्षेत्रांत लायक म्हणूनच प्रवेश करतात का ? प्रत्यक्ष काम करतेवेळीं जीवनक्षेत्रांत ते टिकतात कां ? तग धरूं शकतात कां ? हे पदवीधर ज्या क्षेत्रांत काम करतात, तेथील अधिकाऱ्यांचीं मनें याविषयीं साशंक आहेत. बी. ए. अथवा बी. कॉम. झालेले उमेदवार जेव्हां कारकून म्हणून काम पाहूं लागतात तेव्हां त्यांना १० ओळींचें पत्रशुद्ध, बिनचूक व मुद्देसूद लिहितां येत नाहीं, अशी ओरड कानांवर येते. एकादा विषय स्वतःच्या

भाषेंत सरस मांडणें त्याला जमत नाहीं, अशी तक्रार आहे. आर्टसच्या पदव्यांच्या बाबतींत हें फारच बोललें जातें व त्यामुळेंच 'आर्टस' च्या पदव्यांची किंमत उतरली आहे. वास्तविक आर्टसची पदवी देतांना उमेदवार एकादा विषय कशा तऱ्हेनें मांडतो याची चाचणी घेतली जाते. त्याचा विषय त्याला कितपत समजला आहे, त्या विषयावर त्यानें स्वतःच्या दृष्टिकोनांतून विचार केला आहे किंवा नाहीं, असा स्वतंत्र विचार करण्याची शक्ति त्याचेजवळ किती प्रमाणांत आहे, आपला विषय दुसऱ्याला चांगल्याप्रकारें समजावून सांगण्याची त्याची पात्रता आहे कीं नाहीं या गोष्टीचा विचार पदवी देतांना केला जातो. परंतु अशी पदवी घेतलेला उमेदवार प्रत्यक्ष जीवनांतील कोणतीहि गोष्ट करण्यास नालायक ठरतो, असेंच अधिकारी अनुभवानें सांगतात.

असें होण्याचें कारण, मला वाटतें हें कीं, परीक्षा घेण्याचा व उत्तीर्ण होण्याचा आमचा हेतूच चूक आहे. परीक्षा पास होणें ही वेगळीच कला आहे. परंतु एखादें प्रमाणपत्र ( certificate ) देतेवेळीं मात्र ज्या विषयाचें सर्टिफिकेट द्यावयाचें त्या विषयाचें खरें ज्ञान, खरी विद्या-त्या विद्यार्थ्यांचे अंगीं पूर्णपणें बाणली आहे कीं नाही हें पाहूनच-प्रमाणपत्र देण्यांत आलें पाहिजे. उत्तम स्वयंपाक करून दाखवणाऱ्या स्त्रीलाच 'स्वयंपाकप्रवीण' ही पदवी द्यावी. तिच्या 'स्वैपाकशास्त्राच्या' उत्तरपत्रिका उत्कृष्ट होत्या म्हणून नव्हे. योग्य वेळीं योग्य राग म्हणून दाखवून श्रोत्यांच्या मनांत तो तो रस सहजपणें निर्माण करणाऱ्या गायकालाच 'गंधर्व' ही पदवी द्यावी-सुरेल गळ्यांत रडणाऱ्या रडतराऊला देऊं नये. वादनकलेबद्दल हेंच म्हणतां येईल. हाच नियम आपल्या विद्यापीठाच्या विषयांच्या बाबतींतहि लावला पाहिजे. एखाद्यानें केवळ ३५ टक्के गुण मिळविले याचा अर्थ त्याला आपल्या विषयांत प्राविण्य मिळालें असा नव्हे. निदान ५० टक्के गुण त्यानें मिळविले असले तरच त्या विषयाचा पुढील अभ्यास करण्यास तो विद्यार्थी योग्य समजून त्यास तसें प्रमाणपत्र द्यावें. या ५० टक्क्यांच्यासाठींच श्रमदानाची आवश्यकता आहे. यासाठीं प्रत्यक्ष काम करण्याची व मेहनत करण्याची जरूरी आहे. विज्ञानाच्या विद्यार्थ्यांस तराजूचीं तत्त्वें पूर्ण माहीत असतात; त्याची रचना ठाऊक असते. पण त्यास जर प्रत्यक्ष तराजू योग्य रीतीनें वापरतां आला नाहीं तर त्याला पाठ असलेल्या तत्त्वांचा काय उपयोग ? पहिल्या वर्गांत लेखी परीक्षा पास असणाऱ्या वैद्यकीय विद्यार्थ्याला प्रत्यक्ष शस्त्रक्रिया सफल करून दाखवावी लागते. बौद्धिक शिक्षणाबरोबरच प्रात्यक्षिक शिक्षणाची जरूर असते व म्हणूनच विज्ञान शाखेच्या सर्व विषयांना प्रात्यक्षिकें सक्तीचीं असतात. परदेशांत उमेदवारास पदवी देण्याची पद्धत आपल्या इकडील पद्धतीपेक्षां वेगळी व जास्त उपयोगी आहे. परीक्षा पास होण्यास ते कमी महत्त्व देतात. विचारापेक्षां आचारास त्यांच्या दृष्टीनें फार महत्त्व असतें. तेथें उमेदवार नेमलेल्या काळांत जें प्रत्यक्ष कार्य करतो त्याचा विचार केला जातो. त्याची वार्षिक परीक्षाच घेतली जात नाहीं. वर्षभर त्यानें केलेलें काम पाहिलें जातें. त्यांतील त्याच्या प्राविण्याचा, लायकीचा विचार केला जातो. ज्याचे असें 'प्रॅक्टिकल वर्क' ठराविक योग्यतेस चढते त्यालाच पदवी दिली जाते. म्हणजे त्यानें केलेल्या श्रमदानाचा तपशील तपासून मगच त्यास पदवी दिली जाते. आपल्या इकडे सुद्धां वकिलीची सनद देण्यापूर्वी प्रत्येक वकिलास एकाद्या नामवंत वकिलाच्या हाताखालीं सहा महिने प्रत्यक्ष काम करावें लागतें. वायरमनचें प्रमाणपत्र सुद्धां उमेदवारानें कुठल्यातरी कंपनींत अथवा फर्ममध्यें प्रत्यक्ष अनुभव मिळवून तेथील कामाचें प्रशस्तिपत्र दाखविल्यानंतरच त्यास देण्यांत येतें. डॉक्टरची पदवी देतांनासुद्धां असेंच ६ महिने हॉस्पिटलमध्यें काम केल्यावरच प्रमाण-

पत्र यावें असें मला वाटतें; कारण तेथें तर जीवनमरणाचा प्रश्न असतो. हीं सर्व उदाहरणें विचारापेक्षां आचाराचें—थिअरीपेक्षां प्रॅक्टिकलचें महत्त्व दाखवतात. जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ जगदीशचंद्र म्हणत कीं, "प्रयोग व अन्वेषण ज्यांत नाहीं तें खरें शिक्षणच नव्हे."

जगदीशचंद्रांच्या या वाक्यास जर महत्त्व आहे तर असा प्रश्न निर्माण होतो कीं आर्टसच्या अभ्यासक्रमांतील विषयाचें ज्ञान म्हणजे खरें शिक्षण नाहीं काय? कारण आर्टसच्या विद्यार्थ्यांना प्रयोग नाहींत. त्या विद्यार्थ्यांना फक्त व्याख्यानें देण्यांत येतात. असें कां? मला वाटतें कीं, या अभ्यासक्रमांत सुद्धां प्रयोग अर्थात् प्रॅक्टिकल्स असावींत. सामाजिक शास्त्रांच्या शिक्षणांतहि विज्ञानाच्या इतकेंच प्रयोगांना महत्त्व आहे. या प्रयोगांसच 'श्रमदान' म्हणतां येईल. 'श्रमदानाचा' व्यापक असा हाच अर्थ मला अभिप्रेत आहे. शारीरिक श्रमदान हा रूढार्थ आहे. त्याला पुस्तकी विद्यार्थ्यांनीं महत्त्व दिलें पाहिजे हेंहि निर्विवाद आहे. पण विश्वविद्यालयाची पदवी घेऊन बाहेर पडणारे उमेदवार कुचकामी ठरतात-त्यांचें शिक्षण फुसकें आहे या तक्रारीवर उपाय म्हणून श्रमदानाचा अर्थ व्यापक म्हणजे 'बौद्धिक व शारीरिक श्रमदान' असा केला पाहिजे. आपापल्या क्षेत्रांत प्रयोगात्मक काम करणें हें सुद्धा श्रमदानच आहे. या श्रमदानाची कार्यक्षम विद्यार्थ्यांस आवश्यकता आहे. पोहण्यास शिकणारा विद्यार्थी पाण्यांत श्रम करील तरच पोहण्यास शिकेल. गायनाचा वा वादनाचा विद्यार्थी अनेक राग आळवील, तरच निरनिराळे ताल, स्वर घटतील. ही मेहनत म्हणजेच श्रमदान होय. दम काढण्यास शिकल्याशिवाय हुतुतूंत प्राविण्य येणार नाहीं. मैल मैल पळण्याच्या अभ्यासाशिवाय खोखोंत सफलता नाहीं. कुठल्याहि क्षेत्रांत तपश्चर्येशिवाय फल नाहीं. श्रमाशिवाय फलाची किंमत शून्य आहे, फसवी व भ्रामक आहे. कर्मवीरता हा जीवनाचा गाभा आहे व शिक्षणाचा अर्थ आहे. आर्टसच्या विद्यार्थ्यांना सुद्धां त्यांच्या त्यांच्या विषयांत श्रमदानाची अपेक्षा आहे. नामदार गोखले यांनीं इंग्रजीकरितां श्रम घेतले तेव्हांच ते इंग्रजीचे पंडित बनले. महर्षि कर्वे, आगरकर, न्यायमूर्ति रानडे या थोर व्यक्तींचें श्रमदानच त्यांना महत्पदास घेऊन गेलें. आर्टसच्या विद्यार्थ्यांस श्रमदान करण्यास फार मोठें क्षेत्र उपलब्ध आहे. बी. ए. च्या विद्यार्थ्यांस साक्षरताप्रसार करतां येईल. ज्या ठिकाणीं वर्तमानपत्रें पोंचणार नाहींत अशा ठिकाणीं लोकांना सामान्यज्ञान पुरविण्याचें काम त्यांना करतां येईल. वाचनालयें उघडून वा चालवून पुस्तकांचा पुरवठा करतां येईल. विधायक कार्याची माहिती जनतेला देतां येईल. बी. एस्सी. च्या विद्यार्थ्यांना खराब पाण्याच्या विहिरींत डी. डी. टी. आणि औषधांचे फवारे सोडणें इत्यादि कामें जनतेस समजावून सांगतां येतील. सामुदायिक आरोग्य कसें राखावें तें शिकवतां येईल. हें सर्व एक प्रकारचें श्रमदानच होय. शारीरिक श्रम हा श्रमदानाचा दुसरा प्रकार आहे. आम्ही आमच्या शिक्षणपद्धतींत शारीरिक श्रमांना अत्यंत कमी लेखतों. कारकुनी करण्याचा पांढरपेशा धंदा हा घरोघर हिंडून औषधें किंवा इतर वस्तू विकण्यापेक्षां आम्हांस उच्च प्रकारचा वाटतो. सायकलची दुरुस्ती, फ्रेम्स करणें, फळाफुलांची पैदास करणें, निरनिराळ्या वस्तूंपासून खेळणीं बनविणें, साधे साधे खाद्यपदार्थ तयार करून ते विकणें या पेक्षां बी. ए. होऊन मास्तर किंवा कारकून बनणें हा सरळ योग्य मार्ग अशी समजूत आहे. बी. ए. व्हायचें म्हणजे वरील छोटेछोटे व्यवसाय आम्हांस वर्ज्य! कारण त्यांत प्रतिष्ठा नाहीं. विनोबांकडे एकदा एक पदवीधर नोकरी मागण्यास गेले. 'आचारवान् तो आचार्य' अशी विनोबांची शिक्षकाची व्याख्या आहे. विनोबांनीं विचारलें, "आपण नांगर धरूं शकतां? खुर्ची तयार करूं शकतां? सूत कातूं शकतां? मोट हाकूं शकतां?" पदवीधरांनीं उत्तर दिलें, "नाहीं! मी बी. ए. आहें. मी शाळेंतील विद्या देऊं शकतो." म्हणजे शाळेंतील विद्या व जीवनाच्या आवश्यक कला–

आचार यांचा कांहीहि संबंध नाहीं. हा पदवीधरांचा दोष नाहीं. शिक्षण-पद्धतीचा आहे हें मला मान्य आहे; परंतु जिच्यांतून जगायचें कसें हा प्रश्न सुटूं शकत नाहीं ? ही शिक्षणपद्धति काय कामाची, शिक्षणामुळें स्वावलंबन अंगी बाणलें पाहिजे आणि हें स्वावलंबन माझ्या श्रमदानाच्या कल्पनेनें बाणवतां येईल असा माझा विश्वास आहे.

ह्या श्रमदानाची पहिली पायरी ही प्रत्येक सुशिक्षिताला घरींच चढतां येईल. ती म्हणजे जीवनाच्या आत्यंतिक गरजा स्वतःच्या स्वतः भागविण्याइतकें स्वावलंबन अंगीं बाणवणें. कुणीहि कितीहि श्रीमंत असो, त्यानें आपले कपडे आपण धुवावे, आपली खोली आपण स्वच्छ करावी. आपल्या घरांत लागणारें सर्पण आपण तयार करावें. खानावळ अथवा स्वयंपाकी यांच्यावर अवलंबून राहण्यापेक्षां एक मनुष्याचें जेवण स्वतः तयार करणें यांत सुख आहे. जीवन व शिक्षण यांचा प्रत्यक्ष संबंध येईल तर हें शक्य आहे. माझी हीच तक्रार आहे कीं, शिक्षण व जीवन यांचा प्रत्यक्ष संबंध राहिलेला नाहीं मनुष्य घरांत जीवन जगतों व शाळेंत शिक्षण घेतो. त्यामुळें जीवन व शिक्षण यांचा मेळ बसत नाहीं. शिक्षणाशी प्रत्यक्ष जीवनाचें नातें तुटल्यामुळें शिक्षण निर्जीव बनतें-व जीवन विचारशून्य बनतें. हें होऊं नये यासाठीं विनोबांनीं एक उपाय सुचवलेला आहे. तो म्हणजे घरांत शाळेचा अंतर्भाव व्हावा व शाळेंत घराचा अंतर्भाव व्हावा. पूर्वी गुरुगृहीं राहून शिक्षण घेण्याची जी पद्धत होती तिच्यामागें याच तात्त्विक विचारांची बैठक होती. मुलांना शेतांत काम करतेवेळीं जेव्हां अडचण निर्माण होईल तेव्हां त्यांना सृष्टिशास्त्र किंवा पदार्थविज्ञान अगर जरूर त्या शास्त्राची माहिती देणें युक्त ठरेल. तें खरें शिक्षण होय. मूळ उद्देश हा कीं जीवन जगूं दिलें पाहिजे. व्यवहारांत काम करणारा माणूसहि शिकतच असतो. त्याप्रमाणें शिकत असणारा विद्यार्थीसुद्धां व्यवहारांत उतरून काम करूं लागला पाहिजे. मार्गदर्शनासाठीं जो अनुभवी गृहस्थ जवळ असेल तो त्यांचा शिक्षक. शिक्षक नेमण्याची जरूरी नाहीं. म्हणजे पगारी माणसाचें हीनत्व त्यास प्राप्त होणार नाहीं. जगण्यापुरतें त्याला मिळत राहील व उच्च जीवनाची आवश्यकता म्हणजे प्रतिष्ठा व श्रमानंतरचें समाधान तो गांठीस बांधू शकेल. मला वाटतें, रामराज्य तें हेंच. रामलक्ष्मण विश्वामित्राच्या यज्ञाचें रक्षण करण्यास गेले-धनुर्विद्या शिकण्यास नाहीं. परंतु यज्ञरक्षणाचें वेळीं त्यांना धनुर्विद्या प्राप्त झाली. अशा शिक्षण-पद्धतींतूनच जीवनाची उच्च तत्त्वें शिकतां येतात. लोकशाहीचे धडे याच पद्धतींत मिळत राहतील. आजच्या शाळेंत शिक्षण देण्याची पद्धत असलेल्या युगांत मी मांडलेली 'श्रमदान-शिक्षणपद्धति' हास्यास्पद ठरेल. परंतु जीवन व शिक्षण यांचा जवळचा संबंध लक्षांत घेतल्यास शिक्षणांत जीवन जगण्याची कला शिकविली जाणें योग्य वाटतें. जीवन जगण्याची कला म्हणजे प्रत्यक्ष काम करण्याची कला. या शिक्षणपद्धतींत ती मिळूं शकेल. असा शिक्षणक्रम पुरा केलेला विद्यार्थी पदवी घेण्यास लायक होय.

माझा श्रमदानाचा अर्थ अशा रीतीनें वेगळा आहे. या श्रमदानाचा परिणाम सामाजिक उन्नतींत आहे. पदवीच्या उमेदवारांना हें शिक्षण जर योग्य प्रकारें दिलें गेलें तर कुठल्याहि क्षेत्रांत ते अयोग्य ठरणार नाहींत व त्यांच्या पदवीस व प्रमाणपत्रास कांहीं अर्थ राहील.

---

# कवि-संमेलन

लेखिका : **कु. शामला आगाशे.** इंटर आर्ट्स. बी.

रेडिओ निवेदक :– ऑल अिंडिया रेडिओ, पुणें केंद्र. स. प. कॉलेजच्या देवी रमाबाई सभागृहांतून आम्ही बोलत आहोंत. रात्रीचे ८ वाजून ४५ मिनिटें होत आहेत आणि काव्यमहोत्सवाच्या पहिल्या दिवशींच्या कार्यक्रमास सुरुवात होत आऽहे. ' कवि संमेलन. ' महाराष्ट्रांतील नामवंत, प्रतिभावंत कवि आज स. प. कॉलेजच्या सभागृहांत आपल्या प्रतिभेचें तेजस्वी व प्रभावी दर्शन महाराष्ट्राच्या चोखंदळ रसिकांस घडवणार आहेत. कवि-संमेलन. उपन्यासकार कविराज नूतन. भाग घेणारे प्रतिभावंत–कुमारी सुंदरा पंत, श्री. सुंद इंगुदीकर व श्री. लंकेश माडगांवकर.

**कविराज नूतन**—रसिकहो, आजच्या या काव्यमहोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगीं होणाऱ्या ह्या अपूर्व संमेलनाचा उपन्यासकार म्हणून मला जेव्हां बोलविण्यांत आलें, तेव्हां दिवाभीतास अंधार दिसावा किंवा सापास बेडूक दिसावा, त्याच प्रकारचा हर्ष मला झाला. या क्षणाचा शब्दातीत अनुभव मला दिल्याबद्दल मी अत्यंत कृतज्ञ आहें.

मानवाचा अतिमानवतेशीं संबंध जोडण्याचें माध्यम म्हणजे काव्य. अशा भव्य सीमाप्रांतीं विहार करणाऱ्या प्रतिभावंताला येणारा अनन्यसाधारण अनुभव व्यक्त करतांना भाषा हें साधन अत्यंत थिटें पडतें. जुन्या व प्रतिगामी कविवर्गाला भाषेच्या माध्यमाचा अत्यल्प वापर हा अमेरिकन सिनेतारकेच्या पोशाखासारखा वाटतो खरा, परंतु नवकाव्याचा पुरस्कर्ता म्हणून मला आग्रहानं असं म्हणावंसं वाटतं कीं तीव्र अनुभवाचें शब्दरूपांत प्रकटीकरण करतांना त्या अनुभवाचें सौंदर्य राखावयाचें असेल व वाचकाला त्याचें सुस्वरूप व सत्य स्वरूप दर्शवावयाचें असेल, तर भाषेचा किमान उपयोगच प्राप्त आहे. ( टाळ्या ) नाहींतर होतं काय कीं शब्दांच्या गुंतागुंतींतून अर्थांचा सुसूत्र धागा शोधणं अति कठीण होऊन बसतं. नवकाव्य दुर्बोध आहे अशी ओरड आज केली जाते. पण ही तथाकथित दुर्बोधता म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून प्रतीकांचा बदल आहे. काव्याची प्रगति होण्यासाठीं जुने संकेत टाकून देऊन नवे संकेत, नवीं प्रतीकें रूढ होणं अत्यंत आवश्यक आहे. शिवाय कांहीं वेळां काव्यांत वर्णिलेला अनुभव हाच मुळीं अनाकलनीय असतो. अशा वेळीं कवीला दुर्बोधतेबद्दल शिव्या देणं म्हणजे त्याच्या अनुभवाशीं त्यानें ठेवलेल्या प्रामाणिकतेलाच नांवें ठेवण्यासारखं ठरेल. म्हणूनच या आक्षेपांत कांहीं दम नाहीं. असो. तेव्हां आज इथें जमलेल्या या नवकवींना, ज्यांना नवकाव्याच्या किमान शब्दोपयोगाचा व तज्जन्य तथाकथित दुर्बोधतेचा अत्यंत अभिमान आहे त्यांना, हार्दिक अभिवादन करून मी कुमारी सुंदरा पंत यांना त्यांच्या कविता वाचून दाखविण्याची विनंती करतों. कुमारी पंत या उगवत्या कवियित्री आहेत. त्यांची तुलना मला अंड्याचे तुकडे अजून अंगावर असलेल्या परंतु 'कोऽहम्' असा खडा प्रश्न आईला टाकणाऱ्या कोंबडीच्या पिलाशीं करावीशी वाटते. त्यांच्या काव्यलेखनाचा काल जरी अल्प असला, तरी त्यांनीं केलेली प्रगति मात्र प्रशंसनीय आहे.

**कुमारी पंत** :—( घसा साफ करून ) कवितेचं नांव आहे ' सांवल्या. '

सांवलीचा एकच मोह
विश्वाला कळंजत
काळ्या धारेनें तेज कापत
मानवाला ओढतो आहे ... ( वा वा ! )
सांवलीचें विश्व बनलें
प्रकाशाहुनी मोठी सांवली
सात रंग ते सांवली अन्
तेज तेंही सांवली ॥
सांवली तूं, मीहि तीच
सांवलींतल्या दोन सांवल्या
सांवलीचें वेड पांघरून
सांवलीमधें विलीन झाल्या ॥ ( टाळ्या )

दुसऱ्या कवितेचं नांव आहे, ' टिंब ?

टिंब होतें ॲटम्‌मधें टिंब होतें माझ्यामधें
मी नि ॲटम् टिंब होतों, मॉलेक्यूलही टिंब होता ॥
टिंब होतें भाषेमधें टिंब होतें गणितामधें
अंधारींही टिंब होतें, जगामधें अंधार होता ॥ ( वा ! )
टिंबामध्यें बिंब होतें एक मोठ्या टिंबाचेंच
बिंब पाहुनी टिंब म्हणालें, ' मीहि टिंब तूंहि टिंब ॥ (टाळ्या)

**कविराज नूतन** :— आतां आजच्या नवकवींपैकीं प्रथितयश कवि श्री. सुंद इंगुदीकर. यांच्या ' मत्स्यगंधा ' ह्या काव्यसंग्रहानें तमाम नवकविवर्गाला वेडं बनवलं आहे. त्यांची ही ' मत्स्यगंधा ' पुराणान्तरींच्या मत्स्यगंधेप्रमाणेंच आकर्षक आहे. अशिक्षितांचा सुसंस्कृतपणा व शहरी लोकांचा दिखाऊपणा या दोन्हींवर हे सारख्याच सफाईनें लिहीत असतात. वरून खडबडीत दिसणाऱ्या खेडवळपणामागें दडलेलं मानव्य पाहण्याची वृत्ति त्यांच्या काव्यांत दडलेली आपल्याला आढळते. चला इंगुदीकर, श्रोते कान टवकारून बसले आहेत.

**सुंद इंगुदीकर** :— कवितेचं नांव आहे ' परीटदादा. '

परीटदादा परीटदादा
कुठें चालला गांठोडें पाठीवर घेऊन ?
आयुष्याच्या तटिनीकांठीं
दुःखाचे कपडे धुतांना
त्यांचा येतो का कधीं उबग ?
— ज्यांच्या हातीं असतो पैका
आणिक त्यांच्या तालावरतीं
नाचत असते सगळी दुनिया ... ( वा ! वा ! )
... तुम्हीं चालतां भार घेउनी

वीकत, खोकत, झुरके ओढत
भंवतालींचें दुर्लक्षुन जग
स्थितप्रज्ञ तुम्हि चालत असता
परीट दादा!
नसली जरिही आज कुणाला
दादहि तुमच्या अस्तित्वाची,
तरी उद्यांला—
उरेल जेव्हां तुमची आमची
मूठ चिमूट नुसती राख
तिलाच करतिल भावि युगाचे
नवनिर्माते वंदन लाख! ( टाळ्या–वा वा!)

दुसऱ्या कवितेचं नांव आहे. 'एक दिवस.'

एक दिवस असा येतो
सारा नूर बिघडून जातो ॥
कॉलेजाला जातां जातां
सायकलींची टक्कर होते
दुसरं माणूस निघून जातं
नंतर आम्हीं 'सॉरी' म्हणतों! ॥ १ ॥
पुन्हां पुन्हां सारा दिवस
तेंच माणूस अडवीत असतं
आमचा चेहरा पडत असतो,
बघे नुसते हंसत असतात! ॥ २ ॥
मधल्या सुट्टींत चहा पितांना
खिशास आमच्या चट्टा बसतो
कुणीं कुणाला डिश् देण्याला
बेल आंतुनी दाबित असतो!
मिरवतात सगळे! ऽऽऽ (हंशा)
व्हरांडयांतुनी जातां जातां
धक्का यावा म्हणुनी जातो,
पुढून येती प्रोफेसर अन्
पुन्हां आमुचा डाव बिघडतो! ॥
असाच सारा वेळ गुजरतो
आम्हीं नशिबा बोल लावतो
असाच येतो एक दिवस अन्
सारी घडी उधळून जातो ॥ (टाळ्या)

**कविराज नूतनः**-- वा वा! कमाल केली आज! असो. यानंतर हळुवार भावनांची ललित भाषेनें उकल करणारे आमचे लंकेश माडगांवकर रसिकांस त्यांच्या कविता ऐकवतील.

त्यांच्या 'जीवननृत्य' व 'विडी' या दोन काव्यसंग्रहांशीं आपणां सर्वांचा परिचय आहेच, तेव्हां मीं अधिक कांहीं सांगावं असं नाहीं; परंतु त्यांच्या काव्यांतील एका विशेषाचा येथें उल्लेख केल्यावांचून मला राहवत नाहीं. सामान्य मनुष्याला ज्या दोन गोष्टींत साम्य आढळत नाहीं, किंवा ज्या विशेषणांनीं ज्या वस्तु ओळखल्या जात नाहींत, तशा त्या उल्लेखण्यांत त्यांचा हात धरणारा आज तरी कुणीं आहे, असं मला वाटत नाहीं. चला माडगांवकर.

**लंकेश माडगांवकरः**— कवितेचं नांव आहे, 'फिरकी'. मी एकदां बोकावाडीहून स्पर्ध्याला जात असतां डब्यामध्यें समोरच्या बांकावर एक लेंकुरवाळी स्त्री तांब्याची फिरकी बसवतांना पाहिली अन् मनांत विचार आला. – तीच ही कविता.

समोरच्या बांकावर आडव्या
लेंकुरवाळा हिरवा रास्ता
उघडत होता तांब्या:
गोजिरवाण्या इवल्या इवल्या
सुंदर गोंडस हातांना:
लागली होती भूक–पाण्याची.
*भालावरची अवखळ सेना*
भुरभुरनी ती सतावत होती
इवलें जग तें आगगाडीचें
नको नकोसें झालें होतें.
सांखळी खेंचुन जोरानें ती
गाडी थांबतां पळून जावें
पिसासारखें हलकें होउन
म्हातारीसम तरंगत जावें
रूईच्या बोंडामधल्या
फूSSS……
… जावेंच का?
चिमीस नकट्या सवें घेउनी
बरणींमधल्या गोळ्या पळवुनं
फिरक्या गिरक्या घेतां घेतां
चांदोबाच्या नगरीमध्यें?
जावेंच आतां.
केव्हांपासून मनामधें घोळतें आहे
पळून जावें रानामध्यें
परीकथांच्या राज्यांमध्यें
फिरक्या—
न थांबणाऱ्या, न संपणाऱ्या गोलच गोल
साऱ्या फिरक्या
चौकोनी अन् त्रिकोणाकृती साऱ्या फिरक्या

तांब्यालाही आहे फिरकी
कुडिस आइच्या असते फिरकी
फिरक्याच फिरक्या सगळीकडे
फिरक्यांचें हें उनाड ब्रह्म !

**कविराज नूतनः**-- रसिकहो ! आजच्या या कार्यक्रमाबद्दल आपल्या अपेक्षा नक्कीच कमी पडल्या असतील याबद्दल मला खात्री आहे. आजचें हें कविसंमेलन इतिहासांत न भूतो न भविष्यति असें जरी नसलें, तरी अभूतपूर्व होतें यांत शंका नाहीं. आजच्या ह्या कार्यक्रमांत भाग घेतलेल्या कवींचे आभार मी एका काव्यांतूनच मानणार आहें.

कवीजनांनों--
अमीबाच्या माकडाच्या वंशजांनों
धन्य झाली आज भाषा
मातीस्वरूप क्षुल्लक भाषा
घटरूपाचें लेणें लेउन
धन्य झाली आज भाषा ।।
या कार्याचे काजवे हे
चमकतील त्या सूर्यापुढतीं
लुकलुक त्यांची सौदामिनीला
मागें टाकुन जाइल पुढती– ॥ ( टाळ्या )

**रेडिओ निवेदकः**-- कविसंमेलन. काव्यमहोत्सवाच्या पहिल्या दिवशींचा विशेष कार्यक्रम आपण ऑल इंडिया रेडिओच्या पुणें केन्द्रावरून ऐकत होतां. हा कार्यक्रम आम्हीं स. प. कॉलेजच्या देवी रमाबाई सभागृहांतून सादर केला. कवि संमेलन. उपन्यासकार कविराज नूतन. भाग घेणारे प्रतिभावंतः कुमारी सुंदरा पंत, श्री. सुंद अिंगुदीकर व लंकेश माडगांवकर.

---

# कॉलेज रंगभूमि

लेखक :- **दीनानाथ टाकळकर** सी. बी. ए.

महाविद्यालयीन जीवनांत इतर कांहीं साहित्यविभागांबरोबरच नाटयविभागालाहि फार महत्त्व आहे. त्याप्रमाणें तेथें नाटयसेवाहि पुष्कळ मोठया प्रमाणांत होत असते. मला जो थोडाफार अवधि मिळाला आणि त्यांत मला जे बरेवाईट अनुभव आले त्यांची आलोचना करण्याचें येथें मीं ठरविलें आहे.

जे खरे कलाप्रेमी असतात, कलेची आवड आणि चाड ज्यांना असते, ते एकतेनें, तन्मयतेनें कलेची सेवा करतात. चोखंदळ प्रेक्षक आणि अभ्यासू नट त्यांतून निर्माण होऊं शकतो. अशा आत्मीयतेनें ज्या वेळेस विद्यार्थी कलाकार नाटयाभ्यास करतो, तेव्हांच समाजांतला भावी टीकाकार

अभ्यासू प्रेक्षक निर्माण होतो. नेमका हाच अनुभव माझ्या गेल्या आठ-दहा महिन्याच्या य कॉलेजच्या वास्तव्यांत मला आला. माझ्या सहवासांत जी अल्पशी मित्रमंडळी आली, वा ज्या कलाप्रेमी लोकांचा मला अल्पसा सहवास लाभला, त्यांच्या सहकार्यानेंच या कॉलेजच्या रंगभूमीवर मी कांहीं प्रयोग करूं शकलों. नाटयाचें प्रायोगिक मूल्य, आत्माभिव्यक्ति आणि स्वतंत्र अवलोकन-शक्तींतून निर्माण होणारा, नवतंत्रावर आधारित असा चिंतनशील अभिनय, यांचें प्रत्यक्ष रूप मला पाहतां आलें, त्याचें दर्शन मला इतरांना घडवितां आलें.

ह्या कॉलेज-विश्वाबाहेरचें जग इथल्या रंगभूमीकडे थोडया उपेक्षेच्याच दृष्टीनें पाहतें. चार अननुभवी विद्यार्थ्यांनीं एकत्र येऊन केलेला नाटयप्रयोग - एवढेंच महत्त्व त्याला दिलें जातें. पण माझ्या दृष्टीनें तर सध्यांच्या रंगभूमीच्या अवनत अवस्थेंत कॉलेजची रंगभूमीच नाटयाला मानाचें जीवन जगूं देतें. त्याचें कारण असें कीं, बाजारी नाटयकलेला व्यवहाराचीं बंधनें असल्या-मुळें, लोकांच्या आश्रयावर नटांना जगावें लागत असल्यामुळें, लोकांना पचणारा आणि रुचणारा अभिनय प्रसंगीं स्वत्वाला आणि तत्त्वाला सोडून त्यांना करावा लागतो. पण कॉलेजची रंगभूमि निदान ह्या विचारांनीं तरी डागाळलेली नाहीं. उत्पन्न किती होईल याचा विचार करण्याची इथें गरज नाहीं. बाजारांत नाटय खपवायचें म्हणून हिणकस आणि हलक्या विनोदाचा आसरा घेण्याचें तिला कारण नाहीं. पूर्वाश्रमींच्या नाटकमंडळ्यांप्रमाणें सतत परिश्रम आणि अभ्यासू वृत्ति यांच्या समन्वयानें, आत्मीयतेनें नाटयाविष्कार करण्याचें भाग्य त्याच रंगभूमीला लाभतें. पण हें झालें माझें स्वप्न. वस्तुस्थिति मात्र अगदीं निराळी आहे.

बव्हंशीं आपल्याला कॉलेज-रंगभूमीवर जें चित्र दिसतें तें वेगळ्या स्वरूपाचें असतें. कॉलेज रंगभूमीवर काम करणाऱ्या कलाकाराला नाटयकलेची हौस नसते, तर फक्त नाचण्याची हौस असते. नाटयकला ही थोडया अवकाशांत सवंग कीर्ति मिळवून देणारी कला आहे, हें खरें. पण इथले कलाकार हें विसरतात कीं, रंगभूमि ही एका क्षणांत कलाकाराला प्रेक्षकाच्या गळ्यांतला ताईत बनविते, तर तिच्याशीं प्रतारणा करणाऱ्या कलावंताची साऱ्या वर्षाची पुण्याई क्षणांत मातीला मिळविते. रंगभूमीवरचा न्याय हा असा निष्ठुर आहे. रंगभूमीवरचा व्यवहार रोखीचा आहे. आत्मीयतेनें तिची सेवा, पूजा केली, तर ती भरघोस यश पदरांत टाकते, तिच्याशीं प्रतारणा केली तर निर्भर्त्सना करविते. अभिनय चांगला वठला, तर धन्यवाद मिळतात, अभिनयांत अंगचुकारपणा केला तर तिथेंच जोडे आणि शिव्या पण मिळतात.

कॉलेजमध्यें प्रायः नाटयापेक्षां अवांतर आणि निरर्थक गोष्टींच्याच तालमी नियमित स्वरूपांत होतात. नाटक ज्या दिवशीं 'ठरतें', त्याच दिवशीं चहा-फराळाच्या तालमींना सुरुवात होते. नाटयाअगोदर याचीच तरतूद नाटयसमिति प्रथम करते. प्रत्यक्षांत नाटकाच्या तालमी सुरू झाल्या कीं, आत्मीयता अभावानेंच दृष्टीस पडते. त्यामुळें नाटय हें दुय्यम दर्जाचें भासतें.

नाटयाविष्काराला वा नाटयप्रयोग यशस्वी करायला कलेवरची निष्ठा आणि सांघिक वृत्ति यांची आवश्यकता असते. वैयक्तिक अभिनयाला सांघिक वृत्तिविना रंगभूमीवर साफल्य नाहीं. पण नेमकें हेंच आत्मीयतेच्या अभावीं अनुभवाला येतें. अर्थात् याला कारण कॉलेज-विश्वांतील इतर अनावश्यक राजकारणाची दुरूनच मजा पाहण्याची हौस. त्यामुळें तालमीच्या वेळीं आपल्या भूमिकेचा अभिनय संपला, तरी आपल्या बरोबरच्या पात्राचें भाषण काय आहे, त्याच्या अनुषंगानें

तो कोणत्या प्रकारचा अभिनय करतो आणि त्याचा इष्ट परिणाम घडविण्यासाठीं आपण कोणता पूरक अभिनय करायला हवा, त्याचा अभ्यास तसाच राहून जातो आणि त्यामुळेंच वैयक्तिक नाट्यवैशिष्ट्यांनींच नाट्य नटवलें जातें. त्याचा एकजिनसीपणा लुप्त होतो. लोकांना टीकेला वाव मिळतो आणि रंगभूमीवरच्या मुक्या पण बोलक्या अभिनयाच्या आनंदाला नट आणि प्रेक्षकहि मुकतो. तात्पर्य, समरसतेशिवाय नाट्य संभवत नाहीं, सांघिक वृत्तीशिवाय नाट्याला सफलता नाहीं. स्वत्वाची फाजील जाणीव असलेले नट उत्तम नट होऊं शकत नाहींत. फुटीर आणि चटोर प्रवृत्ति नाट्ययशाला मारकच ठरते.

कॉलेज-रंगभूमीवरच्या या दोषांकडे दुर्लक्ष करून, कलाकाराच्या अंगीं जर नाट्यप्रेम तळमळीचें, आत्मीयतेचें असेल तर काय होऊं शकतें त्याचें दर्शन सुदैवानें मला माझ्या सहकारी मित्रांना आणि गुरुजनांना घडवितां आलें.

एकंदर तीन नाटकें, कांहीं एकांकिका, व छायानाट्यें मीं बसविलीं, आणि कांहींतून स्वतःहि भूमिका केल्या. त्यापैकीं दोन—एकच प्याला आणि दूरचे दिवे-कॉलेजरंगभूमीच्या आंवाक्या-बाहेरचीं नाटकें मी निवडलीं होतीं.

कांहीं नाट्यप्रेमी कलाकार, वेडे, माझ्या हातीं आले. प्रथम छायानाट्य, एकांकिका आदि नाट्यप्रकार हातीं घेऊन प्राथमिक नाट्यचिंतनाची आणि अभ्यासू वृत्तींची लागवड मी त्यांच्या ठायीं केली. कोणत्याहि नाटकांतील भूमिका करतांना त्या भूमिकेचें नाटकांतलें स्थान काय, त्याचा इतर पात्रांशीं संबंध काय, त्याचा समाजांतला अथवा नाट्यांतला दर्जा, त्याची भोंवतालची परिस्थिति आणि त्यामुळें त्याच्या मनाची घडलेली घडण याचा अभ्यास कसा करावा याची माहिती कांहीं वेळां तोंडीं सांगून तर कांहीं वेळां प्रात्यक्षिकाच्या स्वरूपांत त्यांच्यापुढें मांडली. अंधानुकरणापेक्षां आपल्या प्रकृतीला साजेल असा अभिनय करण्याची महती त्यांना पटवून दिली. त्यांची स्वतंत्र विचारशक्ति, अवलोकनशक्ति आणि अभ्यासू वृत्ति प्रगतीची वाटचाल करूं लागली आणि त्याचेंच फळ म्हणजे आपल्या कॉलेज रंगभूमीवर झालेल्या यशस्वी भूमिका-तळीराम, सदानंद, सौदामिनी, रावबहादूर, गीता आणि तारामती.

वरील भूमिका करणाऱ्या कलाकारांच्या यशाचें मर्म कशांत आहे, त्यांत त्यांना यश कसें मिळालें याचें दर्शन कांहीं प्रसंगाद्वारें आपल्याला घडविण्याचा प्रयत्न मी करणार आहें.

'एकच प्याल्यां' तील तळीराम :— १९४५ सालीं जेव्हां मला सुधाकराचें काम करावें लागलें तेव्हांचा हा अनुभव, हें अवलोकन आहे. एके दिवशीं मुंबईच्या आकाशवाणी केंद्रावरून मी घराकडे येत होतों. वाटेंत एक दारुडा झिंगून पडला होता. त्याला पाहून माझ्यांतला नाट्यात्मा जागृत झाला. मी निरीक्षण करूं लागलों. क्षणभर त्याचा मित्र झालों. त्याला उचललें, उभे केलें. त्याच्याबरोबर थोडासा चाललों. त्याच्याशीं बोललों. त्याला हलक्या चापट्या मारल्या. माझ्या डोळ्यापुढें ताडकन् दोन चित्रें उभीं राहिलीं. त्यांत एक होतें सुधाकराचें आणि दुसरें होतें तळीरामाचें. अल्पशा निरीक्षणांत साऱ्या भूमिकेचें मर्म ध्यानीं आलें. दारुडा चालतो कसा, त्याच्या कोणत्या गात्रांवर परिणाम होतो, त्याच्या जिभेवर काय परिणाम होतो, त्याच्या बुद्धीचा, शुद्धि-बेशुद्धीचा खेळ कसा चालतो हें मला पाहतां आलें मी त्याला तडाखे दिलेले आठवत असतांना त्याचा बुद्धीवरचा विश्वास उडाला होता. त्याला निश्चित असें कांहींच आठवत नव्हतें. जें घडलें त्याच्याबद्दल त्याचें मन ग्वाही देत नव्हतें. त्याला आठवत होतें सारें कांहीं,

पण खात्री मात्र नव्हती कशाचीच. बुद्धि त्याची त्यालाच साथ करीत नव्हती. याचा उपयोग मी माझी सुधाकराची भूमिका रंगवितांना केला; पण त्या भूमिकेला पुरून उरलेले आणि माझ्या अप्रगट मनानें संकलित केलेले सारे गरीब दारुडयाचे अनुभव तसेच राहिले. त्यांचा उपयोग, जवळ जवळ बारा वर्षांनीं पुन्हां ' एकच प्याल्या ' शीं माझा संबंध आला, तेव्हां झाला. आणि तेच अनुभव तावून सुलाखून घेऊन, नव्यानें नव्या कोंदणांत बसवून दोन दारुडयांचीं वेगवेगळीं स्वरूपें मांडतां आलीं.

तळीरामाची भूमिका मी श्री. बाळ जोशी यांना समजावून सांगितली, त्यांना ती समजली पण. तळीरामाची चाल आणि दारूमुळें जिभेला आलेलें जडत्व, यामुळें तळीरामाच्या मनींचा भाव दुसऱ्यांना कळविण्यासाठीं आंगिक अभिनयाची आणि त्याच्याच अनुषंगानें वाचिक अभि-नयाची साथ असणें आवश्यक होतें. या दोन्हींचा समन्वय साधण्यासाठीं मी जवळ जवळ आठ दिवस श्री. जोशी यांच्यासमोर तळीरामाच्या चालीनेंच चालायचा. एक विशिष्ट चालण्याची ढब त्यांच्याकडून मला करवून घ्यायची होती. त्यांच्या नसानसांत मला तळीराम वागवावयाचा होता. अर्थात् हें सांगून समजण्यासारखें नव्हतें म्हणून मी प्रत्यक्ष ती चाल सारखी त्यांच्या नजरेपुढें ठेवली. पुढें पुढें मी माझा ढगळ कोट तालमीच्या वेळीं त्यांना देऊन त्यांच्याकडून ती चाल आपलीशी करविली.

तसेंच, " जातेस का पितेस ? पितेस का जातेस ? " या वाक्याच्या वेळीं शेवटचा ' जातेस ' हा शब्द उच्चारण्याऐवजीं फक्त हातांनींच प्रथम अर्थ विशद केला, मागाहून शब्द फेकले. हाच तो रंगभूमीवरचा बोलका अभिनय. हा मनाला पटला, नसानसांतून भिनला, म्हणजेच शब्दावांचून परिणाम घडवितां येतो प्रेक्षकांच्या मनावर !

त्यानंतर ' दूरचे दिवे ' नाटकांतील तारामतीचें पात्र. मराठी रंगभूमीवर आजपर्यंत चाललेल्या आरडाओरडी करून खलत्व सिद्ध करण्याच्या पद्धतीला मुरड घालून प्रतिस्पर्ध्याच्या शस्त्रांनींच त्याच्याशीं लढून आरडाओरडा न करतां फक्त शब्दांची फेंक, आवाजांतला चढउतार यांनीं खलत्व परिणामकारक करतां येतें, हें पटवून दिलें.

प्रसंग असा होताः––सदानंदानें त्याच्या बहिणीला दिलेली अंगठी तारामती चोरते. तिच्याकडून ती हरवते, ती नेमकी सदानंदाच्या हातीं येते. तेव्हां तिच्यावर चोरीचा आरोप करून, तिला पोलीसच्या स्वाधीन करण्याची धमकी देऊन, विश्रामचें जीवन उध्वस्त करणारें तें पत्र तिच्याकडून तो काढून घेतो, जाळून टाकतो. या प्रसंगीं ती चिडते, त्याला दुरुत्तरें करते, त्यावेळीं सदानंद म्हणतो, " चोरावर चोरीचा आरोप करायला कांहींच हरकत नाहीं. " त्याचा हा आनंद फार काळ टिकत नाहीं. कारण, तारामती सौदामिनीनें सदानंदाला पाठविलेलें पत्र चोरते आणि सौदामिनीचें जीवन उध्वस्त करण्याची धमकी देते. तेव्हां सदानंद चिडतो. त्यावेळीं त्याच्याच शब्दांत ती म्हणते, " चोरावर चोरीचा आरोप करायला कांहींच हरकत नाहीं. " शब्द तेच, पण अगदीं हंसऱ्या, सहज, स्वाभाविकपणें काढलेल्या ह्या उद्गारांनीं वातावरण पार बदलून जातें. हाच तो शब्दांतून व्यक्त होणारा बोलका अभिनय आणि रंगभूमीवरचा शब्दावांचून बोलणारा अभिनय.

सदानंद––दूरचे दिवे––ह्या एकाच भूमिकेंत मानवी मनाचे कितीतरी पैलू अभ्यासण्यासारखे आहेत. रावबहादूर हे त्याचे वडील. त्यांच्याशीं बोलतांना मर्यादा राखून आपला जीवना-विषयींचा दृष्टिकोन मांडणारा सदानंद, विश्रामसारख्या प्रसंगांत सांपडलेल्या मित्राला रोखठोक सल्ला

देणारा त्याचा हितचिंतक सदानंद, तत्त्वज्ञानाच्या व्यासपीठावरून सौदामिनीच्या आदर्शांच्या कल्पनांचा फोलपणा पटविणारा सदानंद, खलनायिका तारामतीशीं बेछूटपणानें वागणारा सदानंद आणि आपल्या प्रेयसीवर लाडिक व खेळकर, खट्याळ व प्रामाणिक प्रेम करणारा सदानंद, ह्या साऱ्या सदानन्दांचीं रूपें एकाच सदानंदांत सामावलीं आहेत. या पात्राचा अभिनय अनुभूतीवांचून अवलोकनावांचून, कलेच्या निष्ठेवांचून आणि समरसतेवांचून सरस वठवितांच येणार नाहीं. सतत परिश्रम आणि अभ्यास हीं एकच या पात्राच्या यशस्वितेची गुरुकिल्ली. ती श्री. गोडबोले यांच्या हातीं मीं दिली. त्यांनीं बऱ्याच योग्य रीतीनें तिचा उपयोग केला, यशाचें भांडार त्यांच्यापुढें खुलें झालें, रितें झालें.

सौदामिनी--दूरचे दिवे--दुसऱ्या पात्राचें प्रदीर्घ भाषण चालूं असतांनासुद्धां त्याचा इष्टानिष्ट परिणाम स्वतःच्या चेहऱ्यावर दाखवितां येतो. चेहऱ्यावरच्या अभिनयानें नटाचा चेहरा प्रेक्षकांशीं बोलूं शकतो. या आत्मीयतेनें लोकांना मंत्रमुग्ध करण्याची ताकद नटाच्या अंगांत येते. त्या प्रशांत वातावरणांत वारा शिरूं शकत नाहीं. जेव्हां कलेची निष्ठा, आत्मीयता आणि समरसता असतें तेव्हांच हें साधतें. जेथें नाट्यप्रेम, अभ्यासू वृत्ति असेल तेथेंच हें दर्शन घडतें. निर्मला वाटवे यांनीं परिश्रम, निष्ठा आणि समरसता यांच्या जोरावर असल्या नाट्याचें दर्शन घडविलें आहे याच कॉलेजच्या रंगभूमीवर !

रावबहादूर—दूरचे दिवे—राजकारणाच्या आखाड्यांत तयार झालेला हा पिंड. स्पष्टवक्ते-पणामुळें विश्रामसारख्या मंत्रीपदाच्या जागेवर असणाऱ्या संसारी माणसाला त्याच्या पत्नीसमोर ' गाढव ' म्हणणारा, सौदामिनीच्या --- त्याच्या पत्नीच्या भावना दुखावल्या जात आहेत म्हणून चूक सुधारणारा आणि आपली चूक आपल्या मुलाच्या ( सदानंदाच्या ) लक्ष्यांत येऊन तो किंचित् हंसतो असें दिसतांच ' खबरदार माझ्याकडे असें पहाल तर ' असें जोरांत म्हणून आपला सात्त्विक संताप प्रगट करणारा करारी म्हातारा " नोकरीसाठीं अर्ज घेऊन आलों नाहीं असं तिष्ठत बसायला ", असें आपल्या मुलाला सडेतोड बोलणारा कडवा म्हातारा, आणि आपल्या भावी सुनेशीं समजावणीच्या प्रौढतेनें बोलणारा हा प्रेमळ म्हातारा--हीं सारीं सोंगें यथार्थतेनें अपरिपक्व आणि अननुभवी विद्यार्थी कलाकाराकडून वठवायचीं असतील तर निष्ठेशिवाय आणि कलासक्तीशिवाय तें शक्य नाहीं. या साऱ्याच गुणांचा समन्वय श्री. मुंगी यांचे ठायीं होता. म्हणूनच त्यांनीं ' दूरचे दिवे ' मधील म्हातारा आणि ' मराठीचि ये नगरी ' मधील म्हातारा-या दोन्ही म्हाताऱ्यांत दोन ध्रुवांचें अंतर-पण केवळ अभ्यासिलेल्या अभिनयामुळेंच ते या दोन्ही ध्रुवांवर जाऊं शकले आणि समरसतेनें जाणत्या म्हाताऱ्याच्या भूमिका त्यांनीं केल्या.

गीता--एकच प्याला- तारामतीचें ' दूरचे दिवे ' मधील खलनायिकेचें काम करून, ' एकच प्याला ' तील स्पष्टवक्ती, भाबडी आणि माणुसकीचा पाठपुरावा करणारी गीता, ही अगदीं भिन्न भूमिका वठविणाऱ्या विद्यार्थिनीच्या अंगीं लवचिक कला, असल्याशिवाय यश मिळणेंच शक्य नाहीं. रंगभूमीला लागणाऱ्या अनुरूपतेची पर्वा न बाळगतां केवळ अभ्यासानें, एकात्मतेनें आणि जातिवंत अभिनयानें श्यामला आगाशे या तीं भिन्न स्वभावचित्रें स्वाभाविक थाटांत मांडूं शकल्या.

एकच दुर्भाग्य या कॉलेजच्या रंगभूमीचें आहे, आणि तें म्हणजे विकृत मनाचा प्रेक्षक. बाहेरची रंगभूमि आणि कॉलेजची रंगभूमि, यांत बाहेरच्या रंगभूमीला एवढेंच भाग्य आहे कीं, नाटयपूजेंत व्यत्यय आणणाऱ्या माणसाला बाहेर काढतां येतें. पैसे देऊन आलेला प्रेक्षक त्या नतद्रष्टाला बाहेर घालवूं शकतो, गप्प बसवूं शकतो, आणि कॉलेजरंगभूमीवर अल्प मोबदल्यांत पूर्ण नाटयानंद मिळत असतांना नाटयपूजेंत व्यत्यय आणणाऱ्याला बाहेर काढतां येत नाहीं. प्रसंगीं नाटयपूजा थांबविली जाते, पण या पशुतेला बाधा येऊं शकत नाहीं.

एवंच काय, नाटय ही गोष्ट चर्चा करण्याची नाहीं, "कृति करण्याची" आहे. कृति हा नाटयाचा आत्मा आणि निष्ठा हें त्याच्या यशाचें मर्म आहे. या दोन्ही गोष्टींचा समन्वय जर कॉलेज-रंगभूमीवर असाच होत राहिला, या छोटयाशा विश्वांतील रंगभूमीला जर दृश्य-श्राव्याची नवी दृष्टि व कान आले, एकनिष्ठता आली, तर निश्चित बाजारी रंगभूमीला याची दखल घ्यावी लागेल!

---

# विज्ञान–विभाग

## धूमकेतु

लेखक-- **किशोर त्र्यम्बक लेले**-इन्टर सायन्स–ए.

नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ॥– कालिदास. जगाचें हें प्रचंड रहाटगाडगें कितीतरी काल चाललें आहे, चालत आहे आणि असेंच कितीतरी काल चालत राहील. तीच सकाळ, तीच दिवस, तीं लांब कंटाळवाणीं वर्षे, तीं आळसटलेलीं शतकें. सदैव त्याच चाकोरींतून फिरावयाचें म्हणजे अगदीं नको वाटतें. ही चाकोरी मोडण्यांत सगळ्यांनाच गोडी वाटते. ठरलेल्या चाकोरीबाहेर जाण्यासारखें संसारांत सुख नाहीं. निसर्गाची तीच कथा. कधीं कधीं शांतपणें फिरणाऱ्या सूर्यमालेला सुद्धां दररोजच्या जीवनाचा कंटाळा येतो, आणि मग एक दिवस अचानक, सूर्याभोंवतीं शांतपणें फिरणाऱ्या सौरमालेंत एखादा धूमकेतु येऊन टपकतो, आपलें सतेज लांब पुच्छ उभारून भरदिवसांहि झगमगूं लागतो, आणि मध्यें येणाऱ्या ताऱ्यांवर व ग्रहांवर उल्कांचा भडिमार करतो. मग सौरमालेची चाकोरी मोडते. मनांत प्रश्नांचें काहूर उठतें, मन कांहीं काल आश्चर्यचकित होतें.

खरोखरच धूमकेतु हा मति गुंग करणारा विषय आहे. कधींहि न दिसणारा हा पदार्थ येतो कोठून? तो तारा आहे कां ग्रह आहे? तो असा मध्येंच कां दिसतो? त्याची कक्षा कोणती? त्याचा वेग काय? असे धूमकेतु आहेत तरी किती? त्यांतील तत्त्वें कोणतीं? वगैरे अनेक प्रश्न डोळ्यांपुढें उभे राहतात आणि कांहींच उत्तर न देतां आल्यामुळें ते धूमकेतूसारखेच जसे आले तसे निघून जातात.

**धूमकेतूंची उत्पत्तिः**— धूमकेतु कांहीं कोठून अनंतांतून येऊन सौरमालेंत शिरत नाहींत येवढें निश्चित; पण ते नक्की कोठून येतात हें खगोलशास्त्रज्ञांनाहि अजून पूर्णपणें उमगलें नाहीं. याबद्दल निरनिराळ्या शास्त्रज्ञांचीं निरनिराळीं मतें आहेत.

पहिली मतप्रणाली अशी कीं, धूमकेतु सूर्यापासून बाहेर टाकले जातात. याच्या पुष्ट्यर्थ शास्त्रज्ञ खालील कारण देतात. धूमकेतु सूर्याभोंवतीं विशिष्ट कक्षेंतून फिरत असतांना, ते एका विशिष्ट बिंदूपाशीं सूर्याच्या अगदीं जवळ येतात, तें अंतर ( Perihelion distance ) इतके

कमी असतें कीं ते जवळजवळ सूर्याच्या पृष्ठभागाला घसटूनच जातात असें म्हणावयास हरकत नाहीं. उदाहरणार्थ १८८२ चा धूमकेतु (Great Comet). ह्या धूमकेतूच्या कक्षेवरचा व सूर्याला सर्वांत जवळ असलेला असा जो बिंदु त्याचें सूर्याच्या मध्यापासूनचें ( Centre ) अंतर ७२०,००० मैल होतें. सूर्याची त्रिज्याच ४३०,००० मैल आहे. म्हणजे सूर्याच्या पृष्ठभागापासून या बिंदूचें अंतर फक्त २९०,००० मैल होतें. ह्या अत्यंत कमी अंतरामुळें धूमकेतु हे सूर्यापासून निघाले असावेत अशी कल्पना आहे. ह्या धूमकेतूचें सूर्यापासूनचें जास्तींत जास्त अंतर १६,००० दशलक्ष मैल असून एकदां सूर्यापासून निघून पुन्हां सूर्याजवळ येण्यास त्याला ७६० वर्षें लागतात. असो. तेव्हां वरील आंकडयांवरून तरी हें कारण खरें असावें असें वाटतें

पण ही मतप्रणाली मान्य करण्यांत एक मोठी अडचण येते. आपल्याला माहीत आहे कीं, जेव्हां एखाद्या धूमकेतूच्या शेपटींतून पृथ्वी जाते तेव्हां उल्कापात होतो. उल्का ही घन वस्तु असते. पण सूर्य अशा उल्कांनीं भरलेली वस्तु बाहेर टाकील हें अशक्य वाटतें. याला कारण असें कीं सूर्याच्या पृष्ठभागाचें तपमान ६०००° सें. असतें. ह्या तपमानांत सर्व उल्कांचें वाफेंत रूपांतर होऊन जाईल. शिवाय वायुरूपांतच ह्या उल्का टाकल्या गेल्या असें समजलें तर विज्ञानशास्त्राच्या नियमाप्रमाणें ह्या प्रचंड तपमानाला निर्माण झालेले वायुरूप पदार्थ उल्कांप्रमाणें घनस्थितींत एकत्र न येतां ताबडतोब अंतराळांत विखरून जातील.

दुसरी मतप्रणाली अशी कीं कांहीं कांहीं धूमकेतु एक तर मोठमोठया ग्रहांमधून बाहेर तरी टाकले गेले असावेत किंवा ह्या ग्रहांनीं त्यांना इतक्या जोरांत ओढून घेतलें असलें पाहिजे कीं आपण आज त्यांना ज्या कक्षेंतून फिरतांना बघतों त्या कक्षेंत ते जबरदस्तीनें फिरूं लागले असले पाहिजेत. येथें हें नमूद करणें आवश्यक आहे कीं धूमकेतूंचे दोन वर्ग पडतात. ( १ ) दीर्घकालिक अथवा विलम्बी धूमकेतु, म्हणजे सूर्याभोंवतीं एक फेरी घालण्यास ज्यांना फार कालावधि लागतो, ते. उदा. वर उल्लेखिलेला १८८२ चा धूमकेतु. आणि ( २ ) अविलम्बी धूमकेतु म्हणजे अल्प काळांत सूर्यप्रदक्षिणा पुरी करणारे धूमकेतु. उदा. ( Encke ) एन्केचा धूमकेतु. या धूमकेतूस सूर्याभोंवतीं एक फेरी घालण्यास फक्त ३$\frac{1}{3}$ वर्षें लागतात. आजपर्यंत ज्ञात असलेल्या अविलम्बी धूमकेतूंत हाच सर्वांत कमी कालावधींत एक फेरी पूर्ण करणारा धूमकेतु होय. परंतु ३$\frac{1}{3}$ वर्षांपासून ७६ वर्षांत एक प्रदक्षिणा पूर्ण करणारे धूमकेतूहि अविलम्बी धूमकेतूंतच मोडतात. असो. हे धूमकेतु ( अविलम्बी ) विशिष्ट ग्रहांशीं संबंधित असतात. उदा. हॅलेचा धूमकेतु. हा धूमकेतु आपल्या कक्षेंतून फिरत असतां सूर्यापासून जास्तींत जास्त लांब जातो तेव्हां त्याचें सूर्यापासूनचें अंतर ३,३४० दशलक्ष मैल असतें, व नेपच्यूनचें तें अंतर २,७९७ दशलक्ष मैल असतें. एक-मेकांना जवळ असणाऱ्या ह्या आंकडयांवरून असें म्हणावयास हरकत नाहीं कीं हॅलेनें शोधून काढलेला धूमकेतु बहुधा नेपच्यूनपासूनच निघाला असावा.

तिसरी मतप्रणाली अशी कीं आज अविलम्बी दिसणारे धूमकेतु पूर्वी विलम्बी ( अथवा दीर्घकालिक ) धूमकेतूंपासून निघाले असावेत. हे दीर्घकालिक धूमकेतु मोठमोठया ग्रहांच्या फार जवळ गेल्यामुळें ते अशा जबरदस्तीनें ओढले गेले कीं त्या ग्रहांच्या उपग्रहांपैकींच एक म्हणून ते फिरू लागले. बाह्यतः ही मतप्रणाली दिसावयास जरी गोड दिसत असली तरी काळजीपूर्वक विचार केल्यावर ती किती अशक्यप्राय आहे हें दिसून येतें.

पण हें सगळें पुराण झालें अविलम्बी धूमकेतूंचें ! मोठमोठ्या ग्रहांनीं ते बाहेर टाकलेले

आहेत किंवा ओढून घेतलेले आहेत असें जरी मानलें तरी दीर्घकालिक धूमकेतूंची काय वाट लावायची ? ते कोठून येतात ? खगोलशास्त्रज्ञांना सूर्यमालेच्या स्वरूपाचा अजून उलगडा झाला नाहीं; आणि तो होईपर्यंत हेंहि एक कोडेंच राहणार आहे.

**धूमकेतूंतील मूलतत्त्वें:**— धूमकेतूंची उत्पत्ति कशी होते हें उपरिनिर्दिष्ट विवेचनावरून समजून घेतल्यानंतर धूमकेतु कसे बनलेले असावेत असा प्रश्न सहजच उभा राहतो. धूमकेतु हा सामान्यपणें तीन भागांचा बनलेला असतो. ते असे:— ( १ ) केतुनाभि ( nucleus, the body of a comet ), ( २ ) कदम्ब ( coma ) आणि ( ३ ) पुच्छ ( tail ).

( १ ) केतुनाभि ( nucleus ):— हा भाग ग्रहांप्रमाणें घन पदार्थ नसून निरनिराळ्या आकारमानांच्या कणां ( Particles ) चा तो समूह असतो. ह्या कणांची विविधता तरी किती वर्णावी ! कांहीं कण वाळूंच्या बारीक कणांइतके असतात, तर कांहीं सामान्य दगडांएवढे आणि कांहीं तर कित्येक घनयार्ड आकारमानाचे असतात. कांहीं असतात लोखंडाचे, कांहीं निकेलचे तर कांहीं मॅग्नेशियमचे आणि कांहीं सोडियमचे. जिकडे बघावें तिकडे कणच कण.

( २ ) कदम्ब ( coma )-केतुनाभीला परिवेष्टित करणारा हा भाग सूर्याजवळ जातांना वृद्धिंगत होतो. वर निर्देशिलेल्या कणांपासून सूर्याच्या ऊष्णतेनें वायु तयार होतात. ह्या वायूंत वरील कणांपासून बनलेले अतिसूक्ष्म कण असतात. तेच सूर्यप्रकाश परावर्तित करतात. त्यामुळें कदम्ब ( coma ) दृग्गोचर होतो.

( ३ ) पुच्छ ( tail ) :—सगळ्यांत स्पष्टपणें दिसणाऱ्या या भागानें, मोराला पिसाऱ्यानें जी शोभा येते तीच धूमकेतूला येते. तुम्ही जर कधीं धूमकेतु निरखून निरखून बघितले असतील तर तुम्हांला असें दिसून येईल कीं धूमकेतूचें हें पुच्छ नेहमीं सूर्याच्या विरुद्ध दिशेला असतें. असें कां बरें असावें ? केपलर यानें सतराव्या शतकांत असें सुचविलें कीं सूर्यप्रकाशाच्या दाबानें हें शेपूट सूर्याच्या विरुद्ध दिशेला जात असावें. सूर्याच्या आकर्षणशक्तीपेक्षां त्याची प्रसारकशक्ति जास्त असल्यामुळें असें होतें. प्रसारण आणि आकर्षण यांच्या प्रेरणांचें प्रमाण कणांच्या व्यासाच्या उलट-प्रमाणांत वाढत असल्यानें धूमकेतूच्या पुच्छातील कणांचा व्यास ·००१ मि. मि. पेक्षां जास्त नसला पाहिजे असा आऱ्हेनियस् यानें शोध लावला. प्रकाशाच्या दाबाच्या विभाजक क्रिये ( sorting action ) मुळें कधीं कधी दोन किंवा अधिक शेपट्याहि दिसूं शकतात. कधीं कधीं या शेपट्यांची लांबी इतकी अफाट असते कीं ती तशी खरोखरीच असेल कां अशी शंका मनांत डोकावूं लागते. ही लांबी ५० ते १५० दशलक्ष मैलांइतकी असते. शेपटाची रुंदीहि अशीच प्रचंड म्हणजे $\frac{१५}{२०}$ लक्षांपर्यंत असते. हॅलेच्या धूमकेतूच्या पुच्छाबाबत एक मनोरंजक गोष्ट अशी सांगतात कीं १९२० च्या फेब्रुवारीमध्यें ती लांबी ९ दशलक्ष मैल होती आणि त्याच वर्षी ५ मेला तो २८ दशलक्ष मैलांनीं वाढली असल्याचें आढळून आलें ! ज्याची प्रत्येक गोष्ट वैचित्र्यपूर्ण त्याच्यांत या एका विचित्र गोष्टीचें काय होय !

**धूमकेतूची कक्षा :**—सूर्यमालेंतील सर्वांत खट्याळ प्राणी जर कोणी असेल तर तो धूमकेतु. सगळ्यांच्याहून कांहींतरी वेगवेगळेपणानें वागण्यांतच तो भूषण मानतो. सूर्यमालेंतील बहुतेक सर्व ग्रह जवळ जवळ वर्तुळाकार कक्षेंत फिरतात; परंतु धूमकेतु वर्तुळाकार कक्षेंत कधींच फिरत नाहींत. सर्व ग्रह सूर्याभोंवतीं ज्या दिशेनें फिरतात त्याच्या नेमक्या उलट दिशेनें हे फिरतात. नाहीं म्हणावयास ग्रहांमध्यें आणि ह्या धूमकेतूंमध्यें एकच साम्य आहे, आणि तें म्हणजे दोघेहि सूर्या-

भोंवतींच फिरतात. पण त्यांतहि कांहीं चक्रमसारखें वागणारे धूमकेतु आहेत. ते सूर्यमालेंतून जे एकदां पसार होतात ते पुनश्च म्हणून कधीं येत नाहींत. पण हे असे कां जातात ? ते वर्तुळाकार कक्षेंत फिरत नाहींत तर मग कोणत्या कक्षेंत फिरतात ? वगैरे प्रश्नांचीं उत्तरें समजून घेणें आवश्यक आहे.

धूमकेतु सर्वसाधारणपणें ( १ ) लंबवर्तुळाकार ( elliptic ) आणि ( २ ) hyperbolic या कक्षांतून फिरतात. परवलयाकृति ( parabolic ) कक्षा मात्र सहसा असत नाहीं. लंबवर्तुळ ही एक परिमित ( closed ) आकृति ( curve ) आहे. त्यामुळें त्या कक्षेंतून फिरणारे धूमकेतु सूर्यापासून लांब गेल्यानंतर पुन्हां त्याच मार्गानें परततात. प्लूटो सूर्यापासून जास्तींत जास्त लांब गेला म्हणजे त्याचें सूर्यापासूनचें अंतर ४,६०० दशलक्ष मैल असतें, आणि तोच सूर्याला अगदीं जवळ आला म्हणजे तें २,७०० दशलक्ष मैल असतें. परवलयी आणि hyperbolic कक्षांचें मात्र तसें नाहीं.

**धूमकेतूचा वेगः—** विलम्बी धूमकेतूंचे वेग, ते जेव्हां दृग्गोचर होतात तेव्हां ठरविता येतात. अर्थात् तेव्हां ते सूर्याला अगदीं जवळ असतात. पृथ्वी सूर्यापासून जितकी लांब आहे तितकाच दूर जर धूमकेतु असेल तर त्याचा वेग दर सेकंदाला २६ मैल याप्रमाणें असतो. जर तो ह्या अंतराच्या चौपट लांब असेल तर हा वेग $२६/\sqrt{४}$ मैल ( दर सेकंदास ) इतका असतो, आणि दुप्पट असल्यास ( $२६/\sqrt{\frac{१}{२}}$) इतके मैल असतो. अर्थात् हें सर्व ठोकळमानानें खरें धरावयाचें. धूमकेतु सूर्यापासून फारच लांब गेल्यास हे वेग खरे ठरत नाहींत.

**धूमकेतु व उल्काः—** एरव्हीं धूमकेतु आकाशांत बघण्यास तर मजा वाटतेच, पण जेव्हां ते पृथ्वीवर उल्कांचा वर्षाव करतात तेव्हां तर ही मौज कांहीं अपूर्वच असते. आपण वर बघितलें कीं केतुनाभि ( nucleus ) हा लहान कणांनीं बनलेला दिसतो. इतर ग्रहांप्रमाणें धूमकेतूलाहि स्वतःचें गुरुत्वाकर्षण असतें. गुरुत्वाकर्षणाच्या या प्रेरणेमुळें हे कण एकत्र राहतात. धूमकेतु सूर्याच्या अगदीं जवळ गेल्यावर सूर्याच्या गुरुत्वाकर्षणापुढें धूमकेतूचें गुरुत्वाकर्षण फिकें पडतें व धूमकेतूंतील कण विलग होतात.

धूमकेतु सूर्यभोंवतीं फिरतांना खूपच कण मागें टाकतात. त्यास ( Debris ) असें म्हणतात. धूमकेतु ज्या वेगानें पुढें जातात त्याच वेगानें हा कणसमूह जाऊं शकत नाहीं व तो मागें पडतो आणि धूमकेतूच्या कक्षेच्या पातळींत हे कण पसरतात. ते कांहीं ठिकाणीं दाट असतात तर कांहीं ठिकाणीं विरळ. पुढें शतकानुशतकानंतर हे कण सर्व मार्गभर पसरतात. पृथ्वी जेव्हां या कणसमूहांतून जाऊं लागते तेव्हां हे वेगवान् कण तिच्यावर उल्कांच्या रूपानें पडतात.

**धूमकेतूंचें आयुष्यः--** वर सांगितल्याप्रमाणें धूमकेतूचें हळूहळू Debris मध्यें रूपांतर होत असतें. होतां होतां धूमकेतूंतील सर्व द्रव्याचें ( material ) कणांत रूपांतर होऊन धूमकेतु नाहींसे होतात. कित्येक वेळीं लंबवर्तुळाकार कक्षेंत फिरणारे धूमकेतु, गुरु, शनि, वरुण इत्यादि अफाट वस्तुमान असलेल्या ग्रहांच्या फार जवळ गेल्यामुळें त्या कक्षेंतून ओढले जातात व सूर्याला एकदां शेवटचा वळसा घालून सौरमालेच्या मर्यादा ओलांडून कायमचे अनंतांत विलीन होतात.

सूर्यमालेंत कांहीं काळ प्रविष्ट होऊन, तिची चाकोरी मोडून कांहीं नवनवीन गंमती दाखविणारा हा धूमकेतु सामान्य माणसांपासून तों थेट खगोलशास्त्रज्ञांपर्यंत सगळ्यांच्याच कुतूहलाचा विषय होऊन बसला आहे यांत मात्र शंका नाहीं.

# पृथ्वीचें वय

लेखक : **हेमचंद्र दयार्णव कोपर्डेकर**-इंटर सायन्स

*मृग लागतात, आकाश ढगांनीं भरून जातें, सर्वत्र अंधार पसरतो. आणि पृथ्वीवर जलधारांचा वर्षाव सुरू होतो. असेच कांहीं दिवस जातात. आणि एक दिवस वसुंधरा हिरवागार शालू नेसलेल्या युवतीसारखी दिसते. तारुण्यानें बहरलेली असते त्यावेळीं ही धरणी. श्रावणांतलें शिवरें गेलें, दिवसामागून दिवस गेले आणि वयहि वाढलें पृथ्वीचें. भाद्र्यांत ही तारुण्यांतून प्रौढत्वाकडे झुकलेली असते. तर शिशिरांतील थंडी ही तिच्या उत्तर आयुष्याची नांदी असते. ग्रीष्म येतो आणि ती जख्ख म्हातारी होते. जणूं पिकलेलें पान. पण पुन्हां मृग लागतात आणि पृथ्वी पुन्हां यौवनभारानें भारावलेल्या तरुणीसारखी दिसूं लागते.*


हें प्रतिमासीं बदलणारें पृथ्वीचें स्वरूप पाहिलें कीं सहजच एक प्रश्न पुढें उभा राहतो. हें असें किती दिवस चाललें आहे ? खरोखर ही पृथ्वी आहे तरी किती वर्षांची ? हजार, पांच हजार, लाख, दहा लाख ? कीं मोजमापच नाहीं हिच्या वयाला ! शास्त्रज्ञांच्या दृष्टीनें हा एक चिंतनाचा विषय आहे. पृथ्वी ही आपली आई. तिचें वय कळलें म्हणजे तिच्या वडिलांचें–भगवान् सूर्यनारायणाचें वय काढतां येईल. आणि तें कळलें कीं अवघ्या विश्वाच्या वयाचा पत्ता लागेल. विश्वाचें गोत्र सांपडेल. आणि मग या विश्वाचा मूळपुरुष कोण त्याचा पत्ता लागेल. हें विश्व म्हणें सतत वाढतें आहे, सर्व ग्रह, तारे अनाकलनीय वेगानें एकमेकांपासून दूर जात आहेत. हें कोडें काय आहे तें तरी एकदां उकलेल !

पृथ्वीचें वय काढण्याच्या अनेक पद्धति शास्त्रज्ञांनीं शोधून काढल्या आहेत. त्यांपैकीं दोनतीन पद्धतींचा आपल्याला येथें विचार करतां येईल.

पृथ्वी ज्या १०३ मूलद्रव्यांची बनलेली आहे त्यांच्यापैकीं कांहीं मोठी गमतीची आहेत. त्यांचे परमाणू सारखे फुटून नाश पावत असतात. त्याचें हें नाश पावणें अनादि कालापासून उष्णता, थंडी, वारा, रसायनें ह्यांना न जुमानतां अव्याहत चालू आहे. ते ज्या वेगानें नाश पावतात तो वेगसुद्धां सदोदित कायम असतो.--२६०° सेंटिग्रेड पासून ५०००° सेंटिग्रेड इतका तपमानांत फरक झाला तरी त्यांच्या नाशाचा वेग बदलत नाहीं. अशा परमाणूंना आपण उत्सर्जक परमाणू ( Radio Active Atoms ) म्हणूं या. आतां आपण यांच्यापैकीं उदाहरण म्हणून एक परमाणु घेऊं. याचें नांव युरेनियम्-२३५ ( २३५ परमाणूभार असलेला युरेनिअम् ). समजा आज आपल्याजवळ आपल्या प्रयोगशाळेंत एक ग्रॅम युरेनिअम् आहे. त्याच्या नाशाचा जो वेग शास्त्रज्ञांनीं दिलेला आहे तो असा आहे· तो बरोबर ( ७० कोटी ) वर्षांनीं आजच्या निम्मा म्हणजेच $\frac{1}{2}$ ग्रॅम होईल. आणखी ७००००,०००,० वर्षांनीं तो $\frac{1}{4}$ ग्रॅम होईल आणि याच पद्धतीनें $\frac{1}{8}$, $\frac{1}{16}$ असें त्याचे भाग पुढील दर ७०००,०००,०० वर्षांनीं होत जातील. आतां समजा सबंध पृथ्वीवर सध्यां क्ष ग्रॅम इतका युरेनिअमूचा सांठा आहे. तर

७० कोटी वर्षांपूर्वी तो २ क्ष ग्रॅम असला पाहिजे. म्हणजेच आज क्ष ग्रॅम असलेला युरेनिअम १४०००,०००,०० इतक्या वर्षांपूर्वी ४ क्ष ग्रॅम असेल. ह्याच क्रमानें २१०००,०००,०० इतक्या वर्षांपूर्वी ८ क्ष ग्रॅम असेल आणि २८०००,०००,०० ( २८० कोटी ) इतक्या वर्षांपूर्वी १६ क्ष ग्रॅम असेल, वगैरे.

अशा रीतीनें आपल्याला कितीहि मागें जातां येईल. पण जायचें किती याला कांहीं मर्यादा तरी आहे कां ? आहे. ती अशी पडते. सर्वसाधारणपणें जसजसें मूलद्रव्यांचे परमाणूभार वाढत जातात, तसतसे ते पृथ्वीवर कमी प्रमाणांत सांपडतात. म्हणजेच सर्वांत जास्त परमाणूभार असलेलें मूलद्रव्य सर्वांत कमी प्रमाणांत सांपडतें. याप्रमाणें तौलनिक विपुलता आणि परमाणूभार यांचा जर एक आलेख काढला तर तो पुढीलप्रमाणें येईल.




परमाणुभार जर जास्त असेल तर त्याचा तौलनिक सांठा एका विवक्षित मर्यादेपलीकडे जाऊं शकणार नाहीं. आपण जर ७०००,०००,०० वर्षांच्या टप्प्यांनीं फार फार मागें गेलों तर युरेनियम -२३५ चा तौलनिक सांठा इतर परमाणूंच्या मानानें फारच वाढेल. परंतु शास्त्रज्ञांना तो तितका जास्त असणें शक्य वाटत नाहीं. म्हणूनच आपण ७०००,०००,०० वर्षांच्या टप्प्यांनीं इतकेच मागें गेलें पाहिजे कीं युरेनियमचा सांठा इतर परमाणूंच्या मानानें प्रमाणाबाहेर जाणार नाहीं. शास्त्रज्ञांनीं हें सर्व विचारांत घेऊन पृथ्वीचें वय ७०००,०००,००× ७ इतकीं वर्षें मागें नेलें आहे. म्हणजे पृथ्वी आज सुमारें ५०००,०००,००० ( ५०० कोटी ) वर्षें वयाची आहे. पृथ्वीवर आज शेंकडा ०·७२ एवढा युरेनियम २३५ चा सांठा आहे. गणितानें असें सिद्ध करतां येतें कीं ५०००,०००,००० वर्षांपूर्वी तो शें. ०·७८ होता. परंतु आणखी ५०००,०००,००० वर्षें म्हणजे एकूण १०००,०००,०००० वर्षें आपण मागें गेलों तर त्याची विपुलता आजच्या १६००० पट होईल. शास्त्रज्ञांना हें विसंगत वाटतें. म्हणून त्यांनीं पृथ्वीचें आजचें वय ५०००,-०००,००० वर्षें धरलें आहे. थोरियम आणि युरेनियम -२३८ ह्यांच्या तौलनिक विपुलतेवरून वरील वयालाच पुष्टि मिळते.

आतां आपण दुसऱ्या एका पद्धतीचा विचार करूं. सागराच्या खारटपणावरूनसुद्धां पृथ्वीच्या वयाची कांहीं कल्पना येऊं शकते. पृथ्वीवरच्या इतर भागांतील क्षार वाहून नेऊन नद्या समुद्रांत टाकीत असतात. त्यामुळें समुद्रास खारटपणा येत असतो. समजा सर्व सागरांत सध्यां 'अ' ग्रॅम्स इतके क्षार आहेत. जर नद्या प्रतिवर्षी 'क' ग्रॅम्स इतके क्षार आणून टाकीत असतील तर साध्या त्रैराशिकानें कोणालाहि पृथ्वीचें वय काढतां येईल.

'क' ग्रॅम्सला १ वर्ष लागतें तर 'अ' ग्रॅम्सला किती लागेल ?

$\frac{\text{अ}}{\text{क}} \times १ = \frac{\text{अ}}{\text{क}}$ वर्षें हा भागाकार सुमारें ३०००,०००,००० वर्षें याच्या आसपास येतो.

परंतु हें वय इतर पद्धतींनीं काढलेल्यांत सर्वांत कमी आहे. पृथ्वीच्या सुरुवातीच्या काळीं ज्यावेळीं भूकंप वगैरेंचें प्रमाण फार होतें त्यावेळीं पृथ्वी आजच्यासारखी उतरती नव्हती, नुसतें सपाट मैदानच होतें. त्यामुळें नद्यांनीं होणारी झीज अगदींच कमी प्रमाणांत होती. ती आजच्या $\frac{1}{10}$ असावी असा अंदाज आहे. ह्या कल्पनेनेंसुद्धां जास्तींत जास्त मागें जाऊन पृथ्वीचें वय ( ५०० कोटी ) ५०००,०००,००० वर्षेंच येतें.

आतां वातावरणांतील वायूवरून वय काढण्यांच्या तिसऱ्या एका पद्धतीचा विचार करूं. हवेंत ऑक्सिजन नैट्रोजन यांच्याप्रमाणेंच अरगॉन नांवाचा एक वायू आहे. हा वायू अगदींच थोड्या प्रमाणांत सांपडतो. शास्त्रज्ञांच्या मतें हा वायू "पोटॅशियम-४०" या उत्सर्जक मूलद्रव्याच्या विघटनामुळें तयार होतो. पृथ्वीवरील पोटॅशियम ४० नष्ट होत जातो व हा वायू तयार होत जातो. पोटॅशियम-४० नष्ट होण्याचा एक ठराविक वेग आहे व त्यावरून अमुक एक पोटॅशियम-४० नष्ट व्हायला किती काळ लागला असेल किंवा अमुक एक अरगॉन् तयार व्हायला किती काळ लागला असेल तें काढतां येईल. आपणाला आज वातावरणांत किती अरगॉन आहे ह्याचा अंदाज काढतां येतो. एका ठराविक हवेच्या वजनांत किती अरगॉन आहे हें मोजून एकूण वातावरणांत किती अरगॉन असावा हें साध्या गणितानें काढतां येईल. हा अरगॉन किती आहे हें कळल्यावर तो तयार होण्यास किती पोटॅशियम-४० विघटित झालें असलें पाहिजे त्याचा अदमास लागेल. आपल्याला पोटॅशियम-४० च्या विघटनाचा वेग माहीत असल्यानें त्याच्या विघटनास लागलेला काळ कळेल व पृथ्वीवर वातावरण अस्तित्वांत आल्यापासून आजतागायतचा काळ काढतां येईल. या पद्धतीनेंहि पृथ्वीचें वय ५०००,०००,००० इतकीं वर्षेंच येतें.

युरेनियम ह्या धातूचें विघटन होत होत शेवटीं त्याचें शिसें बनतें. अशा प्रकारे तयार झालेलें शिसें ( हें मूलद्रव्य शिसें-यापेक्षां थोडें निराळें असतें. ) हें किती आहे व तें व्हायला किती काळ लागला असेल याचा अभ्यास करून खडकांचेंहि वय काढतां येतें व ह्या पद्धतीनेंहि पृथ्वीचें वय ५०००,०००,००० वर्षेंच येतें.

ह्या सर्वांवरून शास्त्रज्ञांनीं पृथ्वीच्या वयाचा अंदाज सुमारें ५०००,०००,००० हा धरला आहे. हें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे कीं हा अंदाज आहे. हें नक्की वय नाहीं. सखोल अभ्यासानें शास्त्रज्ञ अजूनसुद्धां नक्की वय ठरविण्याचा प्रयत्न करीत आहेत. भविष्य अज्ञात आहे. वयाच्या ह्या अंदाजावरून मानव विश्वासंबंधीं काय काय माहिती मिळवील तें सांगतां येत नाहीं.

येथें एवढेंच सांगून थांबलें पाहिजे कीं प्रतिमासीं आपलें रूप पालटणारी ही आपली पृथ्वी अंदाजें ( ५०० कोटी ) ५०००,०००,००० वर्षांची आहे.

---

# *— स्वर्गांतील शास्त्रज्ञ —*

लेखक : श्रा. **पां. सोनटक्के**-सीनिअर बी. एस्सी.

मी मरण पावल्यावर चित्रगुप्तापुढें पापपुण्याचा झाडा देत होतों. माझी जबानी बहुतेक संपली होती. चित्रगुप्त खुशींत दिसत असल्यामुळें स्वर्गांत जाण्याचा 'चान्स' मिळेल असें वाटत होतें. शेवटीं तो म्हणाला " तुझ्या सुदैवानें पुण्याचा वांटा पापापेक्षां जास्त भरल्यानें तुला स्वर्गांत जातां येईल. बरें ! तें असो. पण तूं शास्त्रज्ञ वगैरे नाहींस ना ! विज्ञानशाखेचा विद्यार्थी होतास म्हणून विचारतों.

" छे ! छे ! इतकी माझी योग्यता नाहीं. पण आपल्या विचारण्याचें कारण कळेल काय ? " मी चित्रगुप्तास विचारलें. त्यावर चित्रगुप्त म्हणाला, " येथें येणाऱ्या सर्व शास्त्रज्ञांना परमेश्वरानें पृथ्वीसारखी प्रतिसृष्टि निर्माण करून तेथें ठेवले आहे. त्यामुळें हे शास्त्रज्ञ येथें आले कीं आपलें संशोधन पुढें सुरू करतात. त्यांस जरूर ती सामुग्री पुरविण्यांत आल्यानें ते इतर गोष्टींत लक्ष घालीत नाहींत. त्यांना स्वर्गांत प्रवेश मिळत नाहीं. "

हें ऐकून मात्र मला सात्त्विक संताप आला. खरें म्हणजे शास्त्रज्ञ, संशोधक हे खरे कर्मयोगी. तेव्हां त्यांस स्वर्गांत केवढें मानाचें स्थान पाहिजे. तें गेलें कोणीकडेच, आणि ज्या दरिद्री पृथ्वीवरून ते आले तसल्याच परिस्थितींत त्यांना ठेवलें आहे. काय न्याय आहे पहा !

माझे विचार चित्रगुप्तानें ओळखले असें दिसलें तो म्हणाला, " त्याचें असें आहे, इथें येणारे शास्त्रज्ञ आपल्याच संशोधनाच्या भ्रमांत असतात. त्यांस जर परमेश्वरी लीला दाखविली तर ते माथेफिरूसारखे वागतात. तुमच्या पृथ्वीवरचा न्यूटन म्हणून कोणी मनुष्य येथें आला. त्यानें आयुष्यभर सृष्टीचें कोडें उलगडण्याचा प्रयत्न केला म्हणून त्याला प्रथम मीं स्वर्गांत पाठवला. परंतु त्यानें जेव्हां भगवान् विष्णु अंतराळांतून सर्व पुण्यात्म्यांना दर्शन देत निघालेले पाहिलें तेव्हां 'गुरुत्वाकर्षणाविरुद्ध हें कसें झालें ?' म्हणून वेड घेतलें. त्यास कोणत्या उपायानें शुद्धीवर आणावें हेंच आम्हांला कळेना. मग त्यावर पुन्हां माया पसरून पृथ्वीसारख्याच सृष्टींत त्याला ठेवलें. आतां तो आपले प्रयोग पुढें चालवीत आहे. तेव्हांपासून बाकीच्या शास्त्रज्ञांनाहि आम्ही तेथेंच पाठवतों. मात्र या सर्व शास्त्रज्ञांना नवीन लागलेल्या शोधांची माहिती मिळत नाहीं; कारण तें एकमेकाशीं कधींहि बोलत नाहींत. आम्हींच तशी योजना केली आहे."

मला विलक्षण नवल वाटलें. मीं म्हटलें, " मला त्या सृष्टींत जावयास मिळेल काय ? या सर्व व्यक्तींविषयीं मला अत्यंत आदर असल्यानें मला त्यांना पहावेंसें वाटतें. आपण कृपा केली तर..." " ठीक आहे. त्या दारांतून आंत जा. " दूरवर असलेल्या एका मोठ्या लोखंडी दरवाजाकडे बोट दाखवीत तो म्हणाला. मीं सरावाप्रमाणें चटकन् " थँक्स " म्हणून मग जीभ चावली व सटकलों.

मी लोखंडी दरवाजांतून आंत प्रवेश केला. मला ती प्रतिसृष्टि पाहून नाविन्य अर्थातच

वाटलें नाहीं. डोक्यावर आकाश होतें. पायाखालीं माती होती. अन् दगडाविटांचीं घरें होतीं. मी इकडेतिकडे नजर फेंकतांच जवळच्याच एका घराच्या छपरांतून एक कांचेची नळी बाहेर आलेली दिसली. मी उत्सुकता म्हणून तेथें गेलों. जातांना रस्त्यांत कोणीहि भेटलें नाहीं. प्रत्येकजण आपल्या घरांत गंभीरपणें विचार करीत बसला होता. मी त्या घराजवळ पोचतांच एक मनुष्य शिडी घेऊन वर जाण्याच्या तयारींत असलेला दिसला. माझा गणित आणि विज्ञानशास्त्राचा अभ्यास थापा मारण्याइतपत झाला असल्यानें तो कोण आहे व वर कशाकरतां जात आहे हें मीं चटकन ओळखलें. तो शास्त्रज्ञ गॅलिलीओ होता. त्यानें एक भारमापक यंत्र तयार केलें होतें. हा भारमापक म्हणजे चाळीस फूट उंचीची एक कांचेची पाण्यानें भरलेली नळी होती. पाण्याच्या स्तंभाची उंची हवेचा भार दाखवत असे. मी चटकन् फाटकांतून आंत शिरलों व म्हणालों, " रामराम गॅलिलीओसाहेब, हवेचा भार सध्यां किती आहे ? " गॅलिलीओ अर्थांतच खुषींत आला. " बघून सांगतों, " असें म्हणून तो वर चढला व बुचाचा तुकडा किती फूट उंचीवर तरंगत आहे हें मला त्यानें सांगितलें. खालीं उतरल्यावर लगेच त्यानें आंतल्या खोलींत मला नेलें. आम्ही स्थानापन्न होतांच मीं म्हटलें, " हा भारमापक फार गैरसोयीचा आहे असें आपणांला वाटत नाहीं ? पाण्यापेक्षां पारा कां वापरत नाहीं आपण ? "

" पारा ! ही काय भानगड आहे ? "—गॅलिलीओ घोटाळ्यांत पडला. मी क्षणभर चित्रगुप्तानें काय सांगितलें होतें तें विसरूनच गेलों होतों. गॅलिलीओ मरण पावल्यावर जे शोध लागले त्याबद्दल त्याला कांहींच माहिती नसणार हें मग माझ्या लक्षांत आलें. तेव्हां त्याला माझ्या ज्ञानाची थोडीशी चुणूक दाखवण्यासाठीं मी म्हणालों, " पारा हा एक द्रव अवस्थेंत असलेला धातु आहे. तो कांचेला चिकटत नाहीं. त्याची लवकर वाफहि होत नाहीं. तो पाण्याच्या साडेतेरापट जड आहे. ( हीं वाक्यें मीं मॅट्रिकला असतांना पाठ केलीं होतीं ). तेव्हां आपण जर पारा भारमापकांत वापरलात तर तो भारमापक अवघा तीन फूट उंचीचा होईल व हाताळण्यासहि सोयीचा होईल. "

त्यानंतर गॅलिलीओ सुमारें पांच मिनिटें तरी माझ्याकडे डोळे फाडून पहात असावा. त्याला ही माहिती नवीन होती तरी माझें बोलणेंहि पटलें होतें.

" आपण शास्त्रज्ञ दिसतां ! हा पारा मिळवून देण्याची आपण कृपा कराल काय ? "——

हें गॅलिलीओचे शब्द ऐकून सबंध आयुष्यांत ( अर्थात् पृथ्वीवरच्या ) जेवढें चढलें नसेल एवढें मांस माझ्या अंगावर कांहीं क्षणांतच चढलें. मला उठतां येईल कीं नाहीं याचीसुद्धां क्षणभर शंका आली. पण स्वतःला सांवरून मी म्हणालों——

" मी आपणांला पारा आणून देतों. पांच मिनिटं थांबा. "

" पांच मिनिटं ! हें मिनिट काय बुवा ? " गॅलिलीओ पुन्हां थंड होऊन म्हणाला.

" हूं ! हूं ! मिनिट होय ? तें कालमापनाचें एक नवीन साधन आहे. बराय्. मी जातों आतां. " असें म्हणून मी निघालों. गॅलिलीओ अर्थांतच फाटकापर्यंत पोंचवायला आला.

मी गॅलिलीओच्या घरांतून बाहेर पडलों. रस्त्यावर चिटपांखरूंहि नव्हतें. मी प्रत्येक घरावरील पाटी वाचत चाललों होतों. शास्त्रशाखेच्या विद्यार्थ्यांच्या डोकेदुखीस कारणीभूत असलेले ते शास्त्रज्ञ आपापल्या घरांत गंभीरपणें विचार करत बसले होते. या शास्त्रज्ञांना नवीन लागलेल्या शोधांची माहिती सांगून व त्यांच्या जुन्या कल्पना कशा चुकीच्या आहेत हें पटवून त्यांची डोकीं

फिरवून द्यावीत असें मला सारखें वाटत होतें. पण त्याआधीं मी एक काम करणार होतों. गॅलिलीओला पारा हवा होता. तो मी टॉरिसेलीकडून मिळवणार होतों. वस्तुतः टॉरिसेली हा गॅलिलीओचा शिष्य. तोहि शास्त्रज्ञसृष्टींतच होता. पण गॅलिलीओला त्याची माहिती नव्हती. स्वर्गांतील नियमच तसे होते ! चालतां चालतां मला एका घरावर टॉरिसेलीच्या नांवाची पाटी दिसली. मी त्या घरांत बेधडक शिरलों. टॉरिसेली एक प्रथमावस्थेंत असलेलें पाऱ्याचें भारमापक घेऊन खेळत ( म्हणजे प्रयोग करत ) बसला होता. मी भारमापकाविषयीं इकडे तिकडे बोलून हळूंच त्याच्याजवळ पारा मागितला. टॉरिसेलीनेंहि तो खुषीनें दिला. मग मी हळूंहळूं त्याच्याजवळ फॉर्टिनच्या भारमापकाविषयीं बोललों. ( फॉर्टिन हा अर्थातच टॉरिसेली नंतरचा. ) पण फॉर्टिनचा उल्लेख मात्र कोठेंच केला नाहीं. त्यानें ( म्हणजे फॉर्टिननें ) केलेल्या अद्यावत् भारमापकाचें वर्णन करून 'असा एखादा भारमापक करतां येईल काय ?' असें टॉरिसेलीला विचारलें. माझ्या कल्पनेवर ( खरं म्हणजे त्याला माहीत नसलेल्या 'वस्तुस्थिती' वर ) तो इतका खूष झाला कीं बोलायची सोय नाहीं. त्यानें 'आपण शास्त्रीय जगांतील एक झांकलें माणिक आहांत' असें बोलून दाखविलें. मग मी 'कसचं कसचं' शिवाय काय बोलणार ! पण मग टॉरिसेली अत्यंत गंभीर होऊन फॉर्टिनच्या भारमापकाविषयीं विचार करूं लागला. अर्थातच मी काढता पाय घेतला.

टॉरिसेलीच्या घरांतून पारा घेऊन बाहेर पडल्यावर मी गॅलिलीओकडे जात असतां माझी नजर एका घरावरील पाटीकडे गेली. तें घर फॉर्टिन या शास्त्रज्ञाचेंच होतें. फॉर्टिन अर्थातच टॉरिसेलीच्या नंतरच्या काळांतला. फॉर्टिनचा पाऱ्याचा भारमापक अद्यावत् अन् महत्त्वाचा असला तरी त्यास त्यानंतर शोध लागलेल्या निर्द्रव भारमापकाची माहिती नसण्याचा संभव होता. म्हणून मी खडा टाकायचें ठरविलें. अर्थात् फॉर्टिनशीं बोलणें अवघड असल्यानें मी प्रथम आमच्या विज्ञानशास्त्राच्या प्राध्यापकांना एक मनोमन नमन करून टाकलें. मग आमचें संभाषण झालें. तें असें : मी – रामराम फॉर्टिनसाहेब.

फॉर्टिन— रामराम. माफ करा मी जरा गडबडींत आहे. तुम्ही परत केव्हांतरी ...

मी—मी आपणांला भारमापकाविषयीं कांहीं शंका विचाराव्या म्हणून ...

फॉर्टिन-- ( आतुरतेनें ) काय ? भारमापकाविषयीं ! या या. बसा असे.

मी-- मी आपल्या भारमापकाचें वर्णन वाचलें ( गाईडमध्यें ) तेव्हां या विषयांतील आपणच एक अधिकारी व्यक्ति ...

फॉर्टिन-- कसचं, कसचं ...

मी—आपला भारमापक जरी अद्यावत् असला तरी वापरण्यास जरा गैरसोयीचा वाटतो.

फॉर्टिन—मग त्याला इलाज काय ?

मी—मी एक निर्द्रव भारमापकाची कल्पना आंखली आहे. (म्हणजे गाईडमध्यें वाचली आहे.)

फॉर्टिन—काय म्हणतां काय ? पाण्याशिवाय भारमापक ?

मी—होय. त्यांत पाऱ्याऐवजीं एका अत्यंत लवचिक पदार्थाची पट्टी बसवून...

फॉर्टिन—ऑं !

मी—होय. मग त्यावर हवेचा दाब बसला कीं ती कमी जास्त खालींवर होईल. तिलाच एक दर्शक अडकवला कीं झालें.

फॉर्टिन—ऑं ! ऑं !

मी—ह्या भारमापकाचा आकार ' डी. डी. टी. च्या डबीएवढा... '

फॉर्टिन--डी. डी. टी. ? ही काय भानगड ?

मी--( चमकून ) हूँ ! हूँ ! तें एक जंतुनाशक आहे.

फॉर्टिन--म्हणजे तुम्ही जंतुशास्त्रज्ञ आहांत काय ?

...सारांश काय तर मी फॉर्टिनला गारीगार केलें. तो ह्या नवीन ( त्याला ) भारमापका-विषयीं विचार करण्यांत गढून गेला. मी तेथून मग सटकलों. याप्रमाणें अनेक शास्त्रज्ञांचीं मीं नवे नवे शोध सांगून डोकीं फिरवलीं. नुसतें विज्ञानशास्त्रज्ञच नव्हे तर वनस्पतिशास्त्रज्ञसुद्धां. आतां डार्विनचीच गोष्ट घ्या ना. मी त्या स्वर्गांतील शास्त्रज्ञसृष्टींतून फिरत असतां हा गृहस्थ आपल्या घरासमोरच्या बागेंत बसला होता. वस्तुतः मी वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करीत नसल्यानें माझें ह्या माणसाशीं वैर असण्याचें कांहींच कारण नव्हतें. मी पाटीवरील अक्षरें पाहून सरळ आंत गेलों व नम्रपणें नमस्कार केला. या विषयांत माझी गति नसल्यानें माझी मति तेथें चालण्यासारखी नव्हती. पण डार्विन खुषींत होता. तो त्याच्यासमोर चाललेला एक उंदरामांजरांचा जीवघेणा खेळ कौतुकानें पहात होता. त्यानें मला खुर्ची देऊन म्हटलें. " हूँ ! काय ? बोला. "

मी--मी नुकताच पृथ्वीवरून येतो आहें. तेव्हां म्हटलं आपणांशीं चार शब्द...

डार्विन--वा ! वा ! जरूर. अहो, मी इथं आल्यापासून कोणाशीं बोललों नाहीं. ( हें मला माहीत होतें. )

मी--मी पदार्थविज्ञानशास्त्राचा विद्यार्थी आहे.

डॉर्विन—अरे वा ! बरं माझ्या उत्क्रांतिवादाविषयीं सध्यां काय मत आहे हो पृथ्वीवर ?

मी--एकदम मान्य आहे. ( डार्विन खुष ) आतां मनुष्य माकडापासून झाला हें तर लोकांना इतकं पटलं आहे कीं बोलायची सोय नाहीं.

डार्विन--ह्याँ ! ह्याँ ! आतां तुम्हांला म्हणून सांगतों सोनटक्के, मला खरं म्हणजे उत्क्रांति-वादाची कल्पना मनुष्याच्या माकडासारख्या चाळ्यावरूनच सुचली. मग मी तोच नियम इतरांना लागू केला. अन् त्या दिशेनें संशोधन केलें.

मी--पण डार्विनसाहेब, आतां मनुष्याचा पुन्हां माकड तर होणार नाहीं ना ?

डार्विन--( चपापून ) कां ? तशीं लक्षणं आहेत कीं काय माणसाचीं ?

मी--( चेष्टेनें ) हो, बऱ्याच प्रमाणांत !

पण माझ्या या चेष्टेचा वाईट परिणाम झाला. डार्विन अत्यंत गंभीर होऊन आपले सिद्धान्त तपासूं लागला. पुढें माझें तेथलें अस्तित्वसुद्धां तो विसरला. मी अर्थातच मुकाट्यानें तेथून बाहेर पडलों.

अशा रीतीनें प्रत्यक्ष डार्विनला चाट पाडल्यावर पदार्थविज्ञानशास्त्राचा जनक मानला गेलेला न्यूटन माझ्यापुढें काय टिकेल असें मला वाटूं लागलें. न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धान्ताच्या तोंडांत मारणारा सापेक्षता सिद्धान्त त्याच्या तोंडावर फेकला कीं तो सुद्धां असाच थंड पडेल. बस्स ठरलं. आईन्स्टीनच्या सापेक्षतेच्या सिद्धान्तानें न्यूटनचीं खोडकी मोडून माझ्या पृथ्वीवरल्या वर्गबंधूंचे धन्यवाद घ्यायचेच. पण हीं वाक्यें मी जरा मोठ्यानेंच बोलल्यासारखें मला वाटलें व कोणी ऐकलें कीं काय म्हणून सभोंवार दृष्टि टाकली. मी एकदम दचकलों. एक अगदीं आईन्स्टीनच्या चेहऱ्यासारखाच दिसणारा चेहरा एका घरांतून रोखून माझ्याकडे पाहात होता. माझीं अन् त्या

गृहस्थाची दृष्टादृष्ट झाली. त्या बरोबर तो म्हणाला, "अहो, जरा इकडे या." माझे पाय तिकडे वळले. "आपण कोण?" मी त्या गृहस्थास विचारलें.

"आल्बर्ट आईन्स्टीन" तो उद्‌गारला.

"आँ! पण आपण इथें कसे? मीं तर आपण स्वर्गवासी झाल्याचं कुठं वाचलं नाहीं." मीं आश्चर्यानें चाट पडून विचारलें.

"मी कसा मेलों तें मग सांगतों. पण माझ्या सापेक्षतावादाविषयीं काय बोलत होता आतां?" आईन्स्टीननें रागांत विचारलें. 'नाहीं. कांहीं नाहीं ...... आपलं नुसतं ......" मीं चाचरत बोलण्याचा प्रयत्न केला.

"तुम्ही काय शिकला आहांत?" आईन्स्टाईननें पुन्हां रागानें विचारलें.

"मी बी. एस्सी. आहे...म्हणजे अजून पदवी नाहीं मिळाली. परीक्षेंतील पेपर पाहूनच मला मृत्यु आला असावा" मी म्हणालों.

"अस्सं! मग एवढंसं टीचभर ज्ञान अंगांत असतांना न्यूटनची चेष्टा करतोस काय रे मूर्खा?' असें म्हणून आईनस्टीननें रागानें हातांतलें पेपरवेट मला फेकून मारलें अन्...

...अन् मी जागा झालों. वर्तमानपत्राची घडी तोंडावर पडली होती. त्या वृत्तपत्रें विकणाऱ्या पोऱ्याचाच प्रताप होता तो! मी वर्तमानपत्र उघडलें अन् वरचीच ठळक बातमी वाचली. "सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. आल्बर्ट आईन्स्टीन यांचें निधन."

# काव्य–कुंज

## *~ ' निळया आकाशा ' ~*

कवयित्रीः– **जानकी**, इंटर आर्टस्, ए.

तुझ्या निळया कांतींत
घडे दर्शन शांतीचें
तुझ्या नितळ तेजांत
प्रतिबिंब पावित्र्याचें.
तुझ्या पहांटेच्या रम्यतेंत
कुसुमाची कोमलता
तुझ्या स्त्रवणाऱ्या चांदण्यांत
यौवनाची मोहकता.
तुझ्या मध्यान्हींच्या उग्रतेंत
साधकाची कठोरता
तुझ्या घननील हृदयांत
जीवनाची अगम्यता.

---

## शान्ति

कविः- मंगेश तेंडुलकर, ज्यू. बी. एस्सी.

गर्जा जयजयकार शान्तिचा
गर्जा जयजयकार !
संहारक युद्धास्तव तिसऱ्या
व्हा आणिक तैय्यार !
करूं गर्जना स्वतंत्रतेच्या
खुशाल जोसांत
साम्राज्यें परि आपआपलीं
राखुनि गोषांत !
चार जणांनीं शंख फुंकुनी
सत्य कसें कळणार !
असें हें सत्य कुणा कळणार ?
गर्जा जयजयकार शान्तिचा - गर्जा जयजयकार ! ॥१॥
खुशाल कोणी म्हणोत वेडे-
"होणार न युद्ध !"
नांदणार शांतता अबाधित
पृथ्वीवर शुद्ध !"
साथ द्यावया काय जातसें ?
म्हणा- "पुरें युद्ध !"
परि मानवतेच्या रक्तामांसीं
विश्व पुरें भिजणार-
पुन्हां हें पुरें पुरें भिजणार !
गर्जा जयजयकार शांतिचा गर्जा जयजयकार ! ॥२॥
शास्त्र कलांना वेठिस जुंपुन
काढूं शोधून
शस्त्रें अस्त्रें महाभयंकर
पूर्वींच्याहून
करीत जाऊं नगरांमागुन
नगरें तीं खाक—
जगड्व्याळ या मानवतेची
उरेल मग राख !
उडेल आणिक पुन्हां एकदां
प्रचंड हाहाःकार !
अहाहा ! प्रचंड हाहाःकार !
गर्जा जयजयकार शांतिचा-गर्जा जयजयकार ! ॥३॥

शुद्ध आमुचा अुत्सव मंगल,
मोद मूर्तिमंत
घर्घराट, कच्कचाट, स्फोट नि-
-वाद्यें हीं होत !
किंचाळया, आरोळया मरत्या-
जीवांच्या आर्त
अहा ! भावना धडकविणारें-
-सुरेल संगीत ! !
रणगाडेहि तशांत गातिल
शांतिगीत क्रूर !
गर्जा जयजयकार शांतिचा-गर्जा जयजयकार !॥ ४ ॥

---

## कुतुबमिनाराची फजिती !

कविः--सुधाकर के. भोंसले सी. बी. ए.

कुतुबमिनारच्या अगदीं वरच्या टोकावर गेलों मी.
झप झपा झप !
खारीसारखा झपाझप !
आणि पाहूं लागलों सभोंवतालचा, खालचा देखावा.
खालची अजस्र दिल्ली
दिसत होती भातुकलीच्या खेळांतील बोळक्यांप्रमाणें.
शेंदरांनीं फासलेल्या दगडाप्रमाणें-
दिसत होता लालकिल्ला !
आजूबाजूच्या मशिदी, पडक्या धडक्या इमारती नी बंगले
दिसत होते-
उध्वस्त विश्वासारखें—स्मशानासारखें.
स्मशानासारखें
उगीचच उद्विग्न झालें माझें मन-
मानवाच्या पुढें मुंगी
तसा कुतुबच्या पुढें मानव दिसत होता--
अगदीं लहान-
आकाशांतील तारकेप्रमाणें
जवळ जवळ आकारहीन;
फक्त ठिपको-इवलासा
रांगोळींतील बिंदूप्रमाणें--
स्थिर निःसत्त्व निर्जीव !
तोंच तो कुतुबमिनार-
अस्मानवेधी, पांच मजली कुतुबमिनार-

सात मजली हंसला ! खदखदला !
" काय पाहातोस वेड्या मानवा निरखून खालती
क्षुद्र मानवाचें खरें स्वरूप ?
इकडून तिकडून वळवळणारा तो किडा आहे.
पहा माझ्याकडे, माझ्याकडे पहा.
खांद्यावर घेतों तुला मी.
तूं मानव ! कडेवर, घेतों तुला मी.
वाळूचा कण हिमालयापुढें--
माझ्यापुढें तसा तूं मानव !
घमेंड मारतोस तूं
वल्गना करतोस तूं. –"
" जीभ आवर–आवर जीभ "
मी ओरडलों-देंठापासून बेंबीच्या.
माझा आवाज घुमला
आकाशाच्या पोकळींत
गुहेंत घुमावा तसा !
कुतूब माझें बोलणें लागला ऐकूं
पिंजऱ्यांतील आरोपीनें
निकाल ऐकावा तसा !
" अरे क्षुद्रा, पुरेत तुझ्या बाता
अजस्रतेच्या, भव्यतेच्या,
कोणाच्या कृपेनं कोणाच्या बलानं
झालास तूं एवढा भव्य, एवढा उच्च ?
या क्षुद्र मानवांच्याच ना ?
तो नसता तर–
अभिमानानें छाती काढून
तूं उभा राहिला असतास तरी का ?
मानव आहे म्हणूनच ' तूंहि आहेस.
मानव आहे म्हणूनच ' आश्चर्यें ' आहेत.
जगांत तुझ्यासारखीं आणखीं दुसरीं.
कुतुब बसला गप्प
तोंडांत मारलेल्या चोरासारखा !
आणि छाती फुगवून
मी ऐटींत उतरलों
वनांतील मोरासारसा ! डौलांत, झोकांत.

---

## ⁕ "तूंच तूंच जुळतेस मनांतुनि !" ⁕

( कविः- शरद परशुराम जोग. सी. बी. अेसूसी. )

कोंपऱ्या कोंपऱ्यांतून
बाजार गांवचा फेंकत आहे
क्षणोक्षणीं गलबला लोकांचा
वाऱ्यावरुनी जो वेगानें
वहात येतो;
परंतु नक्की--
आहे म्हणायचें कुणाला काय ?
तें कळेना...
तें कळेना.
मुलें गांवचीं फेंकत आहेत
चिटोऱ्या कागदाच्या;
नक्की कोणता आकार त्यांचा
पत्ता ना याचा !
आणि पलिकडे पसरला आहे उकिरडा;
उकिरडा......
सगळया गांवाचा !
नाहीं सांगतां येणार त्यांत
नक्की कोणता...
एक पदार्थ तें.
या उकिरड्यांतून . या चिठोऱ्यांतून...
...वाऱ्यावरच्या या असंबद्ध गलबल्यांतून—
--नवकविते !
तूंच तूंच जुळतेस मनांतुनी !
या सर्वांत--
सर्वत्र विखुरलें
सर्वत्र उधळलें
कांहीं तरि आहेच तुझें पण.
या वाऱ्यावरचा
मिश्रित कोलाहल होऊन तूंच वाहसी
अन् कुजबुजसी कांहीं
गूढपणें...

मूढपणें...
अस्पष्टपणें...
अंधुकपणें...
अस्थिरपणें...
अधांतरीपणें...
गुंतागुंतीनें...
किचकटपणानें...
आणि संपर्सी...विस्कळीतपणें...विस्कळीतपणें... !!

---

## *—' वसंत '—*

कवयित्रीः--**सुलभा फडके.** एफ. वाय्. आर्टस्.

शिशिरामधली थंडी अजुनी, गेली नव्हती पुरती सरुनि ॥
तोंच आपुल्या मृदुल करांनीं, हळूच थोड्या दूर सारुनि- ॥
-क्षितिजावरल्या शुभ्र झालरी, हंसत धरेची आली स्वारी ॥
वसन तियेचें सोनेरी तें, खुलवित होतें गौरतनूतें ॥
विपुल केशसंभार मनोहर, नागापरि रुळतो पाठीवर ॥
खुलुनि दिसे नाजूक पांढरा, मोगरीचा त्यावरती गजरा ॥
थाट पाहुनि वसुंधरेचा, करूं लागले सारे चर्चा ॥
गिरिशिखराच्या लागुन कानीं, सरिता वदली खळखळ करुनि ॥
" कुठें निघाली नटुनि धरा ही, मला तरी उमजेना कांहीं ॥ "
गुलाब, चाफा, बकुळ, अबोली, वाऱ्याला त्या हळुच बोलली ॥
" असेल ठाऊक पवना तुजला, कोण यायचे इथें आजला ? ॥ "
हंसुन बोलला पवन तयांना, " हा वेड्यांनो, कसें कळेना ॥
प्रियकर अपुल्या वसुंधरेचा, वसंत आहे इथें यायचा ॥ "
ऐकुनि वार्ता आनंदाची, धांदल झाली चराचराची ॥
ऋतुराजाचें करण्या स्वागत, झटूं लागली सारी झटपट ॥
घेउनिया सोन्याची झारी, सूर्याची ती आली स्वारी ॥
भूवरती अरुणाच्या संगें, सडा शिंपुनी गेला वेगें ॥
लेवुनिया पालवी कोवळी, सज्ज जाहल्या या तरुवेली ॥
कोकिळ अपुल्या मधुर स्वरानें, गाउं लागली स्वागतगाणें ॥
गगनाच्या त्या मंडपावरी, लावियलें छत निळें कुणितरी ॥
शुभ्र चामरे घेऊनि हातीं, आम्रवृक्ष जणुं स्वागत करिती ॥
गुलाब आणिक बकुळ फुलांनीं सुगंध अपुला दिला उधळुनि ॥
तोंच खगांनीं करुनि किलबिल, सांगितली ती वार्ता मंगल ॥
" प्रियस अपुल्या भेटायाला, ऋतुराजा हा वसंत आला ॥ "

## ✻ 'मी कोण ?' ✻

कविः-**मोहन पुरन्दरे**-इंटर सायन्स ए.

मला उरली एक समस्या ...
"मी 'म्हणजे काय ?' 'मी म्हणजे कोण ?"
आठवल्या मी अनेक व्यक्ति :
कुरुक्षेत्रावरला श्रीकृष्ण
—'अहं ब्रह्मास्मि' असं सांगणारा;
धर्मक्षेत्रीचा गौतमबुद्ध
--'मीच ज्ञाता, मीच बुद्ध' असं म्हणणारा;
युद्धक्षेत्रीचे हजारों सम्राट
--स्वतःला जगाचे वहिवाटदार मानणारे
आणि हल्लीचे,
पक्षोपपक्षांचे.
कवडीमोलाचे, खंडीभर नेते ! ... ... (१)

पण...
श्रीकृष्ण शेवटीं व्याधानं मारला !
गौतम नाना विकारांनीं चाळवला ! !
सारे, सारे विलीन झाले
याच मातींत...याच धरतींत !!
सर्वांना उरली ना, एकच समस्या
'मी म्हणजे काय-मी कोण ?' ... (२)

अशांत माझी जागी झाली
आणि वदली स्फूर्तिदेवता

"तूं...
या विश्वाचा एक प्रणेता
अज्ञाताचा ज्ञाता तूं !
ज्ञाताचा संवर्धक तूंही,
धर्मशास्त्रींचा शास्त्रज्ञही तूं !!
ब्रह्मतत्त्वांचा तत्त्वज्ञ तूं
अन् विश्वकणाचा विधाता तूंच !!! ... (३)

आज...
    कामाच्या रगाड्यास जुंपून घेतलेले,
    मन गहाण ठेवून सारें कांही करणारे,
    पोटासाठीं हृदय विकणारे
    जगत आहेत हजारों जंतू !
    असे जंतू जन्मास येतात
    थोडा काळ तडफडतात, निश्चेष्ट बनतात
अन् ब्रह्मतत्त्वांत विलीन होतात ! ! (४)

पण तूं...
    यंत्राचा चाकर असलास,
    पोटाचा गुलाम असलास,
    तरी माझा लाडका आहेस,
    मनोमंदिराचा शहेनशाह आहेस !
आता नुरली ना, वेड्या, समस्या...
' मी म्हणजे काय...मी कोण ' ? " (५)

---

## निर्याणाच्या रात्रीचें मन

कविः– अनिरुद्ध पुनर्वसु. सी. बी. ए.

[ राजगृह सोडून जातांना गौतमाच्या मनांत चाललेलें विचारांचें द्वंद्व ]

हळुच पाउल टाक गौतमा
    घेइल कुणि चाहुल
यशोधरा बघ इथें झोपली
    कुशींत बाळ राहुल
फडफडलीरे वात दिव्याची
    नको सोडु निःश्वास
मोहाचें हें बळकट बंधन
    तोडायाचें आज
झपझप पाउल उचल गौतमा
    तिष्ठत आहे काळ
काळाच्या पाउला पुढें तव
    हवी पडाया चाल
फसलेल्या काळाला दाखव
    पुढें होउनी वाट
या अंधारीं जळायचें तुज
    देह बनवुनी वात

## पाहिजेत-पाहिजेत

कविः- पाटील बी. व्ही. ज्यू. बी. अे.

पाहिजेत उत्तम धोबी, चंद्रावरचा डाग धुण्याला
तसेच शिंपी, ठिगळ लावण्या अफाट आकाशाला
'फायर-ब्रिगेडियर' पाहिजे, जठराग्नि शमवायाला
आणि सारथी मनोरथांचें सारथ्य करायाला
अकलेच्या खंदकावरी बांधण्या पूल, हवेत इंजिनियर
तसेंच जोडे शालजोडींतील, शिवण्याला चांभार
मनःपटांवर चित्र काढण्या, कुशल चित्रकार,
तसेंच माळी, हार गुंफण्या हिमबिंदूंचा सुन्दर
वाऱ्यावरती वरात मिरविण्या, वधूवरांची जात
वास्तुविशारद आणि बांधण्या हास्यांचे मजले सात.

# हिंदी विभाग

## विश्वविद्यालयीन शिक्षा का माध्यम

लेखक-- **मोहन एच. सोलंकी** ( ज्यू. बी. एस्सी. )

भारत स्वतन्त्र हो जाने के पश्चात् भारतीयों के दिलों में उस स्वतन्त्रता की लहर ने हेर-फेर कर दिया। अधिक लोगों के दिलों और दिमागों में नित्य प्रति नये विचारों का समावेश होने लगा। नित रोज नयी-नयी योजनायें बनने लगीं। कहीं सिंचाई की योजना पर विचार विमर्श हो रहा है तो कहीं शालाअें आदि खोले जाने के लिए प्रयत्न हो रहे हैं। कहीं अंग्रेज़ियत को मिटाने के प्रयत्न हो रहे हैं तो कहीं जमीदारों की जमीनें छीनी जाने की बातें हो रही हैं। प्रत्येक विभाग में नयी नयी बातें उत्पन्न हो रही हैं। प्रत्येक विभाग अपने को नये ढाँचे में ढालने का प्रयत्न कर रहा है। शिक्षा जिसे कि अग्रणी मानना चाहिए, भला, पीछे कैसे रह सकती है! विद्याप्रेमी, प्रकाण्ड पंडितों, स्नातकों आदि के मन में भी नयी सूझ उत्पन्न हुई। उनके मन में भारतेन्दु जी के दोहे ने मनन किया, कि—

निज भाषा उन्नति अहै, सब उन्नति को मूल।
बिन निज भाषा ज्ञान कै, मिटत न हिय को सूल ॥

उन्हें भी हिन्दी की ओर दृष्टि दौड़ानी पडी। शिक्षा का माध्यम हिन्दी रक्खा जाय। कई लोगों के दिलमें विचार दौड़े। वर्तमान माध्यम अंग्रेजी का जगह जगह अड्डा दिखलाई पड़ता है, उसे हटाया जाय। यद्यपि प्राथमिक व माध्यमिक शालाओं ने अपना माध्यम बदला, परन्तु अभी तक विश्वविद्यालयीन शिक्षा का माध्यम अंग्रेज़ी ही है। उसे भी बदला जाय। नित्य प्रति इसकें लिए विचार होने लगे कि शिक्षा का माध्यम " हिन्दी राष्ट्रभाषा " ( जो कि भारत स्वतन्त्र होने पर की जा चुकी है, ) रक्खा जाय या अंग्रेजी या प्रादेशिक भाषा रक्खें। अभी तक कोई विद्यापीठ इस परिवर्तन को नहीं कर पाया है। कोशिशें हो रही हैं। प्रत्येक अपने पक्ष को मज़बूत बनाये रखना चाहता है।

आज भारत में अंग्रेज़ी माध्यम निर्धारित किये हुए करीब डेढ़ सौ वर्ष होने को आ गये हैं। एक अंग्रेज व्यक्ति " मेकाले " के हृदय में यह विचार पैदा हुआ कि भारत में हमें अपना राज्य कायम रखने के लिए भारतीयों को शिक्षा दी जानी जरूरी है। परन्तु शिक्षा का माध्यम अंग्रेजी रखना उससे भी अधिक महत्त्व का है। उसका कथन था कि अंग्रेजी क्लर्क वगैरह, जो

कि छोटी-छोटी नौकरियों पर रक्खे जा सकते हैं, इंग्लैंड से लाने में अधिक पूँजी का व्यय करना पड़ता है। इससे अच्छा तो यही हो कि भारतीय क्लर्क दफ्तरों में रक्खे जायँ, जो कि कम वेतन पर अपना कार्य कर सकें। जब कि शिक्षा अंग्रेजी में दी जायगी तो उन्हें नौकरी के लिए हमारे ही द्वार देखने पड़ेंगे। मेकाले की पद्धति का इंग्लैण्ड में भी विचार हुआ। आखिर उसकी सूझ को मान्यता दी गयी।

अंग्रेजी शिक्षा ने भी भारतीयों पर जादू सा किया। शिक्षा भी इतनी महँगी कि धनाढ्य लोगों को ही नसीब हुई। धनाढ्यों की उन्नति भी रुक गई। अमीरों को नौकरी के लिए भी इन्हीं के द्वार खटखटाने पड़े। गरीबों को तो शिक्षा छोर भी लम्बे अरसे तक छू न सका! प्रशासकों को खुश करने के लक्षण तो भारतीयों में आदि से पाये जाते हैं। अकबर को खुश करने के लिए टोडरमल जैसे विद्वान् अपनी दैनिक डायरी में फारसी भाषा ही अपनाते थे। ठीक इसी प्रकार अंग्रेजों को खुश करने के लिए पुंजीपतियों ने अंग्रेजी शिक्षा अपनायी व अपने भविष्य को दासता में डाल दिया। प्रादेशिक भाषाओं की प्रगति में भी बाधायें आई और उच्च शिक्षा का प्रचार रुक गया। उच्चशिक्षा अमीरों तक ही सीमित रही। यही कारण है कि डेढ़ सौ वर्षों में तीन प्रतिशत व्यक्ति ही शिक्षा पा सके।

प्रत्येक भारतीय साक्षर ही नहीं परन्तु उच्च शिक्षा पाने में समर्थ हों, इसके लिए हमारी सरकार हरदम लालायित है। माध्यम परिवर्तन के विषय में तीन बातें हमारे समक्ष उपस्थित होती हैं--

( १ ) माध्यम अंग्रेजी भाषा रहे।

( २ ) माध्यम प्रादेशिक भाषा हो।

( ३ ) माध्यम राष्ट्रभाषा बने।

माध्यम अंग्रेजी ही रहे, तो क्यों? इसके लिए बहुत विचार विमर्श हुआ। अंग्रेज़ी कई वर्षों से भारतीय उच्चशिक्षा का माध्यम बना हुआ है। भारत के सभी विश्वविद्यालयों में इसी माध्यम का प्रादुर्भाव है। इसी माध्यम के फलस्वरूप आन्तरराष्ट्रीय विद्यालयों का संबंध जुड़ा हुआ है। अगर माध्यम अंग्रेजी न रहा तो एक विश्वविद्यालय से दूसरे विश्वविद्यालय में परिवर्तन स्थगित रहेगा। यही नहीं, अंग्रेजी साहित्य सम्पूर्ण सर्वगुण सम्पन्न है। हमारी सभी आवश्यकताओं की पूर्ति इससे सम्भव है। अंग्रेज़ी आन्तरराष्ट्रीय भाषा है। यह कहने में कोई अत्युक्ति न होगी कि अंग्रेजी जाननेवाले को दुनियाँ के किसी भी कोने में मुसीबतों का मुँह देखना न पड़ेगा। वैज्ञानिक परिभाषायें भी अंग्रेजी में ही स्वीकृत हो चुकी हैं। अगर हम विश्व के विशाल क्षेत्र में हमारी विपुलता में चार चाँद लगाना चाहते हैं तो अंग्रेज़ी का अध्ययन हमारे लिए अत्यावश्यक हो जाता है। अंग्रेजी माध्यम विश्वविद्यालयों में रखना अनिवार्य हो जाता है।

परन्तु सभी भारतीयों को साक्षर और उच्च शिक्षित बनाना है तो हमें अंग्रेजी की ओर ध्यान देना नितान्त मूर्खता का प्रदर्शन करना है। प्रादेशिक भाषा को बल देना यहाँ पर ज़रूरी है। यही हमारा स्वाभाविक माध्यम है। इसी माध्यम से अशिक्षा का पल्ला छूट सकता है।

प्रादेशिक माध्यम की कठिनाइ भी हमारे समक्ष अधिक उत्पन्न होती हैं। पाठ्य-पुस्तकें प्रादेशिक भाषा में तैयार करनी पड़ेंगी। अधिक धन व समय की हानि इसी भाव में नीहित

है। प्रादेशिक भाषाओं में परिभाषायें भी अनिश्चित हैं। साहित्य भी टूटा हुआ है। हमारी सभी आवश्यकताओं की पूर्ति इससे संभव नहीं है। विद्यार्थी अपने प्रदेश में ही सीमित रहेगा। बाहरी ज्ञान व सम्पर्क नहीं होगा। आखिर मियाँजी की दौड़ मसजिद तक ही रहेगी। जहाँ हम अेकता चाहते हैं वहाँ अनेकता का प्राधान्य प्रस्तुत होगा।

अब बात रही राष्ट्रभाषा की। राष्ट्रीय व्यवहार की तरह विश्वविद्यालयीन माध्यम अगर एक भाषा हुई तो भारत की अेकता को बल प्राप्त होगा। आन्तरप्रांतीय संबंध दृढ़ बनेंगे। यही नहीं किसी भी जगह अपना निशान खड़ा करने में समर्थ होंगे। राष्ट्रभाषा का साहित्य भी सम्पूर्ण व सभी आवश्यकताओं की पूर्ति करनेवाला है। हमारी मानसिक स्वतन्त्रता का विकास क्षेत्र भी बढ़ेगा। वैज्ञानिक परिभाषायें भी राष्ट्रभाषा में नियमित हैं। प्रश्न पैदा होता है कि क्या आन्तरराष्ट्रीय व्यवहारों को राष्ट्रभाषा कायम रख सकती है। उत्तर है, चीन, जापान, फ्रान्स, जर्मन रूस आदि विश्व के अग्रणी देश। बिना अंग्रेज़ी के अपनी राष्ट्रभाषा में संसार के सभी संबंधों को कायम रक्खे हुए हैं। फिर क्या भारत को अपनी की राष्ट्रभाषा में यह सौभाग्य प्राप्त नहीं हो सकता है! परन्तु अभी समय है। धैर्य से काम लेना होगा। नहीं तो 'उतावला सो बावला' वाली कहावत सार्थक होगी।

अच्छा तो यही हो कि भारत सरकार अंग्रेजी ही क्यों और भी भाषाओं का अध्ययन जारी रक्खें। साक्षरता की दृष्टि से प्रादेशिक भाषा और उच्चशिक्षा के लिए हिन्दी व अंग्रेजी दोनों को माध्यम के रूप में स्वीकार करें। अंग्रेजी माध्यम लेनेवालों के लिए हिन्दी अनिवार्य विषय रक्खा जाय। हम स्वतन्त्र, स्वाधीन, स्वराज्यप्राप्त हैं। अर्थात 'स्व' के बंधन से जकड़े हैं और इसी 'स्व' के बंधन में जकड़ा रहना हमारा कर्तव्य है। इसलिए विदेशी भाषा का प्रादुर्भाव कम कर राष्ट्रभाषा को अपनाना ज़रूरी है।

---

## "अजी हमने सुना था—"

( कु. सुधा कुलश्रेष्ठ चतुर्थ वर्ष कला )

—कि एक जमाना था जब नवाबों के शाये में पले लखनऊ की शान देखने के काबिल थी। वहाँ की गली गली मे शायरों के हुजूम थे, तवायफों की महफिलें थीं। तीतर बटेरों और कनकौवे बाजी जैसे आम दिलबहलाव तो लखनऊ के कोने कोनें में छितर गये थे। उस ज़माने में तो नवाबों से लेकर धोबी भंगी नाई चमार तक के ढंग और ठाठ निराले थे।

आज की अलकापुरी लखनऊ में "काफी हाउसों" की ज़ितनी रौनक है उस समय उससे कहीं ज्यादा पूछ चंडूखानों की थी। अफीमचियों का मेला का मेला गरम रहता था। आज के अग्रेजीदाँ नये फैशन के ढले लोग अफीम खाना अपनी शान के खिलाफ समझते हैं। अब वे अफीम देवी को इन नज़रो से देखते हैं गोया तमाम दुनियाँ से वे उसकी हुकूमत उठा ही तो देंगें। लेकिन आज भी लखनऊ की अंधेरी टेढी मेढी गंदी गली कूचों में अंधेरी काली रातों के वक्त शहर के अल्लम गल्लम निठल्लम चोर उच्चके जिनमें तांगेवाले, धोबी हज्जाम, खोम्चेवाले वगैरह वगैरह शामिल है, इकट्ठे होते हैं। उस वक्त वे सब मिलकर अपनी छोटी मोटी खोपड़ियों के ऊंचे

नीचे दिमागों में से जो ख्यालात पैदा करते हैं वे दूसरे दिन तमाम लखनऊ में हंगामा मचा देते हैं।

ऐसे ही किसी चंडूखाने की अफीमचियों की महफिल में एक दफे एक निहायत बुड्ढा आदमी ज़िसकी उम्र, खुदा झूठ न बुलवाये, एक सौ तीन बरस से कम क्या होगी, अपनी लम्बी सफेद डाढ़ी को अपने दोनों हाथों से सहलाते हुए अफीम की पिनक में बुदबुदाने लगा। उसके नज़दीक बैठे एक लम्बे चौडे पट्ठे जवान ने, जो कि एक रंगीली तबीयत का हज्जाम था, अपनी मस्त आँखों को नचाते हुए और अपने दायें हाथ की बेंत से जमीन को बेतहाशा पीटते हुए अपने साथियों से कुछ बुदबुदाकर कहा। सभी उस पिनक में बेसुध बुड्ढे को देख बेशर्मी से हंस पड़े।

बुड्ढे की पीली आँखों में गोया खून उतर आया। गुर्राता हुआ बोला—"अरे कल के छोकरो, हरामज़ादो, किस बूते पर छलागें मारते हो? मालूम है कि मैं आसफद्दौला के खान्दान का आदमी हूँ?"

हमेशा निहायत शरीफानी लच्छेदार जबान बोलनेवाले का गुस्सा देख सभी हक्के बक्के रह गये। अब्दुला तांगेवाला खांसते खांसते बोला—

"अल्लाह! कहिये चचाजान, हमलोगों की क्या मज़ाल है कि आप का मखौल उड़ाये? खुदा का शुक्र है कि अभी हमलोग ऐसे गुनाहगार नहीं हुए हैं।"

अपने मुँह के पान का ज्यादा हिस्सा पिक से अपने ही कुरते पर उंडेलते हुए इस्माइल खोंचेवाले ने भी अब्दुला की हाँ में हाँ मिलाई। "आपके खान्दान और तालीम पर शुबाह हम लोग किस ताकद पर कर सकते हैं चचाजान?"

खुशामद की आमद होती है। नहीं तो क्या खुदा बेअक्ल था जो उसने खुशामद को फजूल बनाया? बात ने असर किया। वैसे भी बूढा तबीयत से गुस्सेबाज़ न था। वह अपने पोपले मुँहसे मुसकरा दिया। बोला – तालीम की क्या कहते हो बेटा? हजारों अंग्रेजीदाँ देख डाले; पर अल्लाह कसम, किसीको भी इसकी कतई जानकारी नहीं कि शेक्सपियर कौन था।"

सभी खामोश थे और सभी की मुर्दानगी पीली आँखोंमें एक अनोखी चमक आ गई थी। वे उसके और नजदीक खिसक आये। समझ गये कि किसी नये किस्से की शुरूवात होनेवालीं है। बूढेने अपना अफीम के नशे से मारा सिर अपने दोनो हाथों से थामा और अलसाई आवाज में कहना शुरू किया –– "वे लोग कहते हैं कि शेक्सपियर अंग्रेज़ था। स्ट्रेटफोर्ड में पैदा हुआ, वहीं मरा। लेकिन आजतक साबित नहीं कर पाये। वाकई जो बात गलत है वह साबित भी कैसे हो सकती है? मैं कहता हूँ कि शेक्सपियर शिया मुसलमान था। हिंदुस्तान में पैदा हुआ था।"

महफिल के अफीमचियोंको कतई ताज्जुब नहीं हुआ। शायद शेक्सपियर का नाम उन्होंने ज़िंदगी में पहली बार सुना था। किन्तु खबर जरूर नई है। लखनऊ के लिये दिलचस्प होगी। बेसब्री से इन्तजारी में थे।

"फरमाइये चचाजान।"

पिनक में बूढा खामोश होते ही सो गया था। चौंक कर उसने अपनी नन्हीं नन्ही आँखें खोलीं। दोनों हाथों से उसे मलते मलते कहा––"हाँ, मैं कह रहा था कि उसकी माँ अफगान से आई थी, बाप एक तुर्क सूबेदार था। उसके अब्बा ने बडे लाड से उसका नाम 'शेखपीरू' रखा था। बडे होने पर शेखपीरू को तालीम के वास्ते लखनऊ आना पडा। जल्दी ही उसे शायरी का शौक हो गया। उस ज़माने में लखनऊ की हवा ही कुछ ऐसी थी। हर आदमी शायर था और

हर औरत गवैया थी। शाम होने से पहिले ही शेखपीरू जनाब सफेद ढाके के मलमल का कुरता, चुस्त चूडीदार पैज़ामा, उस पर काली शेरवानी जो कि हमेशा कन्नोज के हिना से सराबोर रहती थी, पहन कर, आँखों में सुरमा, सिर पर बनारस की कामदार टोपी और पैरों में शाहंशाही पेशावरी जूते डाल, ओठों को पान से रंगकर अपने दायें हाथ की कटक की छडी नचाते हुए लखनऊ की मशहूर गलियों में अकडते नजर आते। बुरकेवालियाँ उसे देखतीं और कहतीं--
" तोबा क्या हुस्न है, क्या शान है। खुदा इन्हें सलामत रखे।"

" शेखपीरू जनाब भी अपने असर से वाकिफ थे। मुस्कराते, बांकी अदायें दिखाते और आगे बढ जाते। खबर उसके अब्बाजान के पास पहुंचीं। वे खानदानी आदमी थे, दिल और दिमाग के पाक। उसी दिन लखनऊ पहुँचे। अपने नवाबज़ादे को बीच बाजार में पकड़ा और लगे झडकने --

' अरे कमीने तुझे शर्म नहीं आती अपने खान्दान पर छीटें उड़ाते -- अपने बापकी दौलत पर थोहदागिरी करते। क्या तू इतना निकम्मा और नाकाबिल है कि अपना पेट अपने आप भी न भर सके।" बात तेज़ थी बेटे को लग गई। आखिर खान्दानी खून ने कमाल कर दिखाया। उसी रात जनाब नदारद हो गये। सीधे आगरे जाकर दम लिया। सुन रखा था कि बादशाह सलामत शाहंशाह अकबर रंगीली तबीयत के शौकीन आदमी हैं। शेर और शायरी पर दौलत लुटाते हैं। लेकिन दरबार में कदम रखना आसान काम न था। मौके की फिराक में फिरने लगे। एक दफे बादशाह सलामत की सवारी निकलने के वक्त उस जगह जाकर मस्त मौला बन कर जोर जोर से चिल्लाने लगे --

" याद करो कतिरे जुल्मी
खुदा भी बसता कहीं है "

बादशाहने उसे दिलचस्पी से देखा। दूसरे दिन दरबार में बुला भेजा। शेखपीरु ने वे जौहर दिखाये कि बादशाह सलामत का दिल बागबाग हो गया। लोग उसके शेर सुन कर ताज्जुब में आगये। बादशाह ने फरमाया--" आपने कमाल कर दिया। यकीनन आप शरीफ खान्दान के हैं?" शेखपीरू ने मंजूरी में अदब से सिर झुकाया--" बन्दा परवर की महेरबानी है।" शाहंशाह अकबर कुछ क्षण सोचते रहे; फिर दरबार में हाज़िर लोगों की ओर मुखातिब होकर कहा--

" आप लोगों की खिदमत में मैं कहना चाहता हूँ कि शायद आप लोगों को याद होगा कि इंग्लैंड की मलका एलिजाबेथ ने बेशुमार तोहफे भेजते हुए मुझसे अर्ज की थी कि मैं बदले में उन्हें हिन्दुस्तान का एक ऐसा आदमी तोहफे के रूप में भेजूं जो उनको दिलचस्प कहानी किस्सों से पस्तकर उनकी जिंदगी में कुछ १ मजा कुछ रौनक ला सके। मेरे ख्याल से इनसे बढ कर उस्ताद और कहीं नसीब न होगा"

" बन्दा परवर का कहना दुरस्त है" दरबारियों ने आवाज़ लगाई। अकबर ने तब शेखपीरू से पूछा--" आपका क्या ख्याल है? क्या आप जानेको तैयार हैं?" शेखपीरू को यकायक अपनी खुदकिस्मती पर यकीन न आया--" हजूर का हुक्म सिर आँखों पर ---"

कहते कहते बूढा थक कर हांफ गया।

अफीम की जंग से भरपूर फेफडे से जो खांसी उठी उसने उसे बेदम कर दिया। अफीम

की खुमारी से भरी उसकी आँखों ने कुछ धुंधला सा देखा कि वह जिनको सुना रहा था वे सब जनाब पिनक में लुढक गये हैं। "जहन्नुम में जाओ" वह गुस्से से बडबडाया और न जाने कब खुद भी पिनक से वहीं लुढक गया।

× × ×

दूसरे दिन सूरज निकलने के पहिले ही हरेक हजामत के जरूरतमन्दों को, जो बेशुबाह मर्द थे और उनसे उनके बीबी बच्चों को यह खबर उनके हज्जामों की बदौलत मिल गई कि दरअसल शेक्सपियर कौन था। लखनऊ के चारबाग स्टेशन में कदम रखनेवाले हरेक अजनबी को भी अपने तांगेवाले की महेरबानी से यह खबर उसकी चटपटी लच्छेदार जबान से मिली। बात चारों तरफ बिजली सी फैल गई। मशहूर अखबार "कौमी आवाज़" के सम्पादक ने अपने अग्रलेख में जोरदार आवाज़ बुलन्द की--

"है कोई वतन का लाल जो कि छाती ठोंक कर मैदान में कूद पडे और जो अपने नाम को रोशन करते हुए तमाम दुनियाँ को साबित कर दिखाये कि असल में शेक्सपीयर हिन्दुस्तान में पैदा हुआ था-कि उसकी जबान उर्दू थी-कि वह एक शिया मुसलमान था-कि उसका पहिला नाम शेखपीरू था। शेखपीरू ही शेक्सपियर था। यह इन बातों से साबित हो सकता है--"

अ--शेक्सपियर के Works में हम 'अरेबियन नाइटस' की बहुत बडी छाप पाते हैं।

ब--खुद बेन जानसन ने शेक्सपियर की तालीमके लिये लिखा है "Little Latin and less Greek." क्योंकि वह अरबी फारसी का विद्वान् था लेटिन-ग्रीक का हर्गिज नहीं।

स--शेखपीरू इंग्लिश लाइफ से वाकिफ नहीं था। इस वजह से उसने अपने ड्रामे या तो Historical रखे या ऐसे रखे जिसका Source उसे पुरानी किताबों से मिला। और कोई भी शख्स इस बात से इन्कार नहीं कर सकता कि उसकी Historical Knowledge एकदम Imperfect थी क्योंकि वह कभी English Hisory का Student नहीं था।

व--शेखपीरू जब इग्लैंड में गया तो English Spelling और Pronounciation की वजह से शेखपीरू को Shake-pearu लिखा गया जो बाद में Shakespeare में बदल गया।

सम्पादक ने आगे उर्दू की दुहाई देते हुये लिखा कि हमें ऐसे इस्लाम के प्यारे नौजवान पर नाज़ होगा जो यह सब साबित कर दिखाये।

आज भी लखनऊ में इसकी चर्चा है। लोग सरगर्मी से इसकी खोज में लगे हैं। वाकई अफीमने कमाल की कामयाबी हांसिल की।

# ENGLISH SECTION

## TOWARDS ABSOLUTE ZERO

By

PANNALAL JHAWAR (Int. Sc. A.)

A few days back, as I was going through "The Times of India", I was astonished to read that a man froze due to the rapid fall in the night temperature in Gwalior. Curiously I searched for the temperature of Gwalior of that night which was 41° Farenheit or 5° centigrade only! I imagined a certain temperature and shivered with its mere imagination when the others were actually perspiring! And now dear friends, if you are too hot, let me take you to that region of temperature where every substance becomes solid. It is that temperature below which lower temperature does not exist in the known Universe! It is the absolute zero or −273·16° centigrade.

You must be knowing that ordinary water turns into ice at zero degree centigrade. This temperature is taken as the basis of the centigrade temperature scale. On the Farenheit scale, the base point is the temperature obtained when excess of ammonium chloride ($NH_4Cl$) is added to ice. It is −17·78°C. These scales are suitable for everyday work but in low temperature physics they have less importance. For scientific purposes a different scale is used. It is known as the Absolute scale or Kelvin scale. Its lowest point is absolute zero itself and it can be mathematically determined though it has not actually been attained as yet. Charles, a French chemist showed that the pressure of a gas varies in a linear manner with temperature when the volume is kept constant. If observations of pressure at relative temperatures of a given mass of a gas are plotted and extrapolated to zero pressure, a straight line results. The corresponding temperature at zero pressure is −273·16° C. This point is called as the absolute zero. This is the base of Absolute

scale. Thus with this scale $-273{\cdot}16°C$ becomes $0°k$ and conversly $0°c$ becomes $273{\cdot}16°$ k.

Start point of the triumphant march towards absolute zero may be taken as early as the middle half of the eighteenth century. In 1755, Cullen was able to prepare the first ice making machine. Even today, the campaign is not yet finished though low temperatures in the close neighbourhood are attained. The earliest method of producing low temperature is of adding salt to ice. When common salt is added to ice, the temperature of the mixture is lowered. This fact is used in the preparation of ice-creams. By using the common salt, temperature as low as $-23°C$ can be obtained. The phenomenon can be explained in the following manner. Generally pieces of ice have some water adhering. When a salt is added it dissolves in this water and more ice melts. The heat required to melt the ice is taken from the ice itself and as a result the temperature of the mixture falls. The lowest temperature attainable depends on the solubility of the substance used. The following table gives the lowest temperature attainable using ice and a soluble substance.

Eutectic-Mixtures—Temperature Range

| No. | Salt. | Percentage. | Temperature Range | |
|---|---|---|---|---|
| | | | °Centigrade | °Absolute |
| 1 | KOH | 31·5% | −65 | 208·16 |
| 2 | $Zn\,Cl_2$ | 51 0% | −62 | 205·16 |
| 3 | Na cl | 25·0% | −23 | 250·16 |
| 4 | $Fe\,Cl_2$ + ˋa $cl_2$ | 33·1% + 29·8% | −55 | 198 16· |

Thilorier in 1834 used solid carbon dioxide ($CO_2$) mixed with ether to produce temperature as low as $-110°C$ and for a long time it was the only means of producing low temperatures

Another method of obtaining low temperatures is to evaporate liquids under reduced pressures. When a liquid evaporates it requires heat for the conversion of state and this heat is absorbed from the liquid itself thus resulting in lowering its tempera-

ture. In case of water, 1 gram of water at 100°C requires 536 calories for complete evaporation. This method was first utilised by Bussy in 1824 when he obtained a temperature of −65°C by rapidly evaporating sulpher dioxide ( $SO_2$ ). By this means he was able to liquify chlorine, ammonia and solidified cyanogen.

In 1823, Faraday at the suggestion of Davy liquified chlorine gas by evaporating chlorine hydrate in one limb of a ∧ shaped tube while the other limb was kept in a cooling mixture.

A third method is used in the case of gases which liquify at a still lower temperature. It is known as the adiabatic expansion of gases. In this method gases expand without doing any external work. The phenomena is explained by Joule–Thomson effect. This can be briefly explained that when a gas expands slowly through a porous plug, a change in the temperature occurs, proportional to the pressure difference across the plug. The temperature change is due to the gas performing internal work in overcoming the Van der Waals forces of attraction between the molecules of the gas. The heat energy of the gas is utilised in doing this work and thus cooling itself. The cooling effect is also due partially to the deviation of the gas from Boyle's Law. ( i. e. the product of pressure and volume is constant when temperature is constant. ) The latter deviation can give rise to either a cooling effect or a heating effect depending upon the initial temperature and the pressure difference used. For a given mean pressure, the temperature at which the two effects balance, resulting in no alteration in temperature is called the Inversion temperature. Gases expanding through a porous plug below their inversion temperature are cooled and at the temperature above their inversion temperature they become hot. In 1869 Andrews discovered that gases cannot be liquified by any pressure, however large unless they are precooled below a certain temperature called the critical temperature. Just below this temperature, the gas is liquified by the application of a pressure known as the critical pressure. The critical temperature for Oxygen is −118·75°c and the critical pressure is 50·2 atm.

Using these principles, Linde in 1895 compressed air to about 200 atm. pressure and allowed it to expand through a valve. The air was cooled by the Joule–Thomson effect and at the repetition of the process for some times, the air was liquified. It was stored in Dewar's Vacuum flasks. The temperature of the liquid air is −190°c and it is used to produce still lower temperatures.

Sometimes combination of methods gives better results. Pictet compressed oxygen to 500 atm. and precooled it to about −130°c by


liquid $CO_2$ evaporating under reduced pressure. Then he reduced the pressure of oxygen adiabatically and as a result obtained oxygen as a fine mist. ( $-219°$c). Thus by combination of methods, Kamerlingh Onnes in 1908 liquified helium getting a temperature of (4·28°k). He cooled the helium gas to a temperature of (15°k) by pumping the vapours from liquid hydrogen, before letting it to pass through expansion nozzle. Further in 1926 Keesom, by a combination of cooling and compression succeeded in solidifying helium (*pressure 250 atm.; temp. 4·2°k) and no substance now remains* which can not be obtained in a liquid or solid state.

Though helium is liquified yet the absolute zero is not reached. Near approaches have been made by a method known as the Adiabatic demagnetisation. When any magnetic material is magnetised, work is done on the specimen and this results in a rise in temperature. Similarly when a substance is demagnetised, there is a corresponding fall in the temperature. This is known as the magneto-caloric effect. The ratio between the intensity of a magnetisation of specimen and the intensity of the magnetising field is known as the susceptibility of the material ( $x$ ). For a paramagnetic substance the relation between the susceptibility of the material ($x$) and absolute temperature T° is given by the relation $T = \frac{c}{x}$ where $c$ is Curie's constant. This is known as the Curie's Law. In Adiabatic Demagnetisation, paramagnetic substances are magnetised in a very strong magnetic field and then they are demagnetised. By this adiabatic demagnetisation the temperature near the paramagnet is lowered further.

In 1926, Giauque and Debye suggested that if paramagnetic salts obeyed Curie's Law at the temperature of liquid helium, the cooling given by adiabatic demagnetisation should be quite large. In 1931 Giauque and McDougall reached a temperature of 0·25°k using gadolinium sulphate and de Haas, Wiersma, and Kramers reached a temperature of 0·0034°k by using a mixture of chrome-potassium alum and aluminium-potassium alum.

The general outline of the process can be illustrated by the following Figure. A specimen A is held in the chamber R which can be filled with helium or evacuated. A test coil surrounds R, this coil is connected in one arm of a A. C. bridge so that its self inductance can be measured. The whole is surrounded by liquid helium in a vaccum vessel which is surrounded by another vessel

containing liquid hydrogen or liquid nitrogen. A powerful electromagnet provides the magnetising field.




The procedure is to fill R with helium gas to maintain thermal contact with the outer bath. The initial temperature is of the order 1·2 − 1·5°k depending upon the pressure on liquid helium. The specimen is magnetised in a field of the order of 10,000 oersted. The heat evolved during the magnetisation is conducted away by the helium gas in R. Next the chamber R is evacuated. Finally the magnetising field is switched off. During the demagnetisation of A, the temperature falls down to $10^{-1}$ to $10^{-3}$ degrees absolute. Maximum approach towards absolute zero is obtained if the procedure is carried out in perfectly adiabatic conditions. In a more advanced method where nuclear paramagnets are utilised for demagnetisation, the temperature can be reduced to the order of $10^{-6}$ degrees absolute. Thus starting with 273·16° A in 1755, scientists are able to produce temperature which is almost absolute zero, today!

---

# ग्रंथ-परिचय

## ( १ )

Outlines of Social Psychology by Prof. S. G. Hulyalkar, Dr. S. V. Kale and Prof. Jiandani. Kitabmahal Prakashan-Allahabad and Bombay.

Price Rs. 6. pages. 236

**( सामाजिक मानसशास्त्राची रूपरेखा ).**

सर्वसाधारण जिज्ञासू, समाजशास्त्रांचे अभ्यासक आणि सामाजिक मानसशास्त्राचे विद्यार्थी या विविध वाचकांसाठीं आपल्या महाविद्यालयांतील तत्त्वज्ञान व मानसशास्त्र या विषयांचे अध्यापक प्रा. हुल्याळकर व प्रा. काळे आणि मुंबईच्या जयहिंद कॉलेजांतील मानसशास्त्राचे प्राध्यापक जिआन्दाणी यांनीं 'सामाजिक मानसशास्त्राची रूपरेखा' लिहिली आहे. सामाजिक मानसशास्त्र हा विषय सामान्य मानसशास्त्रापासून अगदीं अलीकडेच वेगळा झालेला आहे. या विषयाची स्वतंत्र शास्त्र किंवा अभ्यासविषय म्हणून जोपासना विविध शास्त्रज्ञांनीं निरनिराळ्या दृष्टिकोनांतून केलेली आहे. त्यामुळें इंग्रजी भाषेंत पाश्चात्य ग्रंथकारांनीं या विषयावर लिहिलेले अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. या विषयाचें अध्यापन करणाऱ्या कांहीं भारतीय प्राध्यापकांनीं लिहिलेलीं एक दोन पुस्तकेंहि उपलब्ध आहेत. परंतु विद्यापीठांतील विद्यार्थ्यांची विशिष्ट गरज लक्षांत ठेवून, आणि सर्वसाधारणपणें अभ्यास-क्रमास अनुसरून, सामाजिक मानसशास्त्रांतील अनेक विषयांचें आणि प्रश्नांचें थोडक्यांत पण पद्धतशीरपणें आणि सर्व विचारप्रणालींचा परामर्श घेऊन विवरण आणि विवेचन करणाऱ्या पाठ्य पुस्तकाची बरेच दिवस विद्यार्थी-वर्गास आवश्यकता वाटत होती. या पुस्तकानें ती गरज भागविली आहे.

सामाजिक मानसशास्त्रांतील संशोधनास अनुकूल असें वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीनें सामाजिक मानसशास्त्राच्या या 'रूपरेखे'चा उपयोग होईल, असा योग्य विश्वास डॉ. गार्डनर मर्फी यांनीं ग्रंथास लिहिलेल्या पुरस्कारात व्यक्त केलेला आहे.

सुमारें सव्वादोनशें पृष्ठांचा हा ग्रंथ एकूण बारा प्रकरणांत विभागलेला आहे. पहिल्या प्रकरणांत सामाजिक मानसशास्त्राचें सामान्य स्वरूप, संशोधनपद्धति, संशोधन-विषय, संशोधन सामग्री आणि इतर शास्त्रांशीं असलेला संबंध यांचें विवेचन केलेलें आहे. सामाजिक जीवनास स्थायीभूत असलेले व्यक्तिजीवनांतील मनोधर्म आणि व्यक्तीचें सामाजीकरण होतांना दिसून येणाऱ्या विविध प्रक्रिया यांचा विचार दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रकरणांत केलेला आहे. बहुरंगी सामाजिक परिस्थितींत विकसित होणाऱ्या व्यक्तीचें समाजसापेक्ष व्यक्तिमत्त्व चौथ्या प्रकरणांत विश्लेषणपूर्वक निवेदिलें आहे. पांचव्या प्रकरणापासून नवव्या प्रकरणापर्यंत सामाजिक जीवनाच्या गुंतागुंतीच्या स्वरूपाचा विचार विविध अंगांनीं केलेला आहे. आणि शेवटच्या तीन प्रकरणांतून समाजजीवनांतील सांस्कृतिक परंपरा, स्थित्यंतरें, प्रगति आणि नियमन इ. व्यापक आणि मूलगामी समस्यांचें विचिकित्सक विवेचन येऊन गेलें आहे.

संशोधनदृष्ट्या या ग्रंथांत अगदीं नवीन असें कांहीं नसलें तरी वाचकवर्गाची जिज्ञासा जागृत करण्याचें कौशल्य ग्रंथाच्या सूत्रबद्ध रचनेंत आणि विषय-विवेचनांत असल्याचें आढळून येतें. दुसराहि एक विशेष म्हणजे भारतीय जीवनाची विशिष्ट पार्श्वभूमि व विशिष्ट स्वरूप यांचा भरपूर उपयोग सामाजिक मानसशास्त्रीय तत्त्वांचें सोदाहरण विवेचन करितांना केलेला आहे.

या परिश्रमपूर्वक तयार केलेल्या 'रूपरेखे' बद्दल ग्रंथकर्त्यांचें मनःपूर्वक अभिनन्दन करितांना अशीच एक 'रूपरेखा' त्यांनीं इंग्रजी न जाणणाऱ्या आपल्या असंख्य मराठी वाचकांसाठीं तयार करावी, असें सुचवावेसें वाटतें.

**श्री. र. कावळे.**

( २ )

**'जगाचा संक्षिप्त इतिहास' भाग १ ला** लेखक-प्रा. ओतुरकर, प्रा. पोतनीस व प्रा. महाजन.-अ. वि. गृह प्रकाशन.

'जगाचा इतिहास' या विषयावर मराठींत फार थोडीं पुस्तकें आहेत. वरील पुस्तक 'इंटर आर्टस्' च्या विद्यार्थ्यांसाठी लिहिलेलें असून त्यामुळें या विषयावरील वाङ्मयांत चांगली भर पडली आहे. पुस्तकांतील विवेचन अगदीं सुगम असून इतक्या थोडया पृष्ठांत इतक्या विषयांचें विवेचन करणारें पुस्तक मराठींत दुसरें नाहीं. तीन तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापकांनीं हें पुस्तक लिहिलेलें असल्यामुळें परीक्षेला अवश्य ते सर्व विषय त्यांत समाविष्ट झालेले आहेत.

भाषा अतिशय सुगम असून जागजागीं मोठया लेखकांचे उतारे दिल्यामुळें व प्रकरणांच्या शेवटीं सारार्थ दिल्यामुळें पुस्तकाची उपयुक्तता वाढली आहे.

मुख्यतः इंटर आर्टस्च्या विद्यार्थ्यांसाठी हें पाठपुस्तक म्हणून लिहिलेलें असलें तरी सर्व-सामान्य वाचकांना जगाच्या इतिहासाचा प्राथमिक परिचय करून देण्याच्या दृष्टीनेंहि हें पुस्तक उपयुक्त झालें आहे. **—एस्. आर्. फडके.**

( ३ )

## आर्यागीता [ मूळ श्रीमद्भगवद्गीता व आर्यारूप अनुवाद ]-

लेखक-प्रा. **वामन शंकर आठवले.** कॉण्टिनेण्टल प्रकाशन, पुणें. २. प्रथमावृत्ति १९५६. पृष्ठसंख्या-१६+१८४. किंमत तीन रुपये.

लोकमान्य टिळक यांनीं आपल्या गीतारहस्यांत श्रीमद्भगवद्गीतेविषयीं पुढील उद्गार प्रारंभींच काढलेले आहेत. "श्रीमद्भगवद्गीता हा आमच्या धर्मग्रंथांपैकीं एक अत्यंत तेजस्वी आणि निर्मल हिरा आहे." ह्या उद्गारांतून श्रीभगवद्गीतेचें अपूर्वत्व आणि श्रेष्ठत्व सूचित झालेलें आहे. भारतीय संस्कृति, तत्त्वज्ञान, धर्म आणि नीति या सर्वांचें एकसमयावच्छेदेंकरून समग्र दर्शन घडविण्यांत गीतेची थोरवी सामावलेली आहे. गेलीं कित्येक शतकें भारतीय जनमनावर या ग्रंथाचा संस्कार होत आलेला आहे. म. गांधी, डॉ. राधाकृष्णन्, योगी अरविन्द इत्यादि भारतीय आणि डॉ. ॲनी बेझंट, हक्स्ले, ओटो इ. पाश्चात्य-या सर्व आधुनिक काळांतील थोर पुरुषांच्या विचारांत आणि जीवनांत श्रीगीता स्फूर्तिदायी ठरलेली आहे. अशा या अलौकिक आणि सर्वमान्य ग्रंथाचा जेवढा अभ्यास होईल तेवढा लाभदायकच आहे.

त्या दृष्टीनें मराठी भाषिकांचे प्रयत्न श्री ज्ञानेश्वरांपासूनच सुरू झालेले आहेत. आधुनिक कालांत लो. टिळक, से. बापट, आचार्य विनोबा यांनीं केलेले प्रयत्न प्रसिद्धच आहेत. संस्कृताचें ज्ञान नसणाऱ्या किंवा अगदीं बेताचेंच ज्ञान असणाऱ्या मराठी वाचकांसाठीं श्रीगीतेचा अनुवाद करण्याचेहि प्रयत्न होत आहेत. आचार्य विनोबाजी यांची 'गीताई' लक्षावधि प्रति निघून बृहन्महाराष्ट्रांतील खेडोंपाडीं देखील जाऊन पोहोंचली आहे. असे प्रयत्न जितके होतील तितका गीतातत्त्वांचा प्रसार व आचार होणार असल्यामुळें प्रा. वामन शंकर आठवले यांनीं प्रस्तुत केलेला आर्याबद्ध गीतानुवाद स्वागतार्हच आहे.

प्रा. आठवले यांनीं मूळ अनुष्टुप् छंदाऐवजीं अनुवादासाठीं आर्यावृत्त निवडिलें आहे; आणि जेथें मुळांत अनुष्टुप् छंदाहून वेगळा छंद वापरलेला आहे, तेथें दिंडी वृत्ताचा उपयोग केला आहे. मूळांतील आशय सुलभ आणि स्पष्ट करण्याचे दृष्टीनें या वृत्तांची योजना यथार्थ अनुवादास परिपोषक झालेली आहे, असें बऱ्याच ठिकाणीं आढळून येतें. अनुवादकर्त्याची भूमिका कोणत्याहि विशिष्ट मताचा आग्रह धरणाऱ्या तत्त्वविवेचकाची नसून, गीताप्रणीत सिद्धांतांची श्रद्धेनें, निष्ठेनें आणि भक्तिभावानें उकल करणाऱ्या पूजकाची आहे. गीतेवर विस्तृत भाष्यें करून ज्ञान, भक्ति आणि कर्म या मार्गांची श्रेष्ठता पटवून देणाऱ्या शंकराचार्य, ज्ञानेश्वर आणि टिळक या तीन थोर भाष्यकारांना हा ग्रंथ समर्पित केला आहे. त्यावरून अनुवादकाची गीतेकडे पाहण्याची समन्वयी दृष्टि सूचित होत आहे.

एका बाजूस मूळ संस्कृत श्लोक आणि दुसऱ्या बाजूस त्याचें आर्याबद्ध मराठी रूपांतर अशा पद्धतीनें हा अनुवाद छापलेला आहे. त्यामुळें ग्रंथाची तुलनात्मक अभ्यास, मनन आणि पठण या दृष्टीनें उपयुक्तता बरीच वाढलेली आहे. प्रारंभीं गीताध्यान व गीतामाहात्म्य आणि त्यांचा मराठी अनुवाद घातला आहे; आणि शेवटीं मूळ गीतेंतील श्लोकांची वर्णानुक्रमानें सूचि दिलेली आहे; ग्रंथाच्या उपयुक्ततेंत त्यामुळें भर पडलेली आहे.

श्रीमद्भगवद्गीता ही नवनवोन्मेषशाली आहे. तिचा समग्र अर्थ हा केवळ बुद्धीनें जाणून घ्यावयाचा विषय नसून, त्याची प्रचीति जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सदोदित घ्यावयाची आहे; म्हणून गीतेच्या अभ्यासाची गोडी उत्पन्न व्हावी आणि प्रा. सोनोपंत दांडेकरांनीं पुरस्कारांत म्हटल्याप्रमाणें गीतारूपी अवीट अमृताचें नित्य सेवन व्हावें, हें योग्य होय. प्रस्तुतचा अनुवाद त्यास परिपोषक ठरेल, असा मला विश्वास वाटतो.

प्रा. दांडेकर, श्री. ज. स. करंदीकर आणि श्री. ग. वि. केतकर या अधिकारी विद्वानांनीं आपल्या पुरस्कारांत केलेल्या सूचनांनुसार पुढील आवृत्तींत इष्ट तो बदल झाल्यास प्रस्तुतचा प्रयत्न उत्तरोत्तर सफल होईल, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

**श्री. गो. हुल्याळकर.**

( ४ )

**' स्वाति ' ( कवितासंग्रह ) प्रकाशन-मराठी वाङ्मयमंडळ, स. प. महाविद्यालय, पुणें २.**

स. प. महाविद्यालयाच्या मराठी-वाङ्मय-मंडळाचें ' स्वाति ' हें दुसरें प्रकाशन; कविता-संग्रह मात्र पहिलाच. महाविद्यालयांतील तरुण व हौशी कवींच्या काव्याचा संग्रह म्हणतांच ' प्रणय-प्राधान्य' हें ओघानें आलेंच. ' अगदीं नकळत अवचित ' जन्मणाऱ्या ह्या प्रेमभावनेचें चित्रण मात्र अगदीं खेळकरपणें केलेलें आहे. त्यांतील विविधताहि मनोहारी आहे. त्याशिवाय मातेचें बालकां-विषयीं 'वात्सल्य, बहिणीची भावावरील माया, सासुरवाशिणीला लागलेली माहेरची ओढ यांसारखे लोकप्रिय विषय लोकमान्य पद्धतीनें हाताळलेले, म्हणूनच पृथगात्मता गमावून बसलेलेहि ' स्वातीं'त दिसून येतात. स्वातीचें खरें वैशिष्ट्य तींमधील कांहीं अंतर्मनांतील भावनांचा आविष्कार करणाऱ्या गीतांत आढळून येईल. त्यांत अज्ञाताच्या कमानींतील पारवा, माळावर झुरणारा लिंब किंवा बाभूळ, झरणारा कभिन्न कातळ, दिनचर्येचें तट्टू यांसारखीं प्रतीकें साहाय्यास आलेलीं आहेत. आशय आणि अभिव्यक्ति दोन्हीहि अनुकरणांतून सिद्ध झालीं असलीं तरी कविमन समरस झाल्याचें स्पष्टपणें जाणवतें. यांतच रम्य भावि कालाचें आश्वासन आहे. ' प्यास ' ही कविता तर तिच्यांतील भव्य कल्पनेसाठी कायमची स्मरणांत रहावी एवढी परिणामकारक झाली आहे. ' स्वातीं'तील काव्य-मौक्तिकांना आज श्रेष्ठ मूल्य न आलें तरी भविष्यकालांत तें येईलच येईल.

**व. दि. कुलकर्णी**

## विद्यार्थीबंधूंनो आणि भगिनींनो,

दि. २ ऑक्टोबर १९५६ पासून आपल्या कॉलेजांत विद्यार्थी-भांडार उघडलें आहे.

आपल्या भांडारांत आपणांस लागणारी सर्व स्टेशनरी योग्य त्या दरांत मिळेल. त्यांतल्या त्यांत वसतिगृहांतील विद्यार्थी व विद्यार्थिनींस या संधीचा भरपूर फायदा घेतां येईल. कारण जवळच्या जवळच सर्व गोष्टी त्यांना खरेदी करितां येतील.

आपल्या भांडाराचें वैशिष्ट्य म्हणजें तें " स्वदेशीचें माहेरघर " आहे. आपण भांडारांतून माल खरेदी केल्याने आपोआपच स्वदेशीस पाठिंबा मिळेल. व एकप्रकारचें राष्ट्रीय कार्य आपल्या हातून पार पडेल.

दुसरें वैशिष्ट्य म्हणजे आमचे १ रु. चे शेअर्स आहेत. आपण जर ते घेतले तर आपणांस, भांडारास होणारा फायदा वाटून दिला जाईल. अधिक माहितीसाठीं भांडारांत चौकशी करा.

एक वेळ अवश्य भेट द्या व अनुभव घ्या.

**अ. भि. कुळकर्णी.**